इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - २२२ ▸ सोमवार,ता.१५ डिसेंबर २०२५ ▸ पाने १२
इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

## सीयूईटी पीजीसाठी अर्ज प्रक्रिया सुरू

नवी दिल्ली,ता.१४–

सीयूईटी पीजी २०२६ साठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. १४ डिसेंबर २०२५ ते १४ जानेवारी २०२६ पर्यंत रात्री ११:५० पर्यंत अर्ज करता येईल. अर्जामध्ये बदल करण्यासाठी १८ ते २० जानेवारी २०२६ पर्यंत वेळ मिळेल. परीक्षा मार्च २०२६ मध्ये होईल. सीयूईटी (पीजी) म्हणजे कॉमन युनिव्हर्सिटी एंट्रेंस टेस्ट (पोस्ट ग्रॅज्युएट्स). ही परीक्षा एनटीएद्वारे घेतली जाते. या परीक्षेच्या आधारावर सेंट्रल आणि स्टेट युनिव्हर्सिटीजमध्ये मास्टर्स डिग्रीसाठी प्रवेश मिळतो. परीक्षेत ९० मिनिटांत ७५ प्रश्न विचारले जातात. प्रत्येक प्रश्नाला ४ गुण मिळतात आणि चुकीच्या उत्तरासाठी १ गुण कापला जातो. अर्ज करण्यासाठी पदवीधर असणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

## परीक्षेतील कॉपीला बसणार आळा

पुणे,ता.१४ –

दहावी–बारावीच्या परीक्षेत होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी राज्य शिक्षण मंडळाने कंबर कसली आहे. त्यानुसार यंदा दोन मोठे बदल करण्यात आले आहेत. यामध्ये परीक्षेसंदर्भातील तब्बल एक लाख कर्मचाऱ्यांची दुसऱ्या परीक्षा केंद्रांवर बदली करण्यात येणार आहे. तसेच प्रश्नपत्रिकांची वाहतूक डिजिटल लॉक असलेल्या पेटीतून करण्यात येणार आहे. त्यामुळे कॉपीमुक्तीसाठी राज्य मंडळ खऱ्या अर्थाने ॲक्शन मोडवर आल्याचे स्पष्ट झाले आहे.राज्य मंडळाच्या माध्यमातून दहावी–बारावीची परीक्षा येत्या फेब्रुवारी–मार्च महिन्यात घेण्यात येणार आहे. साधारण दोन्ही मिळून ३५ लाख विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००

# राज्याला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करण्याचे लक्ष्य

## मुख्यमंत्री फडणवीस-राज्याचा विकास थांबणार नाही

■ नागपूर,ता.१४–

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आजही देशातील सर्वाधिक सक्षम आणि स्थिर असून, सर्व आर्थिक निकषांवर राज्य पात्र ठरत आहे.कर्ज,



राजकोषीय तूट,गुंतवणूक, रोजगार निर्मिती,सिंचन,वीज, दळणवळण आणि कायदा–सुव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात राज्याने भरीव काम केले असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना सांगितले.

### २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र घडविणार

महाराष्ट्रासाठी तयार करण्यात आलेल्या व्हिजन डॉक्युमेंटचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या विकासासाचा रोडमॅप तयार करताना २०३०, २०३५ आणि २०४७ असे तीन टप्पे निश्चित करण्यात आले आहेत.२०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र घडवण्याचे उद्दिष्ट असून २०२९–३० दरम्यान देशातील पहिली ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था महाराष्ट्राची असेल, या दिशेने काम सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

राज्याची अमृत महोत्सवाकडे वाटचाल सुरू असताना पुढचा काळ महाराष्ट्रासाठी अत्यंत निर्णायक असल्याचे नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी (पान २ वर)

### मुंबई महाराष्ट्रातच राहणार

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की,मुंबई महाराष्ट्राचीच होती, आहे आणि कायम राहील. संयुक्त महाराष्ट्र लढ्यात एकशे सहा हुतात्म्यांच्या बलिदानातून महाराष्ट्र घडला असून यासंदर्भात कुठलाही संभ्रम ठेवण्याची आवश्यकता नाही.

# राज्यासह देशात थंडीचा कडाका



■ मुंबई,ता.१४–

**राज्यात गेल्या काही दिवसांपासून थंडीचा जोर मोठ्या प्रमाणात वाढलेला पहायला मिळत आहे. अनेक भागात किमान तापमान ६ ते ७ अंश सेल्सिअसपर्यंत घसरले असून काही ठिकाणी ५ अंशांच्या आसपास तापमानाची नोंद झाली आहे.**

मध्य महाराष्ट्रात थंडीची लाट येण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून पुढील काही दिवस हुडहुडी वाढण्याचे संकेत आहेत. परभणी येथे किमान तापमान ६.९ अंश सेल्सिअस, धुळे ६.१, निफाड ६.३,जळगाव ७ तर नाशिक, पुणे आणि मालेगाव येथे ९ अंशांच्या आसपास तापमान नोंदवले गेले. भंडारा आणि गोंदिया येथे तापमान १० अंशांपर्यंत खाली आले आहे. अहिल्यानगर, परभणी,निफाड आणि धुळे येथे थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला असून नाशिक,अहिल्यानगर,जळगाव, धुळे, नंदुरबार, सोलापूर आणि पुणे जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

### हवामान विभागाकडून अलर्ट जारी

### थंडीचा जोर आणखी वाढणार

### निफाड तालुक्याचा पारा घसरला

जम्मू–काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या हिमवृष्टीमुळे उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांचा परिणाम नाशिकच्या निफाड तालुक्यात अधिक जाणवत आहे. सलग सहाव्या दिवशी येथे किमान तापमान ५ ते ६ अंश सेल्सिअस दरम्यान राहिले. रुई येथे ५.३ अंश तर कुंदेवाडी येथील गहू संशोधन केंद्रात ६.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. या हुडहुडी भरवणाऱ्या थंडीत कांदा उत्पादक शेतकरी कांदा विक्रीसाठी लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत येत असून थंडीपासून बचावासाठी शेकोट्यांचा आधार घेताना दिसत आहेत. पुढील काही दिवसांत थंडी आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागाने (पान २ वर)

**सकाळच्या वेळेत थंडगार वारे वाहत असल्याने गारठा अधिक जाणवत आहे. उत्तरेकडील राज्यांमध्ये कडाक्याची थंडी असून तेथून येणाऱ्या शीत लहरींचा परिणाम महाराष्ट्रावर होत आहे.याच पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाने राज्यातील काही भागांसाठी थंडीच्या लाटेचा इशारा देत यलो अलर्ट जारी केला आहे.**

# मुंबईचे रस्ते धुतले; तिजोरी धुतली नाही

## शिंदेंचा ठाकरेंना टोला

■ मुंबई,ता.१४–

आम्ही मुंबईचे रस्ते धुतले, तिजोरी कधीही धुतली नाही असे म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उध्दव ठाकरेंवर टीका केली. कोव्हिड असो वा मिठी नदी. प्रत्येक ठिकाणी यांनी दरोडा घातला. ते मुंबईच्या तिजोरीवर दरोडा टाकणारे रहमान डकैत आहेत तर आम्ही त्यांना पाणी पाजणारे धुरंधर आहोत असे म्हणत शिंदेंनी ठाकरेंना टोला लगावला.



हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी एकनाथ शिंदे बोलत होते. (पान २ वर)

**लाडकी बहीण योजना बंद होईल, पण अजूनही सुरू आहे.जे कोर्टात गेले ते हरले. कोणी 'माई का लाल' आला तरी लाडक्या बहिणीची ओवाळणी बंद होणार नाही. त्यांना २१०० रुपये देणारच असेही शिंदे म्हणाले.**

# पुरवणी मागण्या मंजूर करण्यासाठी अधिवेशन

## विरोधकांचा सरकारवर हल्लाबोल

■ नागपूर,ता.१४–

**नागपूर येथे सात दिवसांचे अधिवेशन पार पडले पण या अधिवेशनातून ना शेतकऱ्यांना काही मिळाले ना विदर्भातील जनतेला काही मिळाले त्यामुळे हे अधिवेशन वांझोटे ठरले अशी टीका विरोधी पक्षाने केली.अधिवेशन संपल्यावर विरोधकांची संयुक्त पत्रकार परिषद झाली.**



या पत्रकार परिषदेत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गटनेते भास्कर जाधव म्हणाले निवडणुकीत सरकारी तिजोरीतून पैसे खर्च करण्यासाठी अधिवेशन झाले.सरकारकडून ज्या काही घोषणा झाल्या त्या मुंबई, ठाणे, नवी मुंबई यासाठी झाल्या पण विदर्भासाठी एकही घोषणा करण्यात आली नाही.त्यामुळे विदर्भातील जनतेची फसवणूक करणारे हे अधिवेशन होते अशी टीका भास्कर जाधव यांनी केली. महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हे अधिवेशन झाले.सरकारवर अनेक भ्रष्टाचाराचे आरोप झाले याबाबत प्रश्न विचारूनही सरकारने कारवाई केली नाही अशी टीका सचिन अहिर यांनी केली.

विदर्भातील धान,सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकरी या अधिवेशनाकडे डोळे लावून बसला होता.धानाला आणि सोयाबीनला बोनस मिळावा म्हणून आम्ही मागणी केली पण सरकारने कारवाई केली नाही.राज्यातील युवकांना ड्रगचा विळखा आहे पण त्यावर ही कारवाईची ठोस भूमिका सरकारची नाही अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील म्हणाले,या अधिवेशनात घोषणांचा नुसता पाऊस पडला.कापूस खरेदीचे केंद्र (पान २ वर)

## हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजले

■ नागपूर,ता.१४–

**राज्य विधिमंडळाचे ८ डिसेंबरला सुरू झालेल्या हिवाळी अधिवेशनाचे अखेर रविवारी सूप वाजले. आता पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईत पार पडणार आहे.**

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कामकाजाचा आढावा घेतला.त्यात सांगितले की, सात दिवसांच्या हिवाळी अधिवेशनात,कनिष्ठ सभागृहाचे कामकाज ७२ तास ३५ मिनिटे चालले,दररोज सरासरी १०.२२ तास चालले, तर फक्त १० मिनिटे वाया गेली. (पान २ वर)

## उत्तर प्रदेश भाजप अध्यक्षपदी चौधरी

■ लखनौ,ता.१४–

**भारतीय जनता पक्षाने उत्तर प्रदेश भाजपच्या नव्या प्रदेशाध्यक्ष पदा साठी रविवारी केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांच्या नावाची घोषणा केली.**



१३ डिसेंबरला झालेल्या नामांकन प्रक्रियेत केवळ पंकज चौधरी यांचेच नामांकन दाखल झाल्याने ते बिनविरोध निवडून आले.केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्या उपस्थितीत रविवारी लखनौ येथे त्यांच्या नावाची औपचारिक घोषणा करण्यात आली.पंकज चौधरी हे महाराजगंज लोकसभा मतदारसंघातून (पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
| --- | --- |
| १३२२०० रु. | १८९५०० रु. |

अंडी ७२५ रुपये शेकडा

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील दोघांचा मृत्यू

■ मिरज,ता. १४ (प्रतिनिधी)–

**मिरज तालुक्यातील एरंडोली–शिपुरदरम्यान मिरज–सलगरे रोडवर अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकी वरील दोघांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना शनिवारी रात्री उशिरा घडली. अपघातात एरंडोली येथील दोघांचा मृत्यू झाल्याने गावावर शोककळा पसरली आहे. या घटनेची नोंद मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात झाली आहे.**




संजय रघुनाथ कदम (वय ५९) व इलाई हबीब इनामदार (वय ५४, दोघे रा. एरंडोली) अशी त्या दोघांची नावे आहेत.संजय कदम व इलाई इनामदार हे दोघे दुचाकी (एमएच ०९ सीपी ३०१५) वरून जात होते. अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला समोरून धडक दिली असावी असा अंदाज ग्रामस्थांनी वर्तवला आहे. अपघात इतका (पान २ वर)

## राज यांच्यामुळे उध्दव ठाकरे यांचे नुकसान होणार

### ना.आठवले यांचे मत

■ सांगली,ता. १४(प्रतिनिधी)–

**मनसेचे राज ठाकरे यांच्यामुळे उध्दव ठाकरे यांचे मोठे नुकसान होणार आहे.राज ठाकरे यांना सोबत घेण्याची चूक उध्दव ठाकरे यांनी करायला नको होती. उध्दव आणि राज ठाकरे एकत्र आल्याने मुंबईत मराठी मतात फूट पडणार आणि अमराठी मते महायुतीला मिळणार आहेत.त्यामुळे मुंबई महापालिकेची सत्ता उध्दव ठाकरे यांच्याकडून काढून घेण्यात महायुतीला यश मिळेल, असे मत केंद्रीय सामजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.**

आठवले म्हणाले, उध्दव आणि राज ठाकरे एकत्र आल्याने मुंबईत मराठी मतात फूट पडणार असून महायुतीला अमराठी मते जास्त मिळतील. राज ठाकरे यांच्यामुळे उध्दव ठाकरे यांचे मोठे नुकसान होणार असून राज ठाकरेंना सोबत घेण्याची चूक उद्धव ठाकरेंनी करायला नको होती. राज ठाकरे लोकसभेला महायुतीकडे असताना आम्हाला जास्त फायदा झाला नाही,मात्र विधानसभेत ते सोबत नसताना फायदा (पान २ वर)



## आग विझवताना होरपळून वृध्दाचा मृत्यू

■ शिराळा,ता.१४ (प्रतिनिधी)–

**ऊसाचा पाला पेटवत असताना, दुसऱ्याच्या शेतात आग जाईल या भीतीने विझवण्यासाठी गेलेले दोघे सख्खे भाऊ भाजले.त्यापैकी एकाचा मृत्यू झाला. आनंदा रामचंद्र मोरे(वय ७०)असे मृताचे नांव आहे.जखमी वसंत रामचंद्र मोरे (वय ६५) याच्यावर शिराळा येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना वाकुर्डे बुद्रुक मानेवाडी येथील बामन शिवारात घडली.या घटनेची नोंद शिराळा पोलीस ठाण्यात झाली आहे.**



आनंदा मोरे व वसंत मोरे हे सायंकाळी चार वाजता उसाच्या फडातील पाला पेटवण्यासाठी गेले होते. यावेळी शेताच्या बाजूला वाढणारे गवत आणि पाला यामुळे आग भडकली. आग बाजूच्या शिवारामध्ये पसरू (पान २ वर)

## बिहारमध्ये खून करून कोल्हापुरात लपलेल्या दोन गँगस्टर्सना अटक

### स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची कारवाई

■ कोल्हापूर, ता. १४ (प्रतिनिधी)–

**बिहारमधील कुख्यात गँगस्टर प्रेम यादव याचा खून करून कोल्हापुरात येऊन लपलेल्या दोघा गँगस्टर्सना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. शिये रामनगर येथून त्यांना रविवारी अटक करण्यात आली. रोहित राजेश सिंग (वय ३५), कुणालकुमार तरकेश्वर पासवान (वय ३२ दोघे रा.मांढरोली जि. सारण, बिहार) अशी त्यांची नावे आहेत. त्यांना बिहार पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.**



बिहारच्या छापरा जिल्ह्यातील सराईत गँगस्टर प्रेम यादव याचा १८ नोव्हेंबर रोजी धनबाद (झारखंड) येथे गोळ्या झाडून खून झाला होता. तिघा मारेकऱ्यांनी दुचाकीवरून येऊन फायरिंग केले होते. याबाबत झारिया पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून मारेकरी फरार झाले होते.या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी एसआयटीची स्थापना केली होती. एसआयटीच्या अधिकाऱ्यांना माहिती मिळाली की, या खूनातील दोघे संशयित (पान २ वर)

### हास्यतुषार – सुरेंद्र दास



बिबट्या गावात आल्यापासून आपोआप गाव हागणदारी मुक्त झाले बघ ..!

## लिओनेल मेस्सीच्या कार्यक्रम आयोजकाचा जामीन फेटाळला

### चौदा दिवसांची पोलीस कोठडी

■ कोलकाता,ता.१४–

**लिओनेल मेस्सीच्या जीओएटी इंडिया टूर २०२५ चे प्रवर्तक आणि आयोजक शताद्रु दत्ता यांना विधाननगर न्यायालयाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीस या दौऱ्याच्या व्यवस्थेची आणि स्टेडियममध्ये बंदी घातलेल्या वस्तूंच्या विक्रीची चौकशी करत आहेत.दत्ताच्या वकीलाने दावा केला आहे की,त्यांच्यावर खोटे आरोप लावण्यात आले आहेत.**



फुटबॉल दिग्गज लिओनेल मेस्सीच्या कोलकाता येथील भारत दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात गोंधळ उडाला जेव्हा हजारो चाहते त्याला नीट पाहूही शकले नाहीत. शनिवारी दुपारी साल्ट लेक स्टेडियमवर पोहोचलेल्या मेस्सीला पाहण्यासाठी लोकांनी (पान २ वर)

## कायदा,सुव्यवस्थेची जबाबदारी बांगलादेशची

### भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने खडसावले

■ नवी दिल्ली,ता.१४–

**भारत आणि बांगलादेश यांच्यातील राजकीय आरोप–प्रत्यारोप अधिक तीव्र झाले आहेत.बांगलादेशच्या अंतरिम सरकारने केलेल्या आरोपांना भारताने कठोर प्रत्युत्तर दिले आहे.भारताने स्पष्टपणे सांगितले आहे की, त्याने कधीही आपल्या भूमीचा वापर बांगलादेशविरोधी कारवायांसाठी होऊ दिलेला नाही आणि बांगलादेशमध्ये नेहमीच स्वतंत्र,निष्पक्ष व शांततापूर्ण निवडणुकांचे समर्थन केले आहे.**

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने बांगलादेशच्या अंतरिम सरकारकडून जारी करण्यात आलेल्या निवेदनावर प्रतिक्रिया देताना म्हटले की,भारतावर लावलेले आरोप पूर्णपणे फेटाळण्यात येत आहेत. या मुद्यावर भारताची भूमिका पूर्वीप्रमाणेच असून त्यात कोणताही बदल झालेला नाही, असे मंत्रालयाने पुन्हा स्पष्ट केले. मंत्रालयाने सांगितले की, भारत सातत्याने हेच म्हणत आला आहे की बांगलादेशमध्ये शांत वातावरणात, सर्वांना सहभागी करून घेणाऱ्या आणि विश्वासार्ह निवडणुका होणे आवश्यक आहे.बांगलादेशने भारतात वास्तव्यास असलेल्या शेख हसीना यांच्याबाबत गंभीर चिंता (पान २ वर)

## (पान १ वरून)

## भाजप अध्यक्षपदी चौधरी

सात वेळा खासदार राहिले आहेत. ते कुर्मी समाजातून येतात, जो इतर मागासवर्ग (ओबीसी) अंतर्गत येतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचे ते विश्वासू मानले जातात. कुर्मी समाजाचा संपूर्ण उत्तर प्रदेशातील ओबीसी समाजात मोठा प्रभाव आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुका आणि २०२२ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये या समाजाने राज्यातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या समाजवादी पक्षाकडे कल दाखवला होता.पंकज चौधरी यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात स्थानिक पातळीवर केली. १९८९ ते १९९१ या काळात त्यांनी गोरखपूरमध्ये नगरसेवक म्हणून काम केले. या काळात त्यांनी एक वर्ष नगरपालिकेचे उपमहापौर म्हणूनही जबाबदारी सांभाळली. त्यानंतर त्यांची गोरखपूरचे उपमहापौर म्हणून नियुक्ती करण्यात आली.

## राज्यासह देशात थंडीचा कडाका

व्यक्त केली आहे. देशाच्या इतर भागांतही थंडीचा प्रभाव वाढलेला आहे.तेलंगणा आणि कर्नाटकात १५ व १६ डिसेंबरला काही ठिकाणी शीतलहरी कायम राहण्याचा अंदाज आहे.उत्तर प्रदेशात १५ ते १६ डिसेंबर, उत्तर-पूर्व भारतात १५ ते १९ डिसेंबर, हिमाचल प्रदेशात १५ ते १७ डिसेंबर आणि पंजाब, हरियाणा, चंदीगड तसेच उत्तर-पूर्व मध्य प्रदेशात सकाळच्या वेळेत दाट धुक्याची शक्यता आहे.हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये १५ ते १८ डिसेंबरदरम्यान ३० ते ४० किमी प्रतितास वेगाने थंड वारे वाहण्याचा अंदाज आहे. दिल्ली-एनसीआरमध्येही येत्या काही दिवसांत थंडी वाढून सकाळच्या वेळेत धुक्याचे प्रमाण वाढणार आहे. उत्तर प्रदेशातील काही भागात रविवारी सकाळी अतिशय दाट धुके पडल्याने दृश्यता ५० मीटरपेक्षा कमी झाली होती.गेल्या २४ तासात देशातील मैदानी भागातील सर्वात थंड ठिकाणे म्हणून पश्चिम मध्य प्रदेशातील राजगढ आणि छत्तीसगडमधील अंबिकापूर येथे ५.६ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. पुढील सात दिवसात देशातील बहुतांश भागांत किमान तापमानात फारसा बदल होण्याची शक्यता नसल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

## पुरवणी मागण्या मंजूर करण्यासाठी अधिवेशन

वाढवा ही मागणी केली पण त्याचाही निर्णय झाला नाही. पैसे नाही, खिशात पण घोषणा मात्र अपार अशी अवस्था महायुती सरकारची आहे. या सरकारने इतक्या घोषणा केल्या की त्यासाठी बजेट कमी पडेल अशी अवस्था आहे, अशी टीका सतेज पाटील यांनी केली.मुख्यमंत्र्यांनी राज्यात गुंतवणूक येते याबाबत सभागृहाला माहिती दिली पण ज्यांच्याबरोबर करार झाले त्या कंपन्या राज्यात येत नाही, प्रत्यक्षात गुंतवणूकच झालेली नाही. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न सुटलेला नाही अशी टीका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी केली.विरोधी पक्षाने राज्यातील कायदा सुव्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित केले.त्यावर ठोस उत्तर मिळाले नाही. त्यामुळे सात दिवसांत जनतेच्या पदरी निराशाच आली, अशी टीका जयंत पाटील यांनी केली.विरोधकांनी सभागृहात आक्रमकता दाखवत प्रश्न उपस्थित केले पण सत्ताधाऱ्यांनी उत्तरे दिली नाहीत, असे शशिकांत शिंदे म्हणाले.

## अधिवेशनाचे सूप वाजले

विधानसभेत मांडण्यात आलेल्या १८ विधेयकांपैकी १६ विधेयके मंजूर करण्यात आली, असेही त्यांनी सांगितले. राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारी २३ फेब्रुवारी २०२६ पासून सुरु होणार आहे, अशी शिफारस राज्यपालांकडे करण्यात येणार आहे, अशी माहिती नार्वेकरांनी दिली.

## दुचाकीवरील दोघांचा मृत्यू

भीषण होता की, दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर दुचाकीचेही मोठे नुकसान झाले आहे. अपघातानंतर वाहन चालकाने वाहनासह घटनास्थळावरून पलायन केले.

## होरपळून वृध्दाचा मृत्यू

लागली. गोरख माने यांच्या शेडकडे आग जाऊ लागली. यावेळी गोरख माने, आनंदा मोरे व वसंत मोरे यांनी आग विझवली. यावेळी आनंद मोरे हे माझी सायकल रस्त्यावर आहे म्हणून ते दुसऱ्या वाटेने घेऊन येत होते.तेव्हा त्यांच्या लक्षात आले की पुन्हा माझ्या शेतात आग लागली. तेव्हा त्यानी आग विझवण्याचा प्रयत्न केला. पण ते आगीत होरपळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. आनंदा मोरे हे एकटेच राहत होते. त्यांना आपत्य नव्हते. गेले दीड वर्षांपूर्वी त्यांच्या पत्नीचे निधन झाले आहे.

## ठाकरे यांचे नुकसान होणार

झाला.मुंबईत आरपीआयची २५ जागांची मागणी आहे. त्यापैकी १६ जागा तरी मिळाव्यात.महायुती मुंबईत उध्दव ठाकरेच्या हातून हिसकावून घेण्याचे प्लॅनिंग करत असून महापौर महायुतीचा होईल, हे निश्चित आहे.एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होतील, असे वक्तव्य प्रकाश आंबेडकर यांनी कोणत्या आधारावर केले ? असा सवाल करत सहजासहजी भाजप मुख्यमंत्री सोडेल असे वाटत नाही, असे सांगून आठवले म्हणाले, मतांची चोरी झाली नाही पाहिजे, यादी दुरुस्त केली पाहिजे.मात्र राहुल गांधी सतत मतचोरी झाली, असे म्हणतात, मग लोकसभेला काय मतचोरी झाली होती का? असा सवाल त्यांनी केला.आम्ही सत्तेत नाही मात्र महायुतीमध्ये आहे.भाजपा छोटे पक्ष संपवत आहे, असे बोलले जाते.मात्र मी माझा पक्ष वाढवला आहे.दोन राज्यात मान्यता मिळाली तर राष्ट्रीय मान्यता मिळेल. सांगली महापालिकेत ५ ते ६ आरपीआयला जागा मिळाव्यात,अशी मागणी आठवले यांनी यावेळी केली.

## दोन गँगस्टर्सना अटक

कोल्हापुरात वास्तव्याला आहेत. एसआयटीच्या अधिकाऱ्यांनी कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांच्याशी संपर्क साधून खूनातील आरोपी शोधून देण्याची मदत मागितली होती.पोलीस अधीक्षक गुप्ता यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण यांना माहिती देऊन संबंधित आरोपींचा शोध घेण्याच्या सुचना केल्या होत्या. सहायक पोलीस निरीक्षक सागर वाघ व त्यांच्या पथकाने तातडीने सुत्रे हलविली. बिहारमधील खुनातील आरोपींचे शिये येथील रामनगरात वास्तव्य असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे रविवारी सकाळी पोलिसांनी शिये येथे सापळा रचून दोघांना अटक केली. अटक केलेल्या रोहित सिंग व कुणाल पासवान या दोघांना बिहार पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. अटक केलेल्या संशयीतावर खून, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, हाणामारी असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.संशयितांना अटक करणाऱ्या तपास पथकात पोलीस अंमलदार रामचंद्र कोळी, सुरेश पाटील, विनोंद कांबळे, रुपेश माने यांचा समावेश आहे.

# इचलकरंजीत आज शंभुतिर्थाचा लोकार्पण सोहळा; मुख्यमंत्र्यांची उपस्थिती

■ इचलकरंजी,ता.१४-

**येथील महापालिकेने मलाबादे चौकातील शंभुतिर्थावर धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा उभारला आहे. या शंभुतिर्थाचा लोकार्पण सोहळा आणि महापालिकेच्या विविध विकास कामांचे भूमीपूजन सोमवार, दि.१५ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. यावेळी जिल्हा पोलीस प्रमुख योगेशकुमार गुप्ता, प्रांताधिकारी दिपक शिंदे, आयुक्त पल्लवी पाटील यांनी कार्यक्रम स्थळाची प्रत्यक्ष पाहणी करुन आवश्यक त्या सुचना दिल्या.**



शंभुतिर्थ लोकार्पण सोहळ्याच्या पूर्वसंध्येला पहाणी करताना जिल्हा पोलिस प्रमुख योगेशकुमार गुप्ता, आयुक्त पल्लवी पाटील व इतर. (छाया-मयूर चिंदे)

इचलकरंजी महापालिकेने कॉ. के. एल. मलाबादे चौकात १ कोटी ९१ लाख रुपये खर्चाचे शंभुतिर्थ साकारले आहे. या ठिकाणी पंधराशे किलो ब्राँझचा धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात आला आहे. सोमवार, दि.१५ डिसेंबरला या शंभुतिर्थाचा लोकार्पण सोहळा होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संभाजी भिडे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते हा कार्यक्रम होणार आहे. याचबरोबर महापालिकेच्या विविध विकास कामांचा लोकार्पण अणि भूमीपूजन समारंभ शिवतिर्थावर होणार आहे. दोन्ही कार्यक्रम मुख्य मार्गावर आहेत. त्यामुळे वाहतुकीसाठी मुख्य मार्ग बंद ठेवून वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे.या सोहळ्याची जय्यत तयारी सुरु केली जात आहे. दरम्यान, जिल्हा पोलीस प्रमुख योगेशकुमार गुप्ता, अप्पर पोलीस अधिक्षक आण्णासाहेब जाधव, प्रांताधिकारी दिपक शिंदे, महापालिकेच्या आयुक्त पल्लवी पाटील यांच्यासह अधिकाऱ्यांनी शंभुतिर्थ आणि शिवतिर्थ परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी आवश्यक सुधारणांबाबत सुचनाही केल्या. दरम्यान, या सोहळ्यास होणारी गर्दी गृहीत धरुन ५ ठिकाणी वाहन पार्किंगची सोय करण्यात आली आहे. सोहळ्यास येणाऱ्या वाहनधारकांनी किसनराव आवळे मैदान, नामदेव भवन मैदान, महासत्ता चौक रिंगरोड महापालिका खुली जागा, व्यंकटराव हायस्कूल मैदान आणि थोरात चौकातील शिवाजीराव खवरे भाजी मार्केट याठिकाणी वाहने पार्किंग करून सहकार्य करण्याचे आवाहनही आयुक्त पल्लवी पाटील यांनी केले आहे.

# जुगार खेळणारे आठजण ताब्यात

■ इचलकरंजी,ता.१४-

**महापालिकेच्या पाठीमागे जयभिमनगर येथे उघड्यावर जुगार खेळणाऱ्या आठजणांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून १३ हजार ४६० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याबाबत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत माहिती अशी कि, महानगरपालिकेच्या पाठीमागे जयभिमनगर झोपडपट्टीमध्ये शनिवार दि.१३ रोजी रात्री सव्वा नऊ वाजण्याच्या सुमारास उघड्यावर तीन पानी जुगार खेळणाऱ्या आठ जणांवर कारवाई करण्यात आली. याप्रकरणी पो.कॉ.गणेश सनदी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार समीर मुबारक शेख, अमर दशरथ पायाळे, जरीचंद्र राजाराम तापकीरे, रविंद्र रमेश पाटील, रावसाहेब प्रकाश वडर, लखन तिमन्ना वडर, रमेश दत्तात्रय सुतार, सोहेल सिकंदर शेख यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याकडून रोख रकमेसह जुगार साहित्य असे एकूण १३ हजार ४६० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

# मुंबईचे रस्ते धुतले; तिजोरी धुतली नाही

(पान १ वरून)

मुंबईची तिजोरी लुटणाऱ्या असल्या रहमान डकैताना पाणी पाजणारी 'धुरंधर' महायुती आहे. इलाका किसी का भी हो, धमाका महायुती करेगा. हमारी सारी योजना हैं गेम चेंजर,कॉर्पोरेशन का इलेक्शन जीत कर हम ही होंगे धुरंधर' अशी शायरीतून टोलेबाजी शिंदेंनी केली.

शिंदे म्हणाले की, माझे नाव घेतल्याशिवाय काहींचा दिवस सुरू होत नाही आणि संपतही नाही. मी मुख्यमंत्री होतो तेव्हाही आणि उपमुख्यमंत्री आहे तर आताही मला घटनाबाह्य म्हणतात.महाविकास आघाडीच्या काळात अजितदादा उपमुख्यमंत्री होतेच ना? कितीही म्हटले, आदळ आपट केली तरी माझे काम चालूच आहे. सर्वसामान्य घरातील व्यक्ती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री झाला म्हणून ही जळजळ आहे. 'न मैं गिरा न मेरे हौसले गिरे, पर मुझे गिराने वाले कई बार गिरे'.समुद्रात यापुढे काळे पाणी जाणार नाही. मुंबईतील राजकीय प्रदूषणही दूर करू.वर्सोवा-भाईंदर कोस्टल रोडला मान्यता मिळाली आहे. मुंबईत पॉड टॅक्सी देखील होणार आहे. बिकेसी ते नवी मुंबई विमानतळ भुयारी बोगदा करतोय.विरार ते वाढवणपर्यंत आपण रस्ते करतोय अशी माहिती शिंदे यांनी दिली. मुंबईबाहेर गेलेल्या मुंबईकराला परत आणण्याचे काम आम्ही करू. सूर्य चंद्र आले, कुणाच्या सात पिढ्या खाली आल्या तरी मुंबई महाराष्ट्रापासून कुणी तोडू शकत नाही. झोपडी धारकांची माहिती डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणण्याचे काम करतोय असे एकनाथ शिंदे म्हणाले. मुंबईकरांसाठी बाळासाहेब ठाकरेंच्या जन्मशताब्दी दिनी २३ जानेवारी निमित्त योजना पुष्प अर्पण करणार आहोत.विधिमंडळाच्या मध्यवर्ती सभागृहात बाळासाहेबांचे तैलचित्र आम्ही लावले. मी मुख्यमंत्री झाल्यावर आयुक्तांना बोलवून निर्णय घेतला आणि आपण ३०० एकरचे सेंट्रल पार्क आज करत आहे.पंतप्रधान मोदींच्या जन्मदिनी आम्ही राज्यातील सर्व शहरांतील गार्डनसाठी पैसे दिले. राज्य सरकारने अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना १५ हजार कोटींची मदत दिली.निकष, नियम बदलून शेतकऱ्यांना मदत केली.त्यावर आता काहीजण कर्जमाफीचे विचारत आहेत.पण आम्ही शब्द दिला आहे, कर्जमाफी होणारच. काही जण बांधावर गेले, फोटो काढून आले.पण आम्ही शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ दिली नाही. सत्तेत येण्यापूर्वी दिलेला शब्द पाळणार, प्रिंटिंग मिस्टेक म्हणणार नाही.

# राज्याला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करण्याचे लक्ष्य

(पान १ वरून)

सभागृहातील सर्व नेत्यांना एकत्र येऊन रचनात्मक कार्यातून राज्याला वेगाने पुढे नेण्याचे आवाहन केले. विधानसभेत नियम २९३ अन्वये मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सविस्तर आढावा मांडला. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर आलेल्या विविध आव्हानांना सामोरे जात निर्णयक्षम आणि समन्वयातून कारभार केल्याचे त्यांनी सांगितले.

कोव्हिड काळ, विविध अडचणी याचा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आता या सर्व गोष्टी मागे टाकून महाराष्ट्र पुढे नेण्याचा प्रयत्न राज्य शासन करत आहे. अमृत महोत्सवी महाराष्ट्र घडवण्याच्या दिशेने वाटचाल करताना सभागृहातील सर्वांनी रचनात्मक कामातून राज्याच्या प्रगतीसाठी एकत्र यावे.अमृत महोत्सवाकडे वाटचाल करताना सकारात्मकता आणि विकासकेंद्रित दृष्टिकोन आवश्यक असल्याचे नमूद करत अब आगे बढ़ चुका हूँ मैं अब पग नहीं रुकने वाले, असे म्हणत विकासाच्या मार्गावर राज्याची वाटचाल थांबणार नसल्याचा निर्धार मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

**राज्य शासनाच्या योजना पुढील पाच वर्षेही चालणार**

राज्य शासनाच्या विविध योजनांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, 'लाडकी बहीण' योजना, शेतकऱ्यांसाठी मोफत वीज यांसह सर्व योजना सुरू असून त्या पुढील पाच वर्षेही सुरू राहतील.

**राज्याची आर्थिक स्थिती मजबूत**

राज्याची आर्थिक स्थिती मजबूत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, देशातील मोठ्या राज्यांचा विचार केल्यास आजही सर्व निकषांवर महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पात्र ठरते. राज्याच्या विकासासाठी कर्ज उभारणे आवश्यक असते आणि राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या २५ टक्क्यापर्यंत कर्ज उभारण्याची परवानगी असताना, केवळ १८.८७ टक्के कर्ज घेतले आहे. राजकोषीय तूटही तीन टक्क्यांच्या आत राखण्यात यश आले असून, लाडकी बहीण योजना आणि शेतकऱ्यांना मदत देऊनही हे शक्य झाले. कॅगने घालून दिलेल्या तिन्ही आर्थिक अटी पूर्ण केल्या असून, केंद्र सरकारने घालून दिलेल्या निकषांपेक्षा जास्त भांडवली गुंतवणूक महाराष्ट्राने केली आहे.

महाराष्ट्र राज्याने उद्योग, गुंतवणूक, रोजगार निर्मिती, ऊर्जा, कृषी आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केली असून देशात सर्वांगीण विकासाचा आदर्श उभा केला आहे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गुंतवणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र खूप पुढे गेला असून, केवळ सामंजस्य करार नाही, तर त्यांची अंमलबजावणी होत आहे.

दावोसमध्ये झालेल्या १७ लाख ५७ हजार ८०१ कोटी रुपयांच्या करारांपैकी ७५ टक्के करारांची अंमलबजावणी सुरू झाली आहे.विदेशी थेट गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात अव्वल असून, २०२४-२५ मध्ये विक्रमी १ लाख ६४ हजार ७७५ कोटी रुपयांची गुंतवणूक आली. देशाच्या एकूण गुंतवणुकीपैकी ३१ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे. २०२५-२६ मध्ये आतापर्यंत ९१,३३७ कोटी रुपये एवढी परकीय थेट गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये आलेली आहे.

# आयोजकाचा जामीन फेटाळला

(पान १ वरून)

१४,००० रुपयांपर्यंतची तिकिटे खरेदी केली होती. पण कार्यक्रमातील गोंधळामुळे सर्व काही उद्ध्वस्त झाले.चाहत्यांना त्यांच्या आवडत्या स्टारला जवळून पाहण्याची आशा होती. पण मेस्सी मैदानात प्रवेश करताच असंख्य राजकारणी, अधिकारी आणि मान्यवरांनी त्याला घेरले. दूरच्या गॅलरीतील प्रेक्षकांना काहीही दिसत नव्हते. संतप्त चाहत्यांनी अधिकाऱ्यांवर टीका करण्यास आणि खुर्च्या आणि बाटल्या फेकण्यास सुरुवात केली. सुरक्षा कर्मचाऱ्यांना मेस्सीला तातडीने बाहेर काढावे लागले.या घटनेनंतर कोलकाता पोलिसांनी मुख्य आयोजक शताद्रु दत्ता यांला ताब्यात घेतले. हैदराबादला जाताना विमानतळावर असताना त्यांला अटक करण्यात आली. दत्ता हा जीओएटी इंडिया टूर २०२५ चा मुख्य प्रवर्तक आहे,जो तो स्वतःचा उपक्रम असल्याचा दावा करतो.पोलिसांनी त्यांच्यावर गैरवर्तन आणि फसवणूकीचा आरोप केला. चाहत्यांना त्यांच्या तिकिटाचे पैसे परत केले जातील असे लेखी आश्वासन देखील देण्यात आले आहे.दत्ता यांला रविवारी विधाननगर न्यायालयात हजर करण्यात आले. त्यांच्या वकीलाने जामीनासाठी अर्ज केला, परंतू पोलिसांनी १४ दिवसांची कोठडी मागितली. न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळत दत्ता याला १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

## भारताने खडसावले

(पान १ वरून)

व्यक्त केली आहे.ढाकाचा आरोप आहे की, शेख हसीना भारतातून अशी विधाने करत आहेत, ज्यामुळे बांगलादेशमधील नेते आणि कार्यकर्ते हिंसक व दहशतवादी कारवायांसाठी प्रवृत्त होऊ शकतात.भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने पुन्हा स्पष्ट केले की,बांगलादेशला अस्थिर करण्याच्या कोणत्याही प्रयत्नांमध्ये भारताचा सहभाग नाही. तसेच, भारताने कधीही आपल्या भूमीवरून बांगलादेशच्या जनतेच्या हितांच्या विरोधात कोणत्याही प्रकारच्या कारवायांना परवानगी दिलेली नाही, असे मंत्रालयाने ठामपणे सांगितले. भारताने असेही नमूद केले की निवडणुकांच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी बांगलादेशच्या अंतरिम सरकारची आहे. मंत्रालयाने अपेक्षा व्यक्त केली आहे की,बांगलादेश सरकार शांततापूर्ण आणि सुरक्षित निवडणुका पार पाडण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलेल.

# वेश्या व्यवसायप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल

■ इचलकरंजी,ता.१४-

**कबनूर येथे हेरिटेज लॉजिंग अ‍ॅण्ड फार्म हाऊसमध्ये सुरू असलेल्या वेश्या व्यवसायाचा कोल्हापूर पोलिसांनी पर्दाफाश केला. याप्रकरणी हॉटेल मालक, सध्याचा मालक, हॉटेल व्यवस्थापक, एजंट अशा चार जणांवर शिवाजीनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत रोख रकमेसह मोबाईल, वाहने असा एकूण १ लाख २ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

कबनूर हद्दीत हेरिटेज लॉजिंग अँड फार्महाऊस लॉजिंगच्या नावाखाली एजंट पंकज विठ्ठल चव्हाण (रा.शहापूर) याच्या माध्यमातून वेश्या व्यवसाय चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार कोल्हापूर पोलिसांच्या पथकाने लॉजवर छापा टाकला. त्यावेळी तेथे वेश्या व्यवसाय सुरू असल्याचे निदर्शनास आले. संतोष पाटील हा बेकायदेशीर वेश्या व्यवसाय चालवत असल्याचे माहीत असतानाही अमित देमण्णा यांनी स्वतःचा मालकीचा लॉजिंग व्यवसाय संतोष पाटील याला दिल्याची माहिती उघड झाली.

एजंट पंकज विठ्ठल चव्हाण (वय ४०, रा.शहापूर), लॉज चालक संतोष सुरेश पाटील (वय ४४, रा. षटकोन चौक, इचलकरंजी), मॅनेजर नेमीनाथ दादा आवटे (वय ४०, रा. दत्तनगर, कबनूर) आणि लॉजचा मुळ मालक अमित आण्णासो देमण्णा या चारजणांवर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईप्रसंगी लॉजवर दोन महिलाही मिळून आल्या. कारवाईत पोलिसांनी रोख रकमेसह १ लाख २ हजार ७६० असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तपास सपोनि वायदंडे करीत आहेत.

## पत्नीच्या छळप्रकरणी पतीवर गुन्हा दाखल

■ इचलकरंजी,ता.१४-

नांदवून घेण्यास नकार देण्याबरोबरच माहेरहून सोने, पैसे घेऊन यावे यासाठी पत्नीचा शारिरीक व मानसिक छळ केल्याप्रकरणी सागर सदाशिव पाटील याच्याविरूध्द शिवाजीनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पत्नी पूजा सागर पाटील यांनी फिर्याद दिली आहे. पूजा आणि सागर यांचा विवाह २०२३ साली झाला आहे. पती सागर हा किरकोळ कारणातून पत्नी पूजा हिला सतत शिवीगाळ करून मारहाण करतो. तसेच उपाशी ठेऊन सासरी नांदवून घेण्यास नकार देत असून माहेरहून सोने व पैसे आणण्यासाठी तगादा लावत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### || दुःखद निधन ||




**कै. रामचंद्र बळवंत देवमोरे**

आमचे वडिल
श्री. रामचंद्र बळवंत देवमोरे यांचे शनिवार,दि.१३/१२/२०२५ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

**सुरेश रामचंद्र देवमोरे**
**देवमोरे परिवार, इचलकरंजी**
**सोनाली टेक्सकॉम**
**आदिनमन टेक्स्टाईल**

रक्षाविसर्जन : आज सोमवार सकाळी ८ वा. पंचगंगा नदीतिरी आहे.

### || तृतीय स्मृतिदिन ||



**स्व.यशवंतराव विठ्ठलराव गायकवाड**

सदैव आपल्या आठवणीत...

श्रीमती सविता यशवंतराव गायकवाड
संजय यशवंतराव गायकवाड
गोपाळ उर्फ अजय यशवंतराव गायकवाड
गोविंद उर्फ पृथ्वीराज यशवंतराव गायकवाड
गोरख उर्फ शिवराज यशवंतराव गायकवाड
उर्मिला, माधुरी, मनिषा
राजवर्धन * इंद्रजित * उदयन * अम्रपाली
**इंद्रायणी व गायकवाड परिवार**
मंगळवार पेठ, इचलकरंजी.

### प्रथम पुण्यस्मरण



**कै. प्रसाद संजय डिंगणे (गुरू)**

वाटले नव्हते कोणालाही
असे अघटीत घडून जाईल
चालता-बोलता देव तुला
अचानक घेऊन जाईल.
**Miss You Guru**

आजी * मम्मी-पप्पा
लाडकी बहिण * लाडका विशाल दादा
पुजा वहिनी
संजय मनोहर डिंगणे व परिवार

### नववे पुण्यस्मरण



**श्री. भानुदास पांडुरंग कवडे**

चंदनापरी देह झिजविला
कष्टातूनी वसंत फुलविला
नाही उरली साथ आम्हाला
तुमची आठवण येते क्षणाक्षणाला
आपल्या पवित्र स्मृतिस
विनम्र अभिवादन !

**आनंद उर्फ बबन भानुदास कवडे**
**व कवडे परिवार**
विकासनगर, इचलकरंजी

### || भावपूर्ण श्रद्धांजली ||



**कै. श्रीमती कमलादेवी जयपाल गिरमल**

आमच्या पतसंस्थेचे व्हा. चेअरमन श्री. विजय जयपाल गिरमल यांच्या मातोश्री श्रीमती कमलादेवी जयपाल गिरमल यांचे रविवार दि. १४/१२/२०२५ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली. गिरमल परिवारास हे दुःख सहन करणेची परमेश्वर ताकद देवो.

**चेअरमन, सर्व संचालक मंडळ, सभासद व कर्मचारी**
**श्री वर्धमान नागरी सहकारी पतसंस्था लि., इचलकरंजी.**

रक्षाविसर्जन- सोमवार दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८.३० वा. आहे.


धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज स्मारक
वस्त्रनगरी इचलकरंजीचा सुवर्णक्षण
धर्मवीर छत्रपती श्री.संभाजी महाराज पुर्णाकृती पुतळा
श्री.शंभूतीर्थ
लोकार्पण सोहळ्यास भगव्या शुभेच्छा!
शिवसेना
रविंद्र माने
शिवसेना कोल्हापूर जिल्हाप्रमुख
शिवसेना कोल्हापूर जिल्हा


धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज
पूर्णाकृती पुतळा
'श्री शंभूतीर्थ'
लोकार्पण सोहळ्यास
हार्दिक शुभेच्छा...
मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस
तसेच श्री शिवशंभू भक्तांचे
सहर्ष स्वागत!
ॲड. अलका अशोक स्वामी
मा. नगराध्यक्षा, इचलकरंजी नगरपालिका,इचलकरंजी.
संग्राम अशोक स्वामी

■ संपादकीय ■

# मेक्सिकोचा तडाखा

अमेरिकेसोबतच्या व्यापार कराराबाबतची अनिश्चितता कायम असताना आता मेक्सिकोने भारतासह आशियातील प्रमुख उदयोन्मुख अर्थव्यवस्थांवर लागू केलेल्या वाढीव आयातशुल्कांच्या निर्णयाने जागतिक व्यापाररचनेच्या किलकिल्या होऊ लागलेल्या संकल्पनांना नवा तडा दिला आहे. २०२६ च्या सुरुवातीपासून अंमलात येणाऱ्या या शुल्कवाढीचा परिघ आणि तीव्रता लक्षात घेतल्यास हा निर्णय केवळ आर्थिक संरक्षणवादाचा परिचित आविष्कार म्हणता येणार नाही. त्यामागे वर्तमानातील भू-राजकीय तणावांची पार्श्वभूमी असल्याचे स्पष्ट होते. स्वतः अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या उच्च शुल्कांच्या दबावाला तोंड देणारा मेक्सिको आता भारत, चीन, व्हिएतनाम, दक्षिण कोरिया आणि थायलंडसारख्या व्यापार-स्पर्धकांवर त्याच शैलीतील शुल्कबडगा उगारत आहे, हा बहुस्तरीय व्यापारदबावाचा परिपाक म्हणावा लागेल. मेक्सिकन सिनेटने मंजूर केलेल्या नव्या शुल्करचनेप्रमाणे,ज्या देशांशी मुक्त व्यापार करार केलेला नाही अशा देशांतील वस्तूंवर तब्बल ५० टक्क्यांपर्यंत शुल्क लावण्याची तयारी मेक्सिकोने केलेली आहे. बहुतांश वस्तूंवरील मर्यादा सुमारे ३५ टक्क्यांवर स्थिरावली असली तरी काही महत्त्वाच्या औद्योगिक श्रेणींमध्ये ५० टक्क्यांचे दर स्पष्ट संरक्षणवादी संदेश देणारे आहेत. या निर्णयाला मेक्सिकोच्या आर्थिक स्थितीचीही पार्श्वभूमी आहे. मेक्सिकोतील उत्पादनवाढीतील मंदी, बेरोजगारीचे वाढते सावट, राजकोषीय तुटीतील चिंताजनक प्रवाहह्न त्यामुळे देशांतर्गत राजकारणात या शुल्कवाढीला पाठिंबा मिळणे अपरिहार्य होते. राष्ट्राध्यक्षा क्लॉडिया शाईनबौम यांच्या प्रशासनाने या निर्णयाचे औद्योगिक संरक्षण आणि रोजगारांसाठी ढाल म्हणून कौतुक केले आहे. ऑटोमोबाईल्स, पोलाद, प्लास्टिक, वस्त्रे आणि विविध उपभोग्य वस्तूंतील आयात स्पर्धेने स्थानिक उत्पादनक्षेत्र ढवळून निघत असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याचे आणि स्थानिक उत्पादन क्षमतांना बळ देण्याचे उद्दिष्ट या शुल्करचनेतून साधले जाईल, असे सरकारचे स्पष्ट मत आहे. दुसऱ्या बाजूला, या निर्णयामुळे मेक्सिकोच्या तिजोरीत २०२६ सालात सुमारे ३.७ अब्ज डॉलरची अतिरिक्त भर पडेल, असा अंदाज आहे. याचा उपयोग सरकारची वित्तीय तूट भरून काढण्यासाठी केला जाईल. अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास या धोरणाला अनेक छटा आहेत. वाढीव शुल्कांचे तात्कालिक लाभ निश्चित असले तरी दीर्घकालीन औद्योगिक क्षमता, जागतिक पुरवठा साखळ्या आणि उत्पादनक्षेत्रातील स्पर्धात्मकता या सर्व घटकांवर त्याचे परिणाम गुंतागुंतीचे ठरणार आहेत. शुल्कवाढ म्हणजे देशांतर्गत उत्पादनाकडे मागणीचे आकर्षण वळविण्याचा सरळ तत्त्वाधारित प्रयत्न; परंतु याच तत्त्वाला उलट दिशेचे दुष्परिणामही जोडलेले असतात. स्थानिक उत्पादकांना कच्च्या मालासाठी जादा पैसे मोजावे लागल्याने मेक्सिकोमध्ये महागाई वाढण्याची दाट शक्यता आहे. तथापि, या निर्णयामागे अमेरिकेचा दबाव किती आणि कोठवर आहे, हा प्रश्न निर्णायक ठरतो. याचे कारण अमेरिका हा मेक्सिकोचा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे. मेक्सिकोने आशियाई आयातदारांवर केलेली शुल्कवाढ अमेरिकेला खूश ठेवण्याचा एक धोरणात्मक प्रयत्न असू शकतो. 'युनायटेड स्टेटस्- मेक्सिको-कॅनडा ॲग्रीमेंट' या कराराच्या पुनरावलोकनासाठी लवकरच होणाऱ्या बैठकीतील अडचणी टाळण्यासाठी मेक्सिकोने हे पाऊल उचलल्याचे मानले जाते. भारतावर याचे परिणाम पाहता, दोन्ही देशांच्या व्यापाराची स्थिती स्पष्टपणे भारताच्या बाजूने झुकलेली आहे. भारतातून मेक्सिकोला होणारी निर्यात पाच अब्ज डॉलर्सपलीकडे गेली असून त्यात ऑटोमोबाईल्सचा वाटा मोठा आहे. व्हॉल्क्सवॅगन, ह्युंडाई, निसान आणि मारुती सुझुकी या प्रमुख कंपन्यांची वाहने मोठ्या प्रमाणावर मेक्सिकोला निर्यात केली जातात. प्रवासी वाहनांची जवळपास एक अब्ज डॉलर्सची निर्यात भारतासाठी महत्त्वाची आहे. याखेरीज भारतीय यंत्रसामग्री, विद्युत उपकरणे, औषधनिर्मिती उत्पादने, रसायने, ॲल्युमिनियम आणि पोलाद हेही मेक्सिकोला होणाऱ्या निर्यातीतील प्रमुख घटक आहेत. वाहनांवरील शुल्क २० टक्क्यांवरून थेट ५० टक्क्यांवर गेल्यामुळे भारतीय उत्पादकांना मेक्सिकोला होणारी निर्यात आर्थिकदृष्ट्या तोट्यात जाऊ शकते. दक्षिण आफ्रिका आणि सौदी अरेबियानंतर मेक्सिको ही भारतासाठीची तिसऱ्या क्रमांकाची सर्वांत मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळे भारतीय उत्पादकांना या आयात शुल्कवाढीचे व्यवस्थापन करताना अधिक उत्पादनातून खर्चकपात साधणे, देशांतर्गत मागणी मंदावल्यास परदेशी निर्यात वापरून ती भरून काढणे, मार्जिन टिकवून ठेवणेह्न या सर्व पद्धतींचे पुनर्मूल्यांकन करण्याची वेळ आली आहे. जगभरात संरक्षणवाद वाढत असला आणि जागतिक व्यापारसंस्थेचे महत्त्व हळूहळू कमी होताना दिसत असले तरी ज्या अर्थव्यवस्था दीर्घकालीन दृष्टिकोन ठेवून पुरवठा साखळ्यांचे प्रबळ विविधीकरण करतात, त्या या नव्या जगात अधिक स्थिर राहतील, हेही तेवढेच खरे आहे.

# दिग्गज, अभ्यासू काँग्रेस नेते

**लातूर जिल्ह्याचे सुपुत्र, अभ्यासू, मितभाषी, स्वच्छ प्रतिमेचे ज्येष्ठ काँग्रेस नेते शिवराज पाटील चाकूरकर यांनी १२ डिसेंबर रोजी सकाळी देवघर या निवासस्थानी अखेरचा श्वास घेतला. ते ९० वर्षांचे होते.**



गत काही दिवसांपासून वृद्धापकाळाने ते आजारी होते. राहत्या घरीच त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांच्या मागे एक मुलगा, मुलगी, सून, दोन नाती असा परिवार आहे. गत काही दिवसांपासून त्यांची प्रकृती सतत खालावत चालली होती. वृद्धापकाळ आणि दीर्घकालीन आजारामुळे त्यांच्यावर घरीच उपचार सुरू होते. १२ ऑक्टोबर १९३५ रोजी लातूर जिल्ह्यातील चाकर गावी जन्मलेल्या शिवराज पाटील यांनी काँग्रेसच्या माध्यमातून राजकारणात सक्रिय प्रवेश केला. शिवराज पाटील चाकूरकर यांनी आपल्या दीर्घ राजकीय प्रवासात भारतीय राजकारणात अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या. लोकसभा अध्यक्षपद, गृहमंत्रिपद, संरक्षण मंत्रालयातील योगदान, तसेच राज्यपाल पदापर्यंतची त्यांची वाटचाल अत्यंत उल्लेखनीय होती. देशातील संवैधानिक प्रक्रियांमध्ये त्यांनी केलेले काम कायम स्मरणात राहील. त्यांचा जन्म १२ तारखेचा आणि निधनही १२ तारखेलाच हा विचित्र योगायोग म्हणावा लागेल. लातूर लोकसभा मतदारसंघातून त्यांनी तब्बल सात वेळा विजय मिळवला. २००४ मध्ये झालेल्या पराभवानंतरही त्यांचा प्रभाव कमी झाला नाही. राज्यसभेतून ते पुन्हा केंद्रीय राजकारणात परतले आणि २००४ ते २००८ या काळात त्यांनी गृहमंत्रिपदाची जबाबदारी सांभाळली. त्यापूर्वी त्यांनी इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या मंत्रिमंडळात संरक्षण राज्यमंत्री म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. १९९१ ते १९९६ या कालावधीत ते देशाचे दहावे लोकसभा अध्यक्ष होते. गृहमंत्रिपदाचा कार्यकाळ संपल्यानंतर २०१० ते २०१५ या काळात त्यांनी पंजाब राज्याचे राज्यपाल आणि चंदिगडचे प्रशासक म्हणून काम पाहिले. चाकूरकरांच्या कारकीर्दीतील सर्वाधिक चर्चेत आलेली घटना म्हणजे २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यानंतरचा (२६/११) वाद. या हल्ल्यात सुरक्षाविषयक त्रुटी समोर आल्याने त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात टीका झाली. हल्ल्यानंतर दोन दिवसांनी, ३० नोव्हेंबर २००८ रोजी त्यांनी गृहमंत्रिपदाचा राजीनामा देत नैतिक जबाबदारी स्वीकारली. त्या काळात त्यांची वारंवार बदलणारी वेशभूषा देखील चर्चेचा विषय ठरली होती. चाकूरकर यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आणि देशाच्या प्रशासकीय कारभारात मोठी आणि महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. १९७३ साली ते प्रथम लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले. त्याअगोदर १९६७ ते ६९ या काळात लातूर नगरपालिकेत नगराध्यक्ष म्हणून काम करत त्यांनी राजकारणातील पहिली पायरी गाठली. त्यानंतर १९८० मध्ये ते पहिल्यांदा लातूर लोकसभा मतदारसंघातून निवडून आले आणि त्यानंतर सलग सात वेळा लोकसभेत पोहोचत त्यांनी प्रभावी नेतृत्वाचे दर्शन घडवले. शिवराज पाटील चाकूरकर, विलासराव देशमुख आणि शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी महाराष्ट्रात एक काळ गाजवला होता. पैकी शिवराज पाटील आणि विलासराव देशमुख केंद्रीय राजकारणातही चमकले, नव्हे त्यांनी आपली छाप पाडली. इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्या मंत्रिमंडळात शिवराज पाटील चाकूरकर यांच्यावर संरक्षण राज्यमंत्री, वाणिज्य, विज्ञान-तंत्रज्ञान, अणुऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स व अवकाश अशा अनेक महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी सोपवण्यात आली होती.

दैनंदिनी

त्यांच्या शांत, अभ्यासू आणि संतुलित कार्यपद्धतीमुळे ते दिल्लीच्या राजकीय वर्तुळात विशेष ओळखले जात. १९९१ ते ९६ या कालावधीत ते देशाचे दहावे लोकसभा अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात संसदेचे आधुनिकीकरण, संगणकीकरण, कामकाजाचे थेट प्रसारण आणि संसद ग्रंथालयाच्या नव्या इमारतीसाठी त्यांनी मोठे योगदान दिले. कधी कोणाविषयी राजकीय टीका आपल्या भाषणातून तर सोडा खासगीमध्ये देखील त्यांनी केली नाही. कोणाच्या विरोधात बोलणे अथवा आपल्या विरोधकाविषयी सुद्धा अपशब्द न काढणे हे देखील शिवराज पाटील यांच्या राजकारणाचे एक वैशिष्ट्य राहिले आहे. ज्येष्ठ काँग्रेस नेते शिवराज पाटील यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शहा, नितीन गडकरी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस नेते राहुल गांधी, प्रियंका गांधी-वढेरा, के. सी. वेणुगोपाल यांच्यासह अनेक नेत्यांनी शोक व्यक्त केला. या नेत्यांनी शिवराज पाटील यांच्या दीर्घ सार्वजनिक जीवनाचे आणि लोकसभेचे अध्यक्ष, केंद्रीय मंत्री,राज्यपाल आणि संसद सदस्य म्हणून दिलेल्या योगदानाचे स्मरण केले.समाजाच्या कल्याणासाठी योगदान देण्याच्या ध्येयाने ते झपाटले होते. लोकसभेच्या अध्यक्षांसह विविध केंद्रीय मंत्रिपदांची जबाबदारी सांभाळताना त्यांनी प्रशासकीय कौशल्य आणि समाजसेवेची वचनबद्धता दाखवली. अशा या अजातशत्रूला भावपूर्ण श्रद्धांजली.

**माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना ...**

**मुख्यमंत्री झाल्यानंतरची आपली इचलकरंजी नगरीत ही दुसरी भेट आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरणा निमित्त व शहरातील विविध विकास कामांच्या उद्घाटनासाठी आपले इचलकरंजी नगरीत सर्वप्रथम सहर्ष स्वागत .या भेटीनिमित्त या खुल्या पत्रातून आपणास निवेदन आहे की,इचलकरंजी शहराचे अनेक मूलभूत व महत्वाचे प्रलंबित प्रश्न आहेत.इचलकरंजी शहरातून शासन दरबारी दरवर्षी तब्बल ५००० कोटी जीएसटी जमा होतो. पण त्यामानाने शहराला सोयीसुविधा मिळत नाहीत हे वास्तव आहे.मागील भेटीप्रसंगी आपण या प्रलंबित प्रश्नांविषयी आश्वासने दिली होती,त्या आश्वासनांची लवकरात लवकर पूर्तता व्हावी अशी तमाम इचलकरंजीवासियांची अपेक्षा आहे.**



# आश्वासनांची पूर्तता व्हावी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून इचलकरंजीवासियांच्या अपेक्षा

इचलकरंजी शहराचा सर्वात महत्वाचा व जिव्हाळ्याचा पाणीप्रश्न अद्यापही मार्गी लागला नाही. शहरात विविध प्रभागात सध्या पाच ते सहा दिवसा आड पाणी येते .ते ही अस्वच्छ व अपुरे. त्यामुळे देवाभाऊ आपल्या लाडक्या बहिणींना पाण्यासाठी वणवण करावी लागते. खूप मोठा पाण्यासाठी संघर्ष व त्रास सोसावा लागतो . इतके मोठे शहर असूनही पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो. हे शहराचे दुर्दैव आहे. कृष्णा पाणी योजनेला वारंवार गळती लागते व पंचगंगा नदी प्रदूषित झाल्यामुळे मर्यादा येतात. त्यापैकी शासनाने मंजूर केलेल्या सुळकुड पाणी योजनेला मोठा विरोध होत आहे. सुळकुड योजनेचे पाणी इचलकरंजी शहरासाठी राखीव असुनही या योजनेला कागल तालुक्यातून विरोध होत आहे.इचलकरंजीला पाणी देण्यासाठी चोहोबाजूने विरोध होत आहे. आपल्या हस्ते पायाभरणी झालेली दानोळी योजना बारगळली. यासाठी योग्य तो राजकीय समन्वय साधून सुळकुड योजनेचे पाणी इचलकरंजीवाशीयांना मिळायला हवे. साहेब आपण इचलकरंजी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने शहरात थोरात चौकातील भर सभेत इचलकरंजीवासीयांना पाण्यासंबंधी आश्वासन दिले होते की स्थानिक आमदार यांना सोबत घेऊन पाण्याचा प्रश्न सोडवला जाईल. त्यामुळे शहराला २४ तास पाणी उपलब्ध होईल .सुळकुड पाणी कृती समिती स्थापन झाली. मंत्रालयात बैठका झाल्या तसेच या योजनेसाठी अनेक मोर्चे, आंदोलने व उपोषण आपल्या लाडक्या बहिणींनी केले. परंतु तरीही सुळकुड योजना अजूनही अधांतरीच आहे.तसेच इचलकरंजीचा आणखीन एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या मोठ्या शहरात रेल्वे मार्ग नाही.या रेल्वेमार्गासाठी आपण केंद्रीय स्तरावर योग्य तो पाठपुरावा करावा. जेणेकरुन इचलकरंजी वासियांचे रेल्वेचे स्वप्न पूर्ण होऊ शकेल.

इचलकरंजी महापालिकेची जीएसटी परतावा रक्कम योग्य वेळी मिळणे गरजेचे आहे . गेली ४० वर्षेहुन अधिक शहरातील अनेक मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी कार्डवर क १ शेरा पडल्याने अनेक मालमत्ता धारकांना गुंठेवारीमुळे जमीन खरेदी विक्री करता येत नाही व कर्ज मिळत नाही. यातून योग्य तो मार्ग काढून मालमत्ता धारकांना दिलासा द्यावा.इचलकरंजी शहर तालुका होणे आवश्यक आहे.यासाठी आपण योग्य तो पाठपुरावा करावा. शेती उत्पादनानंतर वस्त्रोद्योग दोन नंबरला येतो .शहरातील यंत्रमाग उद्योगाचे अनेक प्रश्न आहेत.वीजदर सवलत व दर स्थिर ठेवणे आवश्यक आहे. यासाठी योग्य तो बूस्टर डोस आपण द्यावा. वस्त्रोद्योगासाठी सोलरच्या माध्यमातून वीज पुरवठा करता येईल का याचा ही अभ्यास व्हावा. त्यामुळे तोट्यात आलेला उद्योग सावरू शकेल. शहरातील शिवतीर्थचे दुसऱ्या टप्प्यातील सुशोभीकरणासाठी निधी उपलब्ध व्हावा.इचलकरंजी जिल्हा सत्र न्यायालयाची इमारत अपुरी पडत आहे. यासाठी योग्य ती जागा उपलब्ध करून भव्य अशी न्यायालयाची इमारत शहरात उभी राहावी. त्यामुळे न्यायदान करण्याचे काम सोपे होईल. महापालिकेच्या प्राथमिक शाळांचे दिल्लीचे धरतीवर विकास होण्यासंबंधी निधी उपलब्ध व्हावा.

इचलकरंजी शहरातील प्रदूषणाचा मोठा प्रश्न आहे .पंचगंगा नदी प्रदूषण मुक्त झाली पाहिजे यासाठी योग्य तो निधी उपलब्ध व्हावा.केंद्र सरकारकडून इचलकरंजी शहरासाठी २५ पी. एम. ई बस मंजूर आहेत.तसेच ई बस लवकर व सक्षमपणे चालू होणे संबंधी आपण योग्य तो आदेश द्यावा. इचलकरंजी शहरातील प्रलंबित असणाऱ्या या मागण्यांची दखल घेऊन यासंबंधी आपण संबंधित विभागाला आदेश द्यावेत,व त्या मागण्यांची त्वरीत पुर्तता व्हावी हिच आपणाकडून नम्र अपेक्षा.

▮दीपक पंडित,इचलकरंजी

# प्रवाशांच्या हिताचा नवा कायदा आणा

देशातील सर्वात मोठी विमान कंपनी असलेल्या इंडिगो एअरलाइन्सच्या बेजबाबदारपणामुळे मागील आठवडाभरापासून हजारो विमान प्रवासी त्रस्त झालेले आहेत. वास्तविक इंडिगो ही भारतातील सर्वात मोठी विमानसेवा देणारी कंपनी आहे. या कंपनीने भारताच्या हवाई क्षेत्राचा ६५ टक्के हिस्सा व्यापला आहे. पण गेल्या दहा दिवसात या विमान सेवेचे जे वाभाडे निघाले त्याने कंपनीचा फुगा फुटला आणि विमान कंपन्यांना मुक्त वाव देण्याच्या राष्ट्रीय धोरणावरही प्रश्नचिन्ह उभं राहिलं. अर्थात हे काही पहिल्यांदाच घडलं असं नाही आज जे इंडिगोचे झाले तेच याआधी किंगफिशर, जेट एअर लाईन, गो एअर, स्पाइस जेट या विमानसेवा देणाऱ्या कंपन्यांचे देखील झाले. या विमानसेवा देणाऱ्या कंपन्या देखील इंडिगो प्रमाणेच प्रवाशांना सुविधा देण्यात अपुऱ्या ठरल्या आणि त्यांना गाशा गुंडाळावा लागला. विमानसेवा देणाऱ्या कंपन्यांच्या बेजबाबदारपणा मुळे प्रवाशांना मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. शिवाय यामुळे जगभरात भारताची जी नाचक्की होते ती वेगळीच. मागील काही वर्षात विमान सेवांचं, विमान तळांचं खाजगीकरण झालं, बऱ्याच कंपन्या बुडल्या, बऱ्याच नव्याने वाढल्या त्यांच्या शेअरचे भाव वाढले मात्र प्रवाशांना सुविधा मिळाल्या नाही उलट विमान कंपन्यांची एकाधिकारशाही वाढली. या एकाधिकारशाहीमुळेच भारताच्या विमान सेवेचे तीनतेरा वाजले. विमान प्रवाशांची संख्या सातत्याने वाढत असताना, सरकार हवाई क्षेत्राला बळकटी देत असताना भारताच्या विमान सेवेचे जगासमोर जे चित्र जातंय ते मात्र खूपच केविलवाणे आहे. विदेशात विमान सेवा देणाऱ्या कंपन्यांना जसा कठोर कायदा आहे तसा कठोर कायदा भारतात नाही त्यामुळेच विमानसेवा देणाऱ्या कंपन्यांची एकाधिकारशाही वाढत चालली आहे आणि त्याचा भुर्दंड प्रवाशांना भोगावा लागत आहे. विमानसेवा देणाऱ्या कंपन्यांवर नियंत्रण आणण्यासाठी आणि प्रवाशांच्या हितासाठी सरकारने नवीन कायदा आणायला हवा. जुना कायदा विमानसेवा देणाऱ्या कंपन्यांची एकाधिकारशाही मोडीत काढण्यात अपयशी ठरत आहे. नव्या कायद्यात विमानसेवा देणाऱ्या कंपन्या प्रवाशांना सुविधा देण्यात अपयशी ठरल्या तर त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची तरतुद करायला हवी.



▮ श्याम ठाणेदार

## वाचकांचा पत्रव्यवहार

# आयपीएलचा लिलाव सलग तिसऱ्यांदा परदेशात

क्रिकेट जगतातील सर्वात श्रीमंत, प्रतिष्ठित आणि लोकप्रिय मानल्या जाणाऱ्या इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएल टी-ट्वेन्टी क्रिकेट लीगचा मिनी लिलाव सलग तिसऱ्यांदा देशाबाहेर होत असल्याने भारतीय क्रिकेट चाहत्यांमध्ये सखेद आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. २०२४ चा लिलाव संयुक्त अरब अमिरातीमधील दुबईमध्ये झाला होता. त्यानंतर २०२५ चा मेगा लिलाव सौदी अरेबियातील जेद्दाह येथे झाला, तर आता आगामी २०२६ चा मिनी लिलाव १६ डिसेंबरला संयुक्त अरब अमिरातीच्याच अबू धाबीमधील एतिहाद एरिना येथे होणार आहे. वास्तविक मोठ मोठे प्रायोजकत्वाचे करार, खेळाडूंना उच्च मानधन, प्रचंड प्रेक्षकसंख्या आणि एकूणच प्रचंड आर्थिक सामर्थ्यामुळे जागतिक पातळीवर आयपीएल एक प्रमुख टी-ट्वेन्टी क्रिकेट स्पर्धा बनली आहे आणि २०२६ मध्ये ती सलग १९ व्यांदा खेळविली जाणार आहे. अशा परिस्थितीत आयपीएल लीग ही पूर्णतः भारतीय असताना तसेच लिलावातून यजमान शहराला मिळणारा पर्यटन महसूल, आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळणारी ओळख, हॉटेल, टॅक्सी सेवा, कॅटरिंग सेवा इत्यादी स्थानिक लोकांना मिळणारा रोजगार या सर्वांवर पाणी सोडून आयपीएल लीगचा लिलाव परदेशात का? असा प्रश्न क्रिकेट वर्तुळात विचारला जात आहे.

डिसेंबर, जानेवारीमध्ये भारतात लग्नाचा हंगाम असल्यामुळे देशातील सर्व मोठी हॉटेले, रिसॉर्ट लग्नासाठी बुक केलेली असतात. त्यामुळे लिलावासाठी देशभरात योग्य जागा मिळत नाही. त्यामुळे यावेळीही लिलाव परदेशात आयोजित करण्याचा निर्णय घेतल्याचे हास्यास्पद कारण भारतीय क्रिकेट बोर्डाने सांगितले आहे.

▮ प्रदीप मोरे

# पुणे पुस्तक महोत्सव साहित्यप्रेमींसाठी मेजवानी


१३ डिसेंबर ते २१ डिसेंबर दरम्यान पुण्यामध्ये पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये सर्व भारतीय भाषांतील नामवंत प्रकाशनांची ८०० दालने उपलब्ध आहेत. सांस्कृतिक,शैक्षणिक आणि साहित्यप्रेमींना कार्यक्रमाबरोबरच पुस्तकांची मेजवानी मिळणार आहे.यात भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त विशेष दालन असणार आहे.याशिवाय सांस्कृतिक कार्यक्रमाचे विशेषतः संगीत,लोककला,भक्ती गीत आणि शास्त्रीय स्वरांची विविध रंगांनी नटलेल्या या सांस्कृतिक मैफिलीचा आनंद या पुस्तक महोत्सवात आपल्याला घेता येणार आहे,हे या महोत्सवाचे वैशिष्ट्य आहे.



'वाचाल तर वाचाल' या उक्तीप्रमाणे आपल्या ज्ञानात भर घालण्यासाठी हा पुस्तक महोत्सव उपयुक्त ठरणार आहे.त्याचबरोबर लहान मुलांसाठी चिल्ड्रन कॉर्नर तयार करण्यात आला आहे.यात शाळकरी विद्यार्थ्यांना चित्रकला,वक्तृत्व गायन,निबंध स्पर्धा बरोबरच पुस्तक लेखनाविषयी कार्यशाळा ही होणार असल्याने मुलांना आपले अनुभव विश्व अधिक समृद्ध करता येणार आहे.यंदाच्या महोत्सवात सहा दिवस पुणे लिटरेचर फेस्टिवलची वैचारिक पर्वणी यानिमित्ताने साहित्यप्रेमींना अनुभवता येणार आहे.प्रत्येकाने या पुणे पुस्तक महोत्सवाला भेट द्यावी.तसेच वाढदिवस,सांस्कृतिक आदी कार्यक्रमांसाठी पुष्पगुच्छ,शॉल आदींवर खर्च करण्यापेक्षा महोत्सवात पुस्तके खरेदी करून ती भेट दिल्यास या पुस्तक महोत्सवाचा उद्देश सफल होईल.पुस्तक महोत्सवात विविध साहित्यिकांचे पुस्तके उपलब्ध होणार असल्याने ही पुस्तके खरेदी करता येणार आहे हे विशेष.चला तर पुणे पुस्तक महोत्सवाला भेट देवूया!

▮ शशिकांत जाधव

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**सोमवार,ता.१५.१२.२०२५**,विक्रमसंवत २०८२ शिवशक ३५२,शालिवहन शके १९४७,विश्वावसुनाम संवत्सरे दक्षिणायणे,हेमंत ऋतो,मार्गशीर्ष मासे,कृष्ण पक्षे,एकादशी तिथी,२१.२० नंतर द्वादशी तिथी,चित्रा नक्षत्र,११.०९ नंतर स्वाती नक्षत्र,तुळ रास,शोभन योग, १२.२० नंतर अतिगंड योग, बव करण,८.०४ नंतर, बालव करण २१.२० पर्यंत,दिनमान११.००,सुर्योदय६.५७,सुर्यास्त १७.५७, (कोल्हापूरचे) राहू काळ सकाळी. ७.३० ते ९,सफला एकादशी, उत्तम दिवस दुपारी १२ ते ३ सोडून, सर्व कामास शुभ, ओटी भरणेस,नवीन धान्य खाणे,जनार्दन स्वामी पु.दि.औरंगाबाद, रविमुळे धनुष्येर्क,२८.२१ वा.,दग्ध २१.२० पर्यंत, घबाड ११.०९ ते २१.२०,लक्ष्मीसेन महा.पु.दि. कोल्हापूर.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य ✻

**मेष**-महत्त्वाच्या आर्थिक करारांच्या वेळी आकस्मिक विचार करून निर्णय घेऊ नका. इतरांशी आनंदाचे क्षण वाटल्यामुळे तुमची प्रकृती ताजीतवानी होईल.

**वृषभ**-प्रदीर्घ काळापासून तुम्ही अनुभवत असलेले आयुष्यातील तणाव आणि ओढाताण यापासून थोडे मुक्त व्हाल. तुमच्या व्यक्तित्वात सकारात्मक परिवर्तन येईल.

**मिथून**-तुम्हाला मानसिक शांती मिळेल. घरातील आयुष्य शांततापूर्ण आणि मोहक असेल.आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळेल.

**कर्क**-तातडीच्या कामामुळे तुमच्या योजना बारगळतील.ऐतिहासिक स्थळांवर कुटुंबाची छोटीशी पिकनिक प्लॅन करा.धन लाभ होऊ शकतो.

**सिंह**-आत्मविश्वास मजबूत करणे हे कमालीचे मदतगार ठरू शकते.नोकरीच्या ठिकाणी तुमच्या कामाची आज स्तुती होईल. प्रलंबित कामे पूर्ण करा.

**कन्या**-तुम्हाला कामाचे चांगले फळ मिळेल.आर्थिक स्थिती सुधारेल.तुम्ही कुठल्यातरी मोठ्या अडचणींमधून निघू शकता.नातेवाईकांच्या येण्याने आनंदी वातावरण राहील.

**तुळ**-तुमच्या भवतीच्या लोकांचा पाठिंबा मिळाल्याने तुम्ही आनंदी व्हाल.आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होईल.सरकारी कामात वडिलधाऱ्यांचा सल्ला घ्या.

**वृश्चिक**-नवे तंत्रज्ञान शिकणे हे आपले कौशल्य वाढविण्यास त्याचा फायदा होईल.परिस्थिती अधिक वाईट बनण्याच्या आधी मतभेद दूर करण्यासाठी संवाद साधा.

**धनु**-आज तुम्हाला अनेक नवीन आर्थिक योजना सादर केल्या जातील.कोणतेही वचन देण्याआधी सदर योजनेच्या चांगल्या-वाईट बाबी तपासून पाहा.

**मकर**-क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊन तुम्ही शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहाल. जर प्रवास करत असाल तर आपल्या महत्वाच्या वस्तूंची काळजी घ्या.

**कुंभ**-कामानिमित्त खाजगी कार्यक्रमांना जाण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे.योगासने आणि ध्यानधारणा यामुळे मानसिकदृष्ट्या तुम्ही सक्षम राहाल.

**मीन**-तुम्हाला आपल्या भाऊ-बहिणीच्या मदतीने धन लाभ होण्याची शक्यता आहे. कामानिमित्त प्रवास घडेल. कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांची मदत मिळेल.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# बोरगाव सर्कलजवळ प्रवाशांचा श्वास 'गुदमरतोय'

## परिसरात धुळीचे साम्राज्य; सर्कल रुंदीकरण व रस्त्याचे काम रेंगाळले

बोरगाव,ता.१४(वार्ताहर)-

**बोरगाव सर्कल वरून प्रवास करणे म्हणजे आजाराला निमंत्रण देण्यासारखे झाले आहे.लोकप्रतिनिधी व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात धुळीचे लोट पहावयास मिळत आहे.सर्कल भोवतीचा रस्ता संपूर्णपणे खराब झाला असून अत्यंत बिकट परिस्थिती झालेली आहे. मात्र याकडे लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे नागरिक,प्रवासी, पर्यटक,शेतकरी यांनी संताप व्यक्त करीत आहेत.**



बोरगाव सर्कलवर सर्वत्र धुळीचे साम्राज्य निर्माण झाल्याचे दिसत आहे.

कर्नाटक महाराष्ट्र राज्याचे प्रवेशद्वार असलेल्या बोरगाव सर्कल हे महत्त्वाचे ठिकाण आहे.हे सर्कल रुंदीकरण होणार असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.रुंदीकरण होणार म्हणून सर्कलच्या आतील रस्त्यावर खडी मुरूम सोडण्यात आले.ठेकेदारांकडून डांबरीकरण मशीनच्या सहाय्याने खड्डे मुजवण्यात आले.लवकरच डांबरीकरण होणार असल्याचेही सांगण्यात आले.मात्र गेल्या वर्षभरापासून हे काम रेंगाळले आहे. संपूर्ण परिसर धुक्यासारख्या धुळीने व्यापलेला आहे. या सर्कलवरून मोठ्या प्रमाणात दररोज सकाळी विद्यार्थी, शेतकरी, प्रवासी व पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत असतात.धूळकणांनी वातावरण धुसर झाले आहे.स्थानिकांचा श्वास अक्षरशः गुदमरतो आहे.या रस्त्यावरून वाहनांची मोठी वर्दळ असते पण रस्त्याच्या या अवस्थेमुळे श्वास कोंडत आहे.

अनेकांना काही मिनिटे सुद्धा या मार्गावर थांबणे कठीण झाले आहे. धूर व धुळीच्या साचलेल्या थरामुळे येथील बांधण्यात आलेल्या कीर्ती स्तंभाचेही पवित्रता झाकून गेली आहे. धुळीमुळे या कीर्ती स्तंभावर मोठ्या प्रमाणात धूळ साचून राहिले आहे. स्थानिक नागरिक व व्यावसायिकांना या ठिकाणी व्यवसाय करणे अत्यंत कठीण बनले आहे. श्वास घ्या, श्वास रोखा असा प्रकार रोज रस्त्यावर अनुभवायला मिळतो. मोठ्या प्रमाणात धूळ साचत असल्याने येथील हॉटेलधारकांना व्यवसाय करणे अत्यंत कठीण बनले आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दररोज पाणी फवारणी करणे गरजेचे आहे मात्र तेही न होत नसल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.आणखीन किती वर्षे हे असेच असणार असा प्रश्न नागरिकांमधून केला जात आहे.

सीमाभागातील रस्त्यांकडे अधिकाऱ्यांचे नेहमीच दुर्लक्ष होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सर्कल रुंदीकरणाचे काम रेंगाळले आहे .सर्कल रुंदीकरण कधी पण होऊ दे, पण रस्ता पहिल्यांदा करा,अशी मागणी सर्व स्तरातून केली जात आहे.बोरगाव शहरवासीयांना न्याय मिळणार कधी असा संतप्त सवाल ही नागरिकांमधून केला जात आहे.

## येळवडेत राज्यस्तरीय कब्बडी स्पर्धेचे आयोजन

राशिवडे,ता.१४(प्रतिनिधी)-

**येळवडे (ता.राधानगरी) येथील शिवभक्त कबड्डी स्पोर्ट्स च्या वतीने राज्यस्तरीय मॅटवरील कबड्डी स्पर्धांचे आयोजन केले आहे. १९ ते २१ डिसेंबर दरम्यान या स्पर्धा प्राथमिक शाळेच्या पटांगणावर होतील.**

सलग तीन दिवस-रात्री मॅटवर होणाऱ्या या स्पर्धेसाठी तीन गटात संघ खेळवले जातील. यामध्ये ३० किलो गटासाठी अनुक्रमे ५ हजार ३ हजार व २ हजार रुपये व प्रत्येकी चषक अशी बक्षिसे व वैयक्तिक उत्कृष्ट खेळाडू,उत्कृष्ट पकड आणि उत्कृष्ट चढाईसाठी स्पोर्ट्स बॅग आणि आदर्श संघ १००० रुपये बक्षीस देण्यात येणार आहे.४५ किलो गटातील स्पर्धेसाठी अनुक्रमे १५०००, १०००० व ७००० रुपये व चषक अशी बक्षिसे देण्यात येणार असल्याची माहिती शिवभक्त कबड्डी स्पोर्टस्च्यावतीने दिली आहे.

## संकपाळ हायस्कूलचे वक्तृत्व स्पर्धेत यश

निपाणी,ता.१४(प्रतिनिधी)- श्रीपेवाडी येथील जी.एम.संकपाळ हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी नवलिहाळ येथील वक्तृत्व स्पर्धेत यश मिळविले. या स्पर्धेत परितोष विनायक पाटील याने प्रथम क्रमांक, कोमल योगेश चव्हाण हिने तृतीय क्रमांक मिळविला. विद्यार्थ्यांना हायस्कूलचे चेअरमन डॉ.अशोक पुजारी, व्हा.चेअरमन अविनाश पाटील यांचे प्रोत्साहन तर मुख्या.जे.एस.जाधव, मुख्या. एस.डी.पवार, श्रीमती के.बी.गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.



परितोष पाटील कोमल चव्हाण






# मुरगूड ग्रामीण रुग्णालयात २४९ शस्त्रक्रिया

मुरगूड,ता.१४(प्रतिनिधी)-

**मुरगूड येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये १ एप्रिल ते ३० नोव्हेंबर अखेरच्या आठ महिन्यात विविध सेवा देण्यात आल्या. त्यापैकी नोव्हेंबर २०२५ अखेर सिझेरियनद्वारे ६० प्रसूती (बाळंतपण) सह २४९ मोठ्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या, अशी माहिती प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. रवींद्र कांबळे यांनी महासत्ताशी बोलताना दिली.**

फेब्रुवारी २०२५ पासून येथे महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत १ एप्रिल ते आज अखेर दुर्बिणीद्वारे गर्भाशयाच्या ३५ शस्त्रक्रिया तसेच हर्नियाच्या ४९ आणि दुर्बिणीद्वारे अपेंडिक्स शस्त्रक्रिया १४ करण्यात आल्या. ६ रुग्णांना रक्त संक्रमण सेवा (रक्त चढवणे) देण्यात आली. योजनेअंतर्गत १०४ शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

या रुग्णालयात सरासरी दैनंदिन २३० ते २५० बाह्य रुग्ण तपासणी होते. तर दरमहा २८० ते ३०० रुग्णांना अंतर रुग्ण सेवा दिली जाते. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील ४२ मुलांच्या योग्य त्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. हृदयविकार असणाऱ्या २४ मुलांची टूडी इको तपासणी करण्यात आली. ३ तीव्र कुपोषित मुलांना पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये दाखल करण्यात आलेले आहे. रुग्णालयामध्ये आज अखेर १४८ कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. रुग्णालयामध्ये सरासरी ८५० ते ९०० रुग्णांची क्ष किरण तपासणी करण्यात आली आहे. प्रयोगशाळा विभागामध्ये दरमहा ४००० ते ४५०० रक्त, लघवी, शौच तपासण्या केल्या जातात.

ट्रूनॅट मशीनद्वारे दरमहा ३५० थूंकी नमुने तपासले जातात तर रुग्णालयामार्फत ३५३ मोतीबिंदू शस्त्रक्रिया करवून घेण्यात आलेल्या आहेत.

या रुग्णालयामार्फत बाहेरून हृदयरोग तज्ञ बोलावून २२ रुग्णांची टूडी इको तपासणी करून घेऊन ६ रुग्णांना संदर्भ सेवा देण्यात आली.


### इचलकरंजी महानगरपालिका
### जाहीर आवाहन

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील आस्थापना वरील सर्व मद्य/ दारू विक्री दुकाने तसेच मटण / चिकन मांस विक्रेते यांना कळविण्यात येते की,

सोमवार दि. १५/१२/२०२५ रोजी श्री शंभूतीर्थ लोकार्पण सोहळा संपन्न होत असल्याने सदर दिवशी शहरातील आस्थापना वरील सर्व मद्य/ दारू विक्री दुकाने, मटण / चिकन मांस विक्री दुकाने बंद ठेवावीत असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक इचलकरंजी महानगरपालिका यांनी केलेले आहे.


तरी आस्थापना वरील सर्व मद्य/ दारू दुकाने, मटण / चिकन मांस विक्रेते यांनी सदर दिवशी आपले दुकान बंद ठेऊन महापालिकेस सहकार्य करावे हि विनंती.

सही/-
(सुषमा शिंदे-कोल्हे)
अति. आयुक्त
इचलकरंजी महानगरपालिका









## आजरा आगारात बुधवारी प्रवासी राजा दिन

आजरा,ता.१४(प्रतिनिधी)-

**आजरा आगारात बुधवार ता.१७ डिसेंबर रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. प्रवासी व कामगारांच्या समस्यांचा स्थानिक पातळीवर निपटारा करण्यासाठी सदर उपक्रम राबवण्यात येणार आहे.**

आजरा आगारात ता.१७ रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत प्रवाशांच्या लेखी तक्रारी स्विकारल्या जातील व त्यावरील उपाययोजनांबाबत मा.विभाग नियंत्रकसो आदेश देतील. दुपारच्या सत्रात दुपारी ३ ते ५ या वेळेत आगारातील एस.टी कर्मचाऱ्यांच्या व्यक्तीगत अथवा संघटनात्मक समस्या ऐकून घेवून त्यावर तातडीने योग्य ती कार्यवाही केली जाईल.प्रवाशी व कर्मचाऱ्यांनी आपल्या तक्रारी अथवा समस्या लेखी स्वरुपात नेमून दिलेल्या वेळेत आगारात देणेत याव्यात,असे आवाहन करण्यात आले आहे.

## आदिनाथ नेजे यांचे निधन

बारवाड,ता.१४(वार्ताहर)-



भोज येथील आदिनाथ बंडू नेजे (वय ६२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, नातवंडे, भाऊ, भावजयी असा परिवार आहे.त्यांच्या निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.










**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**चिरमुरा रोस्टेड मशिन विकणे आहे.** संपर्क–सचिन रेडेकर–९४२२५११४५९

**२ गुंठ्याचे २ प्लॉट** ३० फूटी रोडटच विकणे आहेत. २७X७५ जवाहरनगर, जोतीबा मंदिरजवळ, इचलकरंजी. संपर्क–७७४१०४१४१५

**२ बीएचके फ्लॅट विकणे आहे.** सर्व सोयीनियुक्त तुळजाभवानी अपार्टमेंट, शहापूर. संपर्क–९८८१४५३७९१

**व्हीएमसी मशीन पाहिजे.** संपर्क–९४२३०४१०२०

**अर्जंट ३ बीएचके** आरसीसी घर विकणे आहे. जवाहरनगर, ठाकरे चौक, शिक्षक कॉलनी संपर्क–७२४९१९६२११

**फार्म हाऊस विकणे आहे.** जागा साडेदहा गुंठा, पूर्ण डेव्हलप, २ बीएचके स्विमिंग पूल, लॉन गार्डन. पत्ता–राजमाने हायस्कूलमागे, रूई. संपर्क–मालक–९९६०६०७८६८, केअर टेकर–९८६०४०५७०४

**२ बीएचके,** फ्लॅटपेक्षा कमी किंमतीत स्वतंत्र बंगला रेडी पझेशन उपलब्ध. पत्ता– पोद्दार इंटरनॅशनल स्कूलजवळ, सांगली रोड, यड्राव संपर्क–९१७२८२४५२८, ९७६३४७७७९९

**जुने व नवे पॉवरलूम** घेऊ व देऊ तसेच फवारा, कांडीमशिन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क–८३१७२९१००८

## बोअरवेल विषयक

**गंगा आली रे अंगणी–**श्री गणेश बोअरवेल ६.५ इंची बोअरवेल खुदाई करून मिळेल. संपर्क–९८२२७७७२२६, ९४२२७५२४५६

**चौगुले बोअरवेल–**४३ वर्षांची परंपरा आमचेकडे एक दिवसात ४।।। व ६।। इंची बोअरवेल मारून सबमर्सिबल पंप बसवून मिळेल. संपर्क–डॉ. संजय चौगुले, जुन्या स्टॅण्डसमोर, स्टेशन रोड, इचलकरंजी. मो. ९३२५१४६८८४

**चौगुले बोअरवेल जयसिंगपूर–** घरासाठी ४।।। इंची व शेतीसाठी ६।। इंची बोअर मारून मिळेल. संपर्क–९९६०१०५४२१

## कर्ज विषयक

**होमलोन, मॉरगेज चालू कर्ज** कमी दराने कार लोन फक्त ॲसेसमेंटवर पण लोन एनए असो नसो फास्ट मंजूरी. ९०९६०६६५०५, ७०५८७२१३२५

**श्रीशा फायनाशियल,**सोल्युशन, इचलकरंजी व परिसरामध्ये सर्व प्रकारचे कर्ज प्रकरणे कमीत कमी कागदपत्रात व वेळेत करून देणारी एकमेव कंपनी. संपर्क–९१७२३८३५४८.

## यात्रासहल

**ओम गणेश ट्रॅव्हलर्स–** पूर्व उत्तर भारत, जगन्नाथपुरी, गंगासागर, दार्जिलिंग, नेपाळ, काशी, अयोध्यासह २३ दिवस, ५ फेब्रुवारी २०२६, निवास, भोजनासह २४,५००/–. संपर्क–नंदकुमार शिंदे–९८८१३४६६५४, ८६२३८३७९९६

## व्यवसाय विषयक

**बचत गट–** इचलकरंजी परिसरात बचत गटांना आर्टीफिशियल फ्लॉवर बनवण्याचे काम मजुरीवर देणे आहे. संपर्क–विन्सर वर्क वेअर, नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. फोन–९८२२५४३९४३

## शैक्षणिक विषयक

**इंटरनॅशनल आस्थेटिशियन** (सौंदर्य तज्ञ) सौ. सुलक्षणा सुरेश मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली २०,००० रू. बेसिक ब्युटी पार्लर कोर्स फक्त ५००० मध्ये एव्हरशाईन ब्युटी स्पा, सलोन अ‍ॅन्ड अ‍ॅकॅडमी, कल्पना टॉकीजसमोर, इचल. ८४११००१५१६

## * भाड्याने देणे/घेणे *

**खोली/शेड भाड्याने पाहिजे.** व्यंकोबा मैदान/गावभाग/स्वामी समर्थ/ आमराई रोड १०X१५ खोली/शेड भाड्याने पहिजे. संपर्क–७०२०७३५८७३ मेसेज करावा.

**भाड्याने देणे–** ३ बीएचके १००० चौ. फूट १६X१६ फूट व १०X२५ फूट गाळे पोटमाळा, संडास बाथरूम संपर्क–चैतन्य आयुर्वेद दवाखाना, शहापूर रोड, इचलकरंजी. ९४२००१०१५०, ९१७५१०६८२९

**भाड्याने देणे–** सर्व सोयीनियुक्त जागा हॉस्पिटलसाठी भाड्याने देणे. के.पी. कॉम्प्लेक्स, राणीबागेजवळ, इचलकरंजी. ९४२२०४३६७६, ९७६६९१२३३७

**दुकानगाळा भाड्याने देणे.** २०० स्क्वे. फूट ऑफिस किंवा दुकानकरीता सर्वोदय नगर, गल्ली नं.१, हिरकणी हॉटेलजवळ, इचलकरंजी. फोन–७०३०८८६८६८

**जवाहरनगर,** स्वामी मळा येथे उत्तराभिमुख ३०० स्क्वे. फूट गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क–९४२२५११४५९

**हिरापन्ना लस्सीसमोर** अरोमा बेकरीशेजारी कापड शोरूम, बँक इत्यादीसाठी तसेच ग्राऊंड फ्लोअर व बेसमेंट खाद्य व्यवसायसाठी देणे आहे. भाडे–४५,०००. संपर्क–९०३९६९३९६९

**भाड्याने देणे.** १२०० स्क्वे. फूट रोडटच १९ एचपी लाईटसह सीएनसी, व्हीएमसी, गारमेंट गोडाऊनसाठी भाड्याने देणे. डीमार्ट जवळ देसाई–९८२२१११२९०, ७०५७५५२६१९

**रिकामी जागा** भाड्याने देणे आहे. ५००० स्क्वे. फूट हॉटेलसाठी. पत्ता–कॅबसन हॉटेलजवळ, स्टेशन रोड, इचलकरंजी. संपर्क–९०३९६९३९६९

**३ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे आहे. सर्व सोयीनियुक्त हवी. जिव्हेश्वर भवन शेजारी, भोने माळ, इचलकरंजी. संपर्क–७०३८६८४९८७

**कापड मार्केटसमोर** बेसमेंट गाळा ४०० स्क्वे. फूट भाड्याने देणे आहे. संपर्क–९०२८४७७२१९, ८४४६८९०७०७, इचलकरंजी.

**२७X६५ चे रिकामे शेड** भाड्याने देणे आहे. जय सांगली नाका, इचलकरंजी. फोन–९७६६६०६७१३

**ऑफिस व गोडाऊन** भाड्याने देणे. थोरात चौक, स्विमिंग पूलसमोर, इचलकरंजी. ९१५८०५४०४६

**भाड्याने देणे–** ५५० स्क्वे. फूटाचे २ दुकानगाळे गोडाऊन किंवा पतसंस्थेसाठी चांदणी चौक, इचलकरंजी. फोन–९४२०१३२३७४, ८८०५७१९६६१

**घर गहाणवट देणे–** २ खोल्यांचे सर्व सोयीनियुक्त पाटील मळा, सहकारनगर, बस स्टॉप समोर. संपर्क– ९१३९१६०४२६.

**भाड्याने देणे–** ६०० फुट बेसमेंट माळी कॉलनी, टाकाळा कोल्हापूर, रोहिनी वांच्छाणी. मो. ८४२१८८५५०३.

**३०X५० स्क्वे. फुट** शेड, वायडिंग, लेथ गारमेंट, गोडाऊन करीता भाडे तत्तावर देणे आहे. पत्ता– आभार फाटाजवळ. मो. नं. ८०८७३६६०१८.

**शेड भाड्याने देणे–** १८०० स्क्वे. फुट सर्व सोयीनियुक्त गोडाऊन गारमेंट इतर वापरासाठी १९ एच.पी. लाईट कनेक्शन, दत्तनगर, कबनूर. मो. ९८५०५७६३१४.

**दुकानगाळा भाड्याने देणे–** ९०० स्क्वे. फूट रिंगरोड गोल्डन टॉवर महासत्ता चौकाजवळ, शोरूम/ वित्तीय संस्था. संपर्क–९८२२५९७४९७

**सर्व सोयीनियुक्त** फूल्ल कंडिशनमध्ये सलून भाडे तत्वावर अर्जंट देणे आहे. संपर्क–संगमनगर–८६६९००५२९०

**गाळा भाड्याने देणे–** ८X२० फुट जनता बँकेजवळ, शाहु कॉर्नर येथे. संपर्क– ९४२११०८०८५, ९०२१७६९५९६.

**भाड्याने देणे.** ८०० स्क्वे. फूट व २०० स्क्वे. फूट गाळा सांगली रोड, ज्योती लक्ष्मीनगर, इचलकरंजी. ८३२९०६००८७

**भाड्याने देणे–** इचलकरंजी–कोल्हापूर रोडवर १ एकर जागा व कबनूर फॅक्टरी रोडवर १५०० स्क्वे. फूट शेड भाड्याने देणे. संपर्क–८३२९५७०२६६, ८३२९७९१२३२

**आरके सिनेमामधील** ४००० स्क्वे. फूट ग्राऊंड फ्लोअर ३००० स्क्वे. फूट फर्स्ट फ्लोअर भाड्याने देणे आहे. संपर्क–९५४५४५८५९५

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी–विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे–घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

## * नोकरी विषयक *

**इंजिनिअरींग फिल्डमध्ये** कॉस्ट अकौंटीगचे काम करत असणारा (लेडीज किंवा जेन्टस्) हवा आहे.संपर्क–आर.व्ही.कुलकर्णी. ९४२२५८२०८८,९९२२००१६०२. Mail-r.v.kulkarni@gmtcpl.com.

**अर्जंट पाहिजे.** गारमेंटसाठी अनुभवी जेंटस/लेडीज हेल्पर–६, फिक्स पगार–९०००/– भोने माळ, इचलकरंजी. ९५६१८४७५८३

**इचलकरंजीमध्ये** नामांकित कॉफी शॉपमध्ये मुले व मुली पार्ट/ फूलटाईम पाहिजेत. संपर्क–९५७९५८२१९५

**शुध्द शाकाहारी** हॉटेलमध्ये चपातीसाठी व भांडीसाठी लेडीज पाहिजे. संपर्क–८९७५६९८४७४, ७९७२१२१६५५

**त्वरीत पाहिजे.** कॉम्प्युटर ऑपरेटर+सेल्स पर्सन, शिक्षण–१२ वी पास, वय–२० ते २५, जेंटस/ लेडीज, शिकाऊ/अनुभवी. संपर्क–श्री जिनेंद्र ज्वेलर्स, रूणवॉल टॉवर, इचलकरंजी. फोन–९४२१२०३९५१

**नामवंत कंपनीमध्ये** लाईन इन्स्पेक्टर अकाऊंटंट २ वर्षे अनुभवी व स्टोअर व CNC, VMC ऑपरेटर व प्लांटहेड पाहिजे. संपर्क–९६८९५८३४९५

**पाहिजेत.** १) अनुभवी किंवा शिकाऊ वायरमन. २) दुकानात काम करणेसाठी मुले. ३) जीएसटी पूर्ण माहिती असणारे अनुभवी अकौंटंट जेंटस/लेडीज. संपर्क–सोसायटी इलेक्ट्रीकल्स, इचलकरंजी. ९४२११००५५५

**निरामय सेवा सदन हॉस्पिटल,** इचलकरंजी येथे १) इलेक्ट्रीशियन–२–ITI इलेक्ट्रीकल डिप्लोमा. २) TPA बिलींग–पदवीधर–२, अनुभवी १–२ वर्षे. ३) फ्रंट डेस्क एक्झीक्युटिव्ह पदवीधर–२, ४) कॅथलॅब टेक्निशियन–२, अनुभव १–२ वर्षे. संपर्क–८९७५९६६०५५, (वेळ–११ ते ५)

**निरामय सेवा सदन हॉस्पिटल,** इचलकरंजी येथे १) स्टोअर मॅनेजर–२, अनुभव–१–२ वर्षे. २) लॅब टेक्निशियन–२, अनुभव–१–२ वर्षे. ३) टायपिस्ट–B.SC-2 अनुभव–१–२ वर्षे. संपर्क–८९७५९६६०५५. (वेळ–११ ते ५)

**गोडावून कामासाठी** कॉम्प्युटरची माहिती असलेली विवाहीत/ अविवाहीत लेडीज पाहिजे. संपर्क–वर्धमान सोसायटी, महावीर जैन मंदिरसमोर 'टियारा फॅशन्स' रॉवका सदन, इचल. भेटण्याची वेळ–दु. ३ ते सायं. ७.

**पेट्रोल पंपावर** ८ तास ड्युटीसाठी कामगार पाहिजे. संपर्क–८३८०८१११८८

**दुकानात १० वी/१२ वी** पास २ मुले पाहिजेत. स्टेशन रोड, अजब फर्निचरसमोर, भागवत एजन्सी, इचलकरंजी. फोन–७०९७६०७०७०

**कामगार पाहिजे.** इलक्ट्रिकल्स दुकानमध्ये मोटर पंप रिपेअरीसाठी शिकाऊ/अनुभवी मुले पाहिजेत. संपर्क–९२१९१४२४२. पत्ता–गणेश नगर, गल्ली नं.९, इचल.

**सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.** खंजीरे/ पार्वती इंडस्ट्रिज. १२ तास, डे/ नाईट, वय–२५ ते ५० शिक्षण–१० वी, १२ वी, अनुभवी. ९४२३२८४८३३, ८२०८५०५४७२

**झेरॉक्स दुकानात** लेडीज ऑपरेटर पाहिजे. संपर्क–महालक्ष्मी झेरॉक्स सेंटर, एएससी कॉलेजसमोर, इचलकरंजी. ८८५५८९२२२३

**कॉफीशॉपमध्ये** कामासाठी पार्ट/ फूल टाईम मुलगा/मुलगी पाहिजे. संपर्क–८०८७६६३७५५

**ओपीडीसाठी** नर्सिंग स्टाफ पाहिजे. शिकाऊ/अनुभवी चालेल. श्री बालाजी क्लिनिक, भाग्यश्री कॉलनी, थोरात चौकजवळ, इचलकरंजी. ९०२८४७७२१९, ८४४६८९०७०७

**हेल्पर जेन्टस कामगार पाहिजेत.** लिहीता–वाचता येणे आवश्यक. वय–१८ ते ४५. संपर्क–विन्सर वर्क वेअर, नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. ९४०४७००५२१

**सेकंड हॅंड मालवाहतुक** गाड्या खरेदी–विक्री ऑफिसमध्ये कामासाठी लेडीज/जेंटस तसेच गाड्या धुणे/पुसने देखरेखीसाठी जेंटस पाहिजे. आकर्षक पगार. संपर्क–कबनूर–८९९९७३०८८०, हालोंडी (शिरोली) ९२०९०८११८५

**लेडीज व जेन्टस** कामगार पाहिजेत. फूलटाईम/ पार्टटाईम. संपर्क–छ. संभाजी चौक, इचलकरंजी. ८५५२९९०२३७

**VMC ऑपरेटर पाहिजेत.** शिकाऊ/अनुभवी. संपर्क–आसरानगर, गणपती मंदिरशेजारी, सांगली नाका, इचलकरंजी. ९१३९९३४३१५

**Required Teachers**
**For Reputed English Medium School**
**English / SSt -1**
**Maths - 1**
**Contact**
**MARVAL SCHOOL**
**Chandur Road, Near Alliance Hospital, Ichalkaranji.**

**पार्ट टाईम नाष्टा सेंटरमध्ये** महिला हेल्पर पाहिजे. कामाची वेळ–८ ते २, अटलबिहारी वाजपेयी चौक, इचलकरंजी. ९८८१९८२२९५

**Inspection** and Packaging Shop मध्ये अनुभवी सुपरवायझर पाहिजेत. ओम इंजिनिअरींग वर्क्स, पार्वती इंडस्ट्रिज, यड्राव. फोन–९२२६७८५२००

**5 Star M.I.D.C.** कागल येथे कीचन असिस्टंट–१, तंदूरसाठी–१, वेटर–२. अर्जंट भरणे आहेत. मो. ९१७५२१०९९९

**पाहिजे.** ऑफिस पॅकेजिंगसाठी कामगार पाहिजेत. शिक्षण–१२ वी, मिरॅकल इंडस्ट्रिज. ९४२२०४४८२१

**Require Good** Communication Skill. Computer Operator. Miracle Industries. 9422044821

**टेक्स्टाईल ट्रेडिंग कंपनीमध्ये** Computer Yarn Inward outward व Bank Tally साठी मुलगा पाहिजे. Tally, Ms. Office ज्ञान आवश्यक. संपर्क –ईशान टेक्नोफॅब, जुनी इंडस्ट्रियल इस्टेट, हॉटेल कबसन, गणपती मंदिरजवळ, धारवट सायझिंगसमोर, इचलकरंजी. संपर्क वेळ–दुपारी ४ ते ६

**कामगार पाहिजेत–** अर्जंट अनुभवी ११०००/– शिकाऊ – ९००० समक्ष भेटा– पंचगंगा सर्व्हिसिंग सेंटर, स्टेशन रोड, माणिक स्टीलसमोर, इचलकरंजी.

**श्रीशा फायनाशियल** सोल्युशन ऑफिससाठी लेडीज स्टाफ पाहिजेत. संपर्क– ९१७२३८३५४८.

**इलेक्ट्रॉनिक शोरूममध्ये** बॅक ऑफिससाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत. एक्सलशीट येणे आवश्यक. संपर्क–९२२६८८१४७०.

**ऑफिस कामासाठी** लेडीज पाहिजे कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. संपर्क–आर्यन डायग्नोस्टिक्स, खोतवाडी. मो. ९३७१७१८००१.

**Required** - Junior Accountant (Male/Female) for sales Purchase/ data entry, Banking Knowledge for Textile unit. Exp.1-3 Years. Lab Asst. Female. B.Sc. Chemistry. Contact - 7720018406.

**बिअरबारमध्ये** अर्जंट वेटर पाहिजे– संपर्क– ९८८१९५७०५५, ९५४५३९०९०८

**मोटर स्कूलमध्ये** ऑफिस कामासाठी मुलगी हवी. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९८२२३५११२७.

**शेती प्रक्रिया** कारखानासाठी कामगार पाहिजेत. दिवसा रात्री पगार १० तास ५००, १२ तास ६०० सांगली– कोल्हापूर रोड, निमशिरगांव फाट्याजवळ, मो. ८४८४९८१३०१, ८०८७७६६७३३.

**हॉटेल लॉजिंगमध्ये** पुरूष/ महिला पाहिजेत. साफसफाई, रूम बॉय नॉईट मॅनेजरसाठी राहणेची सोय. मो. ८४८४९८१३०१.

**सोलार कामासाठी** कामगार पाहिजे. तसेच सोलार कामासाठी सेल्समन नेमणे आहे. संपर्क–८६६८८२४०९८ इचलकरंजी.

**अर्जंट सिक्युरिटी गार्ड भरती–** हातकणंगले लक्ष्मी इंडस्ट्रीज, १२ तास ड्युटी, ३० तास १५००० पगार. संपर्क– ८३०८८७७६६०, ७२४९२६८३०१.

**टर्नर पाहिजे.** प्रोडक्शन कामाकरिता स्किल्ड, सेमी स्किल्ड टर्नर पाहिजेत. संपर्क–८१५११९९९७१

**ड्रायव्हर पाहिजे–** छोटा हत्ती, मालक वाहतूक गाडीवर लायसन धारक (LMV-TR) अनुभवी व हुशार ड्रायव्हर पाहिजे. संपर्क–९८९०२२०९४३,, ७५१७५०६६८२.

**अकौंटंट पाहिजे–** बी.कॉम टॅलीची माहिती असणारे लेडीज/जेंटस् व कॉम्प्युटर रिपेअरीसाठी हार्डवेअर इंजिनिअरक पाहिजे. संपर्क– टर्बो कॉम्प्युटर्स, इचलकरंजी. मो. ९३७००१२६८२.

**ड्रायव्हर पाहिजे–** डिलेव्हरी ड्रायव्हर व हेल्पर मुले पाहिजेत. संपर्क– ७५८८९२०६३०.

**घरबसल्या काम करून** दिवसा कमवा ५०० ते १००० रु. संपर्क–८४२१६६३३६२. प्रेम चव्हाण सर.

**पाहिजे–** पार्ट टाईम/ फुल टाईम अनुभवी डेंटीस्ट आवश्यक आहे. संपर्क– सोमेश्वर डेंटल क्लिनिक, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९९७५६१०११४. ९१७५९४०११४.

**दवाखान्यातील कंपौंडर** कामासाठी मुले व मुली पाहिजेत. डॉ. परदेशी दवाखाना, जिव्हाजी मंदिराजवळ, कोल्हापूर रोड, इचलकरंजी.

**सायझिंगसाठी** वार्पर पाहिजेत. संपर्क–९३५९०८६६७२, ९५०३६०३००८

**वेल्डर पाहिजे.** (शिकाऊ चालतील) अनिकेत सर्व्हीसेस, शाहूनगर, गल्ली नं.१, चंदूर. मो. ९७६२८०४९५६

**पाहिजे.** टेक्स्टाईल कंपनीत प्रॉडक्शन आणि क्वॉलिटी प्लॅनिंगसाठी (PPC) अनुभवी दिवाणजी पाहिजे. सांगली रोड, हीरो शोरूमजवळ. ८४५९२०४०८१

**इचलकरंजी येथे** मध्यवर्ती पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजेत. ड्युटी ८ तास, जेन्टस व लेडीज. कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी. फोन–८३२९०२८१४४

**त्वरीत पाहिजे.** जेंटस शिकाऊ किंवा अनुभवी शिफ्ट प्रॉडक्शन व क्वॉलिटी सुपरवायझर बी.एससी केमिस्ट्री. आकर्षक पगार व पी.एफ व ईएसआयसी सुविधा. श्री लक्ष्मी को–ऑप इंडस्ट्रियल इस्टेट, हातकणंगले. संपर्क–८५३००७१२१०

**शॉपमध्ये कामासाठी** लेडीज पाहिजेत. जवाहरनगरमध्ये खोल्या सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. संपर्क–९९६०६२२४०८

**यड्राव–तारदाळमधील** नामवंत कंपनीत कामगार पाहिजेत. * ITI-Diploma-फ्रेशर (मेल/फीमेल) * १० वी, १२ वी अनुभवी–CNC-ऑपरेटर. किमान जागा–३०, वेतन–१४००० ते १६००० पर्यंत. मो. ९१३०३९११०७, ८७८८३२८२२८

**हातकणंगले येथील** नामांकित कंपनीत कामगार भरती चालू आहे. * हाऊस किपींग–२० जागा. * पगार–११,५०० ते १२००० पर्यंत. * मो. नं. ८८८८६६१२७० * सिक्युरिटी गार्ड–१०. संपर्क–९८३४५७४९०६

**बस ड्रायव्हर पाहिजे.** एरिया–यड्राव/तारदाळ/इचलकरंजी. मो. नं. ९११५८८७१७८, ७०५७९०१४९०

**अनुभवी व्हीएमसी ऑपरेटर** व सुपरवायझर पाहिजे. आकर्षक पगार, गणेशनगर, ७ वी गल्ली, इचलकरंजी. फोन–९४२३०४१०२०, ९७६३४१४३३८

**लेथ मशिनवर** रिपेअरी कामाकरिता टर्नर, वेल्डर, हेल्पर पाहिजेत. संपर्क–९२०९६०१४३, ९९२२४९९५१४

**डॉक्टर पाहिजेत.** (MO) (B.A.M.S./B.H.M.S) स्पंदन हॉस्पिटल, वखारभाग, इचल. मो. 8421426685

**CNC/VMC** स्किल्ड ऑपरेटर पाहिजेत. CNC- २ जागा, VMC- २ जागा. संपर्क–श्री सिध्देश्वर इंडस्ट्रिज, वॉर्ड नं. २३, प्लॉट नं. ३८७, खंजीरे इंडस्ट्रिज इस्टेट, शहापूर–इचलकरंजी. फोन–९५९५७२७४७४, ७०२६७४७४०९

**बेकरी शॉपीमध्ये** कामासाठी मुले पाहिजेत. बालाजी बेकरी एएससी कॉलेजजवळ संपर्क–९९६००२८२८९, ७२७६१२७१११

**डेव्हलपमेंट कामासाठी** ड्रीलर–१, फॉलोअर–१, प्रोडक्शन लाईनसाठी व्हीएमसी ऑपरेटर, कामगार ५ जागा व जनरल वर्कसाठी–३ जागा भरणे आहेत. संपर्क–९८९००६९५९८, ८६६९५९३६१७

**पाहिजेत.** कोरूगेटेड बॉक्स फॅक्टरीत १० वी, १२ वी पास/ नापास शिकाऊ कामगार पाहिजे. अर्जासह समक्ष भेटा. अरूंधती कलर कार्टन्स, प्लॉट नं. ६० ते ६३. पार्वती को–ऑप इस्टेट, यड्राव. फोन–९५९५८४५७७४

**पाहिजेत.** इचलकरंजीमधील नामांकित हॉस्पिटलसाठी खालील जागा भरण्याच्या आहेत. १) वॉर्डबॉय मावशी. पगार–९०००/– फिक्स. २) मेडिकलसाठी फार्मासिस्ट. संपर्क–९७६७४९६६५४, ९०११६७४२२१

**Wanted-** * Full Time Accountant * B.Com/M.Com. * Experience 5 to 10 years. * Knowledge of IT/GST Must Salary as per Company Rule. Contact-9422043659

**कामगार पाहिजेत.** फॅब्रिकेशन व फ्रेंच डोअर कामासाठी. संपर्क–अन्नपूर्णा इंडस्ट्रिज, झुडीओसमोर, सांगली रोड, इचलकरंजी. फोन–९१३०२०००४५

**पाहिजे.** दिवाणजी व वसुली कामासाठी अनुभवी जेंटस पाहिजेत. वयोमर्यादा ५० पर्यंत. पत्ता–बडबडे हॉस्पिटलसमोर, जयकिसान पशुखाद्य, इचलकरंजी. फोन–९४२२०४४२९२, ९५४५६४१६१७

**ऑफिस कामासाठी व** अकौंटींगसाठी कॉम्प्युटरचे ज्ञान असलेली लेडीज पाहिजे. संपर्क–अभिजीत ट्रेडर्स–८२०८७३७५७५, माळभाग, तारदाळ.

**लेडीज पाहिजेत.** कॉम्प्युटर ऑपरेटर–१, सेल्स एक्झीक्युटिव्ह–१. आकर्षक पगार, संपर्क–९५७०५५४५५५

**सिक्युरीटी गार्डस पाहिजेत.** इचलकरंजी करीता ड्युटी ८ व १२ तास. पगार–१०,००० ते १५,००० पर्यंत मिळेल. मो. ९७०२४२४७७२, ९५२९५४५४६८

**बिअरबारसाठी** अनुभवी वेटर व हेल्पर पाहिजेत. संपर्क–९८५०५९६९६५, ७५८८६२०५०५

**पॅन्टमेकर व शर्टमेकर** पाहिजेत अनुभवी. संपर्क–९३२६९४११७४, ८०१०९४६९२९, कोरोची.

**८०X५२ केंब्रिक पीसी** कामाचा अनुभव असलेले दिवाणजी सायझर, बॅक सायझर भरणे आहे. संपर्क–८८८८००४४८७

**वॉचमन पाहिजेत.** पार्वती इस्टेट व इचलकरंजीमध्ये १२ तासासाठी वॉचमन पाहिजेत. संपर्क–८७९९९५००३३, ८७६७२३३१३४

**पाहिजेत.** पेपर कारखान्यामध्ये लेडीज/जेंटस कामगार, अकौंटींगसाठी टॅली व जीएसटी ची माहिती असणारी लेडीज व आयटी मेकॅनिक पाहिजे. संपर्क–८०८७३६७४९८

**दवाखान्यासाठी** रिसेप्शनिस्ट पाहिजे. पात्रता–१० वी/१२ वी/ ग्रॅज्युएट/अविवाहीत–जागा २. कामाचे ठिकाण– शारदा होमिओपॅथिक दवाखाना, कल्पना टॉकीजसमोर, मराठा मंडळ इमारत, तळमजला फोन–८००७४३०६५४. भेटणेची वेळ–सकाळी १२ ते २. अर्जासह समक्ष भेटा.

**पाहिजेत.** अनुभवी वेटर व कॅप्टन पाहिजेत. पगार–१५००० महिना. फक्त अनुभवींना प्राधान्य. संपर्क–हॉटेल मुनस्टार, इचलकरंजी. फोन–८८३०१६०५५०, ९५५२९१५३६७

**होलसेल औषध दुकानात** कामासाठी १०/१२ वी झालेली मुले/मुली पाहिजेत. सुशिल फार्मा LLP नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. (संपर्क–११ ते १) संपर्क–९०९६२६१२७२

**टर्नर पाहिजेत.** डेव्हलपमेंट कामासाठी स्किल टर्नर (लेथ मशिनवर) पाहिजे. पत्ता–५२२, शिवाजी नगर, कोरोची. ९६६५९९९८८७, ८७६६७७९११०

## हॉटेल विषयक

**हॉटेलमध्ये अनुभवी** पार्टटाईम/ फूलटाईम कॅप्टन, वेटर, हेल्पर पाहिजेत. राहणेची सोय, उत्तम पगार, इचलकरंजी. मो. ९०२२७५५१५७

## विवाह विषयक

**लिंगायत वधु–वर मेळावा** रविवार दि. २१ डिसेंबर, गुरूकृपा मंगल कार्यालय, निपाणी बस स्टॅण्डजवळ, निपाणी–बेनाडीकर. मो. ९८२३९९३४९०.

## आरोग्य विषयक

**मानसिक आजार–** व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्रचाळेपणा. इ. मानसिक आजारसाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री. इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रूषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क–८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६

# मद्यप्राशन करणाऱ्या चालकावर गुन्हा

इचलकरंजी,ता.१४–

**कोल्हापूर रोडवर मद्यपान करून दुचाकी चालविणाऱ्या शंकर अधिकराव जाधव (वय २७,रा.रूई) याचेवर शिवाजीनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

शिवाजीनगरचे पोलिस रात्री शहरात पेट्रोलिंग करीत असताना कोल्हापुर रोडवर शंकर अधिकराव जाधव हा मद्यप्राशन करून दुचाकी (क्र. एमएच ०४ जीवाय ०४२८) चालवित असल्याचे मिळून आला. यामुळे त्याचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सतीश शिंदे यांची कोल्हापूरला बदली

सांगली, ता. १४ (प्रतिनिधी)

**स्थानिक गुन्हे अन्वेषणचे तत्कालीन पोलीस निरीक्षक सतीश शिंदे यांची कोल्हापूर येथे बदली झाली आहे. विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी यांचे वाचक म्हणून कार्यभार त्यांनी स्विकारला आहे. तसेच निवडणुकीसाठीची विशेष जबाबदारीही त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.**

शिंदे यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये एलसीबीचा पदभार स्विकारला होता. खुनासह दरोड्याच्या गंभीर गुन्ह्यात काम केले. ३५ खुनातील ७६ आरोपींना जेरबंद करण्यात आले. जबरी चोरीचे ६० गुन्हे उघडकीस आणून ५४ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. दरोड्याचे ९ गुन्हे उघडकीस आणले, त्यात ७ कोटींचा मुद्देमाल जप्त केला. विशेषतः रिलायन्स ज्वेल्स दरोड्यात त्यांनी यशस्वी कारवाई केली होती. या तीन वर्षात १ हजार ४८० गुन्ह्यांचा छडा लावण्यात यश आले. त्यातील १ हजार ४५२ गुन्हेगारांना जेरबंद केले. त्यांच्याकडून ७६ कोटी ९७ लाख ७७ हजार ८४१ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. सांगलीतील यशस्वी कारकीर्द पुर्ण झाल्यानंतर त्यांच्या जागी कोल्हापूर येथील संजीव झाडे यांची नियुक्ती झाली. बदलीच्या प्रतिक्षेत असलेल्या शिंदे यांची आता कोल्हापूरमध्ये बदली झाली आहे. त्यांनी पदभार स्विकारला आहे.



# दुचाकी चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

मिरज,ता. १४ (प्रतिनिधी)–

**दुचाकी चोरी करणाऱ्या दोघांना अटक करून त्यांच्याकडून तब्बल २ लाख ४० हजार रुपये किमतीच्या चार दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. आयुब अब्दुलरशीद मन्ना (वय ३४), संदीप सूर्यकांत येलूरकर (वय ३८, दोघेही रा. नम्रता कॉलनी, बुधगांव, ता. मिरज) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.**

माहितीनुसार, कोल्हापूर रस्ता परिसरातील एका मंगल कार्यालयाजवळ चोरीच्या दुचाकी विक्रीसाठी दोन युवक येणार असल्याची गोपनीय माहिती गांधी चौकी पोलीस ठाण्याचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक संदीप शिंदे यांना खबऱ्याद्वारे मिळाली होती. या माहितीच्या आधारे त्यांनी तत्काळ पथकाला कारवाईचे निर्देश दिले. सूचना मिळताच पोलिस पथकाने संबंधित ठिकाणी सापळा रचून संशयित दोघांना ताब्यात घेतले. प्रारंभी चौकशी दरम्यान संशय बळावल्याने त्यांची कसून चौकशी करण्यात आली. त्यावेळी त्यांनी मिरजेतून एक तर कर्नाटक मधून तीन अशा एकूण ४ दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली.आणखी गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# बसची ट्रॅक्टरला धडक; जीवितहानी टळली

शिराळा,ता.१४(प्रतिनिधी)–

**येथील बाह्यवळण रस्त्यावरील श्री गोरक्षनाथ मंदिर फाट्यावर भरधाव बसने ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉलीला धडक दिल्याने ट्रॅक्टर व बसचे नुकसान झाले. यामध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही. ही घटना सायंकाळी साडेचार वाजता घडली.**

याबाबत बसचालक अशोक पांडुरंग गायकवाड (रा. रिळे, ता. शिराळा) याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. अक्षय मदन चौगुले (वय २७, रा.अंत्री बुद्रुक) हा ऊस वाहतूक करणारा ट्रॅक्टर (एमएच १० डीव्ही ०२७७) घेवून शिराळ्याहून चिखलीकडे निघाला होता. अशोक गायकवाड हा शिराळ्याकडून मांगलेकडे बस (एमएच १४ बीटी २८२३) घेऊन चालला होता. या बसची ट्रॅक्टरला धडक बसल्याने ट्रॉलीचे साठ हजार रुपयांचे नुकसान झाले. तसेच बसचेही मोठे नुकसान झाले.

# भाजपमध्ये मर्ज व्हा

## एकनाथ शिंदेंना दिल्लीतून आदेश : शशिकांत शिंदे

नागपूर,ता.१४–

**एकनाथ शिंदे यांना दिल्लीने आदेश दिला आहे की, भाजपमध्ये मर्ज व्हा अशी माहिती मला मिळाली आहे. त्यांची सुरवात म्हणून हे संघ कार्यालयात जाऊन कशा प्रकारचे एकत्रिकरण करायचे अशा प्रकारचे मार्गदर्शन करण्यासाठी शिंदे सेनेचे लोक रेशीम बागेत गेले असतील, असा दावा राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार)पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केला आहे.**

शिंदे म्हणाले की, भाजपची आणि अजित पवारांची विचारधारा वेगळी असली तरी धोरण राबवण्याचे काम हे भाजपकडून सुरू आहे. त्यामुळे त्या विचारधारेसोबत किती फारकत घ्यायची हा अजित पवार यांचा प्रश्न आहे. नागपूरमध्ये जेव्हा हिवाळी अधिवेशन असते त्यावेळी नागपूरला आणि विदर्भाला काही मिळेल अशी अपेक्षा असते. पण या अधिवेशन काळात असे काहीच घडले नाही. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी आम्ही शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आंदोलन केले पण अद्यापही शेतकऱ्यांना काही मिळालेले नाही. एकही मंत्री उत्तर देत नाही, प्रश्न विचारल्यावर त्यावर काही ठोस निर्णय दिला जात नाही. अधिवेशनामध्ये केवळ कार्यक्रम उरकण्याचा प्रयत्न झाला.शिंदे म्हणाले की, नागपुरात झालेल्या अधिवेशनामुळे विदर्भाला काही न्याय मिळाला असे मला वाटत नाही. आता जाता जाता काही तरी पॅकेज जाहीर करतील. केवळ मोठ्या आकड्यांची घोषणा करुन काही फायदा नाही. त्यासाठी सरकारकडे पैसे तर पाहिजे. प्रत्यक्षात कृतीत काही येत नाही हे जनतेने पाहिले आहे. आता विदर्भाच्या जनतेने विचार केला पाहिजे. शिंदे म्हणाले की, राज्याच्या आजू बाजूच्या शहरामध्ये ड्रग्ज निर्मितीचे कारखाने आहेत.कराडला सुद्धा काही दिवसांपूर्वी एक कारखाना उद्ध्वस्त झाला. पण दुर्गम भागात असलेला कारखाना जर पोलिसांना सापडतो तर यामागे किती मोठी प्लॅनिंग आहे ही विचार करण्याची गोष्ट आहे.

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गावाच्या बाजूला हा कारखाना असल्याची माहिती आहे. त्या ठिकाणी अनेकवेळा पोलिस जात असतात मग त्यांना हे कसे समजले नाही. त्यामागे पोलिसांची मदत आहे का? शिंदेंचे निकटवर्तीय यामध्ये असल्याचे बोलले जात आहे.**

# एम.पी. पाटील हे अजातशत्रू व्यक्तिमत्व : अण्णासाहेब जोल्ले

**निपाणी,ता.१४ (प्रतिनिधी)–**

आपल्या भागाच्या विकासाचे नेहमी चिंतन आणि काळजी करणारी मानसे विरळ झाली आहेत. अशा व्यक्तीमत्वापैकी एक जत्राट गावचे सुपुत्र आणि श्री हालसिद्धनाथ सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन एम.पी पाटील हे आहेत. त्यांनी नेहमी आपले गाव, आपला भाग कसा विकसित होईल यासाठी प्रयत्न केले आहेत. कोणत्याही व्यक्तीशी द्वेष न ठेवता प्रत्येकाला मदत मिळाली पाहिजे ही त्यांची वृत्ती होती. त्यामुळे ते अजातशत्रू व्यक्तिमत्व असल्याचे प्रतिपादन माजी खास. व बीडीसीसी बँकेचे अध्यक्ष अण्णासाहेब जोल्ले यांनी केले.

जत्राट येथील लोककल्याण सौहार्द क्रेडिट संस्थेचा रौप्यमहोत्सवी सोहळा आणि संस्थापक चेअरमन एम.पी पाटील यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त कार्यक्रम झाला.ते म्हणाले, एम.पी पाटील यांनी कै. बाबासाहेब सासणे यांच्या सोबतीने या भागाच्या विकासासाठी मोठे प्रयत्न केले आहेत. हालसिद्धनाथ कारखाना सुरळीत चालवण्यासाठी एम.पी पाटील यांचाही पुढाकार आहे.

आम.शशिकला जोल्ले म्हणाल्या, जत्राट गावाला नावलौकिक मिळवून देण्यात एम.पी.पाटील यांचे मोठे योगदान आहे.त्यांनी नेहमी लोकांमध्ये प्रेम,आदर आणि विश्वास निर्माण केला आहे. मित्र मंडळाची चांगली संगत यामुळे ते चांगले व्यक्तिमत्व बनू शकले. ७५ व्या वाढदिनी आपल्या बरोबरचे ७५ वर्ष पूर्ण केलेल्या ६५ ग्रामस्थांचा सत्कार करून हे दाखवून दिले आहे.



**हालशुगरचे चेअरमन एम.पी.पाटील व त्यांच्या पत्नी रेखा पाटील यांचा सत्कार करताना बीडीसीसीचे अध्यक्ष अण्णासाहेब जोल्ले,आम.शशिकला जोल्ले, प.पू.परमात्मराज महाराज.**

प.पू.परमात्मराज महाराज म्हणाले, एम.पी पाटील म्हणजे सर्वांच्या हितासाठी जीवन अर्पण केलेले व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी जीवनात व्यवहाराबरोबरच अध्यात्म जपले आहे.त्यांचे जीवन चरित्र युवकासाठी प्रेरणादायी आहे.एम.पी. पाटील म्हणाले, लहानपणी वडिलांचे छत्र हरविल्याने ओढवलेल्या प्रसंगात नातेवाईक, मित्रमंडळी आणि रयतांनी आम्हाला चांगले जपले, चांगले विचार दिले.त्या विचारातून चांगले काम करण्याची प्रेरणा मिळाली. वेदगंगा दूध उत्पादक संघ आणि लोककल्याण संस्थेची स्थापना करून लोकांना मदतीचा हात दिला. जोल्ले दांपत्याच्या सहवासाने गावांचा नावलौकीक केला.

प्रारंभी लोककल्याण सौहार्द क्रेडिट संस्थेच्या सभागृहाचे एम.पी पाटील सभागृह असे नामकरण करण्यात आले. ह.भ.प. शाहीर धोंडीराम मगदूम यांनी एम.पी.पाटील यांच्या जीवन चरित्रावर पोवाडा सादर केला.गावातील ७५ वर्षांवरील ६५ ज्येष्ठ मंडळींचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या संस्थापक सभासदांना १००० रुपयाचे शेअर सर्टिफिकेट वितरण करण्यात आले.तसेच स्वामी, माजी खास. अण्णासाहेब जोल्ले, आम.शशिकला जोल्ले यांच्या हस्ते एम.पी. पाटील व त्यांच्या पत्नी रेखा पाटील यांचा सत्कार करण्यात आला. लोककल्याण संस्थेच्या संचालकांतर्फे तसेच पडलीहाळ येथील सासणे परिवारतर्फे मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. सायंकाळी ह.भ.प. अविनाश भारती महाराज यांचे कीर्तन झाले. कार्यक्रमास हालशुगरचे उपाध्यक्ष पवन पाटील, बिरेश्वर संस्थेचे चेअरमन आप्पासाहेब जोल्ले, प्रा.अच्युत माने, पीएलडी बँकेचे चेअरमन एस. एस.ढवणे, ह.भ.प. श्रीधर महाराज, अशोककुमार असोदे, राजकुमार सावंत, सुकुमार पाटील, बाळासाहेब देसाई, विलास गाडीवडर, रमेश भिवसे यांच्यासह हालसिद्धनाथ कारखान्याचे सर्व संचालक, लोककल्याण क्रेडिट संस्थेचे सर्व संचालक, परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.स्वागत व प्रास्ताविक बाळकृष्ण चेंडके यांनी केले. राजू कल्लोळे यांनी आभार मानले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे आज मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

**सांगली, ता. १४(प्रतिनिधी)–**

**पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सोमवारी सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या सोहळ्याला जनतेने हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार सुधीर गाडगीळ यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना केले आहे.**



आमदार पडळकर म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रीशताब्दी वर्षानिमित्त राज्य आणि देशभर विविध कार्यक्रम उपक्रम सुरू आहेत. अहिल्यादेवींचा विचार नव्या पिढीसमोर यावा. महादेवाची पिंड हातात घेतलेले अहिल्यादेवींचे पुतळे किंवा चित्र सर्वसाधारणपणे सर्वत्र आहे. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यानंतर अनेक मंदिरांचा, तीर्थक्षेत्राचा जिर्णोद्धार केला आहे, त्याचबरोबर एका हातात शस्त्र आणि दुसऱ्या हातात शास्त्र घेऊन त्यांनी कारभारही केला आहे. त्यांचा हाही पराक्रम नव्या पिढीसमोर येणे आवश्यक असल्याने या ठिकाणी हातात तलवार असलेल्या अहिल्यादेवींच्या अश्वारूढ पुतळ्याची उभारणी करण्यात आलेली आहे. संजयनगर मधील लव्हली सर्कल या नावाने परिचित असलेल्या भव्य चौक आता अहिल्यादेवी होळकर चौक म्हणून परिचित होत आहे.

या ठिकाणचा पुतळा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आणि पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी सकाळी दहा वाजता होत आहे. या कार्यक्रमाचे संयोजन महापालिकेच्या वतीने करण्यात आले असून जिल्ह्यातील सर्व आजी, माजी आमदार, खासदार, स्थानिक लोकप्रतिनिधी यांना निमंत्रित करण्यात आलेले आहे.


## जाहीर नोटीस

मौजे कबनूर येथील गट नंबर १०१७ / २ / २ प्लॉट नंबर ६ पैकी क्षेत्र ६५.४२ चौ. मिटर ची मिळकत यासि चतु:सिमा- पुर्वेस - श्री. बडवे व श्री. बापु पाटील यांची मिळकत, पश्चिमेस - २० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नंबर ७ ची मिळकत, उत्तरेस - प्लॉट नंबर ६ पैकी शिल्लक मिळकत. सदर ची मिळकत जनाबाई बाळासो खुडे व श्री. दिपक बाबासाहेब बावडेकर. रा. कबनूर यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे आशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारुन करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. १३/१२/२०२५


**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बस स्टॉपजवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६


# निपाणीत बंगला फोडून ५ लाखांचा ऐवज लंपास

**निपाणी,ता.१४(प्रतिनिधी)–**

**येथील आदर्शनगरमधील लालमहम्मद नूरमहम्मद मुल्ला यांचा बंगला फोडून सुमारे साडेतीन तोळे सोने व २४ हजारांची रोकड असा एकूण ५ लाखाचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली.**



लालमहम्मद मुल्ला यांचा राष्ट्रीय महामार्गानजीक आदर्शनगर येथे बंगला आहे. त्यांचे कुटुंबीय पाहुण्यांच्या कार्यक्रमानिमित्त जामदार प्लॉट निपाणी येथे गेले होते. चोरट्यांनी नेमकी हीच संधी साधून बंगल्याचे कुलूप तोडले. तिजोरीतील साहित्य विस्कटून सुमारे साडेतीन तोळे सोने व २४ हजार रुपयांची रोकड लंपास केली आहे. घटनास्थळी शहर पोलीसांनी भेट देवून पाहणी केली.

# दार उघडा सरकार, दार उघडा!

## शाहू मिल प्रवेशद्वारावर प्रतिकात्मक ठिय्या आंदोलन

**कोल्हापूर, ता.१४ (प्रतिनिधी)–**

**ऐतिहासिक वारसा लाभलेल्या श्री छत्रपती शाहू मिलच्या जागेवर जिल्ह्यासाठी उपयुक्त सामाजिक उपक्रम राबवावेत, या मागणीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी रविवारी सकाळी मिलच्या प्रवेशद्वारावर सर्वपक्षीयांच्या वतीने आणि माणिक पाटील–चुयेकर यांच्या पुढाकाराने दार उघडा सरकार, दार उघडा हे प्रतीकात्मक ठिय्या आंदोलन करण्यात आले.**



राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सुमारे १०० वर्षांपूर्वी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी श्री छत्रपती शाहू मिल्स सुरू केली होती. तथापि, शासनाच्या वस्त्रोद्योग विभागाने सुमारे २५ वर्षांपूर्वी ही गिरणी बंद केली. या जागेचा उपयोग सामाजिक कार्यासाठी व्हावा, अशी मागणी नागरिक सातत्याने करत आहेत.

तीन वर्षांपूर्वी पदवीधर मित्र संघटनेने केलेल्या आंदोलनाची दखल घेऊन शासनाने वस्त्रोद्योग खात्याची ही जमीन आपल्याकडे वर्ग करून घेतली. मात्र, आजपर्यंत या मिलच्या जागेवर कोणत्याही प्रकारच्या विकासकामांची सुरुवात झालेली नाही. या दिरंगाईबद्दल शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.यावेळी रवींद्र मोरे, वसंतराव मुळीक, शिवाजीराव कवाळे, नितीन पाटील, विजय पोळ, राजू माने, बाळासाहेब कवाळे, उत्तम शेटके आदींसह विविध पक्ष व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# दोन कार जळून खाक

**निपाणी,ता.१४(प्रतिनिधी)–**

शॉर्टसर्किटमुळे माळरानातील गवताळ क्षेत्राला आग भडकल्याने दोन कार जळाल्याने १० लाखांचे नुकसान झाले.ही घटना रविवारी दुपारी घडली घटनेची नोंद येथील अग्निशमन दल कक्षात झाली आहे.

शहराबाहेरील पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्गाला लागून हायटेक कॉलनी आहे.दरम्यान या भागातून गेलेल्या विद्युत खांबावरील तारांचा एकमेकांना स्पर्श झाल्याने त्याची ठिणगी गवताळ क्षेत्रावर पडली.त्यामुळे बघता क्षणी आग भडकत गेली.त्यामुळे या आगीत सिद्धु बुरुड यांनी प्लॉटमध्ये लावुन ठेवलेल्या दोन कार पूर्णपणे जळून खाक झाल्याने सुमारे दहा लाखांचे नुकसान झाले.दरम्यान अग्निशामन दलाने धाव घेवुन परिसरातील गवती क्षेत्र विझवले. घटनास्थळी नागरिकांनी गर्दी केली होती.

# दुकानाला आग;९ लाखांचे नुकसान

**बोरगांव,ता.१४ (प्रतिनिधी)–**

बोरगाव शहरातील बालाजी कॉनफेशनरी होलसेल दुकानाला रविवारी सायंकाळी सुमारे ७.३० वाजता अचानक आग लागल्याने यामध्ये सुमारे ९ लाखांचे नुकसान झाले आहे. या घटनेने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. ढोणेवाडी येथील आप्पासाहेब दिपाळे यांचे बोरगाव येथे बालाजी कॉनफेशनरी होलसेल दुकान आहे. दुकानात नेहमीच मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी मटेरियल उपलब्ध असते. रविवारी सायंकाळी सुमारे साडेसात वाजता आप्पासाहेब हे दुकान बंद करून काही कामानिमित्त बाहेर गेले असता दुकानात अचानक आग लागली. आग लागल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला. नागरिकांनी सदलगा येथील अग्निशामक दलाला माहिती दिली. अग्निशामक तातडीने घटनास्थळी धाव घेऊन संपूर्णपणे आग विझवले. आगीत सुमारे नऊ लाखांहून अधिक नुकसान झाले आहे .

# काँग्रेसच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना मनपा निवडणुकीत संधी

## आ. डॉ. विश्वजीत कदम

**मिरज,ता.१४(प्रतिनिधी)–**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाशी निष्ठावंत असणारे कार्यकर्ते आणि निवडून येण्यासाठी असणारे सक्षम उमेदवार या दोन्हीचा मेळ घालून पक्षाकडून उमेदवारी निश्चित केली जाईल, असे माजी मंत्री आ. विश्वजीत कदम आणि खास. विशाल पाटील यांनी स्पष्ट केले. आगामी महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने मिरजेतील रजपूत हॉल येथे काँग्रेस पक्षाच्या इच्छुकांशी रविवारी आ. विश्वजीत कदम व खास. विशाल पाटील यांनी संवाद साधला. त्यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.



विश्वजीत कदम आणि खास.विशाल पाटील म्हणाले, आगामी महानगरपालिकेची निवडणूक ही पूर्ण ताकतीने आम्ही लढणार आहोत. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीमध्ये सांगली आणि मिरजेत आम्हाला चांगले यश मिळाले होते. मतदारांनी आम्हाला चांगली मते दिली. त्यामुळे आगामी महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्येही आम्ही पूर्ण ताकतीने लढू. महाविकास आघाडीचे नेते आ. जयंत पाटील व अन्य नेत्यांशीही बैठक घेऊन चर्चा केली जाणार आहे. आज प्राथमिक तयारी म्हणून आम्ही इच्छुक उमेदवारांशी संवाद साधला. काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते व सक्षम उमेदवार या दोन्हीचा मेळ घालून पक्षाकडून उमेदवारी निश्चित केली जाईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी किशोर जामदार, संजय मेंढे, सिकंदर जमादार, पक्ष निरीक्षक अमर खानापुरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती झाल्या. राकेश कोळेकर, धनराज सातपुते, अभिजित शिंदे, धनंजय भिसे, वसीम रोहिले, प्रतीक्षा सोनवणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अपघातातील जखमी वृद्धाचा मृत्यू

**बोरगाव,ता.१४(प्रतिनिधी)–**

शिरोळ तालुक्यातील हेरवाड – पाचवा मैल मार्गावर असणाऱ्या गायकवाड यांच्या शेताजवळ शनिवारी रात्री झालेल्या अपघातात बोरगाव येथील मधुकर गोविंद हिरेमणी (वय ६५) हे गंभीर जखमी झाले होते.जखमी हिरेमणी यांचा आज मृत्यू झाला. मधुकर हिरेमणी हे शेडशाळ येथे औषध आणण्यासाठी गेले असता हा अपघात झाला होता. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ सुना, नातवंडे असा परिवार आहे.




## जाहीर नोटीस

मौजे यड्राव येथील गट नंबर १७ पैकी क्षेत्र ९४६ चौरस फुट व गट नंबर ५१७ पैकी क्षेत्र १९८४२ चौरस फुटची खुली मिळकत यासि एकत्रीत चतु: सिमा पुर्वेस - श्री. केसरे यांची मिळकत, पश्चिमेस- ४० फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - १० फुट रस्ता, उत्तरेस - गट नंबर ५१७ पैकी मिळकत. सदर ची मिळकत श्री. दिग्विजय रामचंद्र जगताप व सौ. पुजा दिग्विजय जगताप.रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे तोंडी करारपत्र आमचे आशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारुन करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. १२/१२/२०२५

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बस स्टॉपजवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील गट नंबर ७५६ पैकी प्लॉट नं १ पैकी क्षेत्र ७९.२२ चौ. मिटर ची खुली जागा मिळकत यासि चतु:सिमा- पुर्वेस - ४० फुट रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नंबर २, दक्षिणेस - २० फुट रस्ता, उत्तरेस - प्लॉट नंबर १ पैकी शिल्लक मिळकत.सदर ची मिळकत श्री. रविंद्र शंकर पाटील. रा. कोरोची, यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे आशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारुन करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता.१३/१२/२०२५

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बस स्टॉपजवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर ६३३ पैकी प्लॉट नं १ चे क्षेत्र ८३.९३ चौ. मिटर ची जागा व या वरील घर मिळकत यासि चतु:सिमा–पुर्वेस - २० फुट रस्ता, पश्चिमेस - गट नंबर ६३४, दक्षिणेस- श्रीरंग पारसे यांची मिळकत, उत्तरेस- प्लॉट नंबर २. सदर ची मिळकत श्री. हेमंत शंकर साळुंखे. रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे संचकारपत्र आमचे आशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारुन करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता.१३/१२/२०२५

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बस स्टॉपजवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे कबनूर येथील गट नंबर ६९७ पैकी प्लॉट नं ६ चे क्षेत्र २६०.२२ चौ.मिटर ची खुली जागा मिळकत यासि चतु:सिमा–पुर्वेस - प्लॉट नंबर ७, पश्चिमेस - प्लॉट नंबर ५, दक्षिणेस - श्री. चव्हाण यांची मिळकत, उत्तरेस - २० फुट रस्ता. सदर ची मिळकत सौ. जयश्री उत्तम बोंगार्डे रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे संचकारपत्र आमचे आशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारून करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता.१३/१२/२०२५

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बस स्टॉपजवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नंबर २०९ पैकी प्लॉट नं १२ चे क्षेत्र २४९.५४ चौरस मिटर ची मिळकत यासि चतुः सिमा– पुर्वेस - प्लॉट नंबर १३, पश्चिमेस - प्लॉट नंबर ११, दक्षिणेस - २० फुट रस्ता, उत्तरेस– श्री विलास पोवार यांची मिळकत.सदर ची मिळकत श्री. जिवरामजी सोनारामजी जैन (चौधरी) रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र श्री. राजेंद्र बाबुलालजी कांकलीया. रा. इचलकरंजी यांना व त्यांनी आमचे आशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारुन करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता. १३/१२/२०२५

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**

रा.आसरा नगर,
बस स्टॉपजवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित कोरोची

**सहजीवन हौसिंग सोसायटीसमोर कोरोची ता. हातकणंगले**

### फेर स्थावर मिळकत विक्रिचा जाहीर लिलाव

(महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ चे नियम १०७ - ( ११ ) ई प्रमाणे ) ज्या अर्थी श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. कोरोची ता. हातकणंगले जि. कोल्हापुर या संस्थेचे लवादी कर्जदार/थकबाकीदार / स्थावर थकबाकीदार श्री महादेव श्रीपती भोसले रा. कोरोची येथील गट नं. ६३५ प्लॉट नं. २३अ ग्रामपंचायत मिळकत नं. ४२५४ व जुना मिळकत नं. ३२०५ ता. हातकणंगले जि. कोल्हापुर यांची खाली नमुद केलेली स्थावर मालमत्ता रू.२८०७६०/- व चौकशी फी खर्च रू.४७१०/- असे एकुण रक्कम २८५४७०/- व दिनांक ०१/१२/२०२१ पासुन रक्कम रू.२८०७६०/- यावर १५% दराने होणारे व्याज व इतर खर्च रक्कमेचा मा.उपनिबंधकसाो सहकारी संस्था हातकणंगले यांचा महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम चे कलम १०१ अन्वये वसुली दाखला क्र. २५९/२०२२ दि.३१/०५/२०२२ रोजीचा हुकुमनामा प्राप्त झाला आहे आणि ज्याअर्थी सदरची येणे रक्कम व त्यावरील व्याज व वसुली खर्च व इतर खर्च वसुल करणेसाठी कर्जदार/जामिनदार यांच्या स्थावर मिळकतीची विक्री करणे आवश्यक आहे. त्याअर्थी ही नोटीस देऊन जाहीर करणेत येते की श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. कोरोची विशेष वसुली विक्री अधिकारी श्री. बी. एस. पोवार यांनी दिनांक ०५/०१/२०२६ रोजी सकाळी/दुपारी १२.०० गट नं.६३५ प्लॉट नं. २३अ चे क्षेत्र ६५.७३ चौ.मी. राहते घर निवासी मिळकत मु.पो.कोरोची ता. हातकणंगले जि. कोल्हापुर येथील खाली नमुद केलेल्या मिळकतीवर कर्जदार वर नमुद केलेले थकबाकीदार श्री. महादेव श्रीपती भोसले यांचे हक्क दावा व हितसंबंध आणि मालमत्तेची अथवा स्थावर मालमत्तेची मिळकत किंवा त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नाची कायदयान्वये विल्हेवाट लावण्याची जो अधिकार थकबाकीदार श्री. महादेव श्रीपती भोसले हे आपल्या हितासाठी कायदेशिर रीतीने चालवु शकतात तो अधिकार जाहीर लिलाव करून सर्वात अधिक रक्कम बोलेल त्यास लिलावात पुकारलेल्या वाजवी किमंती बद्दल त्या शर्तीस व अटीस अधिन राहुन खालील परिशिष्ठात नमुद मालमत्तेची विक्री करतील.

**– स्थावर मिळकतीचे वर्णन–**

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव | मिळकतीचे ठिकाण व मिळकत नंबर | क्षेत्रफळ | लिलावाची तारीख, वेळ व ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. महादेव श्रीपती भोसले | मौजे कोरोची येथील गट नं.६३५ प्लॉट नं. २३अ चे क्षेत्र ६५.७३ व त्यावरील बांधीव २ खोल्या व संडास बाथरूम क्षेत्र मिळकत नं.४२५४ व जुना नं.३२०५ | ६५.७३ चौ.मी. व त्यावरील बांधकाम | दिनांक ०५/०१/२०२६ वेळ–दुपारी १२.०० वा.ठिकाण श्री महालक्ष्मी नागरी सह. पतसंस्था मर्या., कोरोची | कर्जदार हिश्श्याची मिळकत |

**लिलाव –** १) लिलावाच्या अटी व शर्ती लिलावापुर्वी वाचुन दाखविण्यात येतील. २) लिलावात भाग घेणाऱ्यांनी तत्पुर्वी बयाणा रक्कम रू.५०००/- भरून जमा पावती घेतली पाहीजे. ३) लिलावासाठी परिशिष्ठात नमुद केलेल्या मिळकतीची लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी खात्री करून घेणेची आहे. लिलाव मान्य करणेचा अधिकार वसुली व विक्री अधिकारी यांना राहील. ४) लिलाव मिळकत लिलाव घेणाऱ्यांनी ती आहे तशी स्विकारणेची आहे. ५) सदर मिळकतीतील दाव्याविषयी अथवा इतर कोणत्याही तिऱ्हाईत इसमाने दावा केलेस हक्क व दावा हितसंबंधात यापैकी कसल्याही खरेपणाची हमी दिलेली नाही. ६) ज्या रक्कमेच्या वसुलीसाठी स्थावर मालमत्ता विक्री करावयाची आहे ती थकबाकीदार यांचेकडे येणे असलेली आजपर्यंत रू.४७४०८०/- अधिक पुढील व्याज, सरचार्ज व वसुली खर्च अशी आहे. वर नमुद केलेली मिळकत वसुली अधिकारी यांनी श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित कोरोची या संस्थेकडुन घेतलेल्या कर्जापोटी स्थावर मिळकत जप्ती मनाई आदेशाने जप्त केलेली आहे. ७) ज्यांचे बोलीची रक्कम ७,५४,०००/- चे पटीत असेल त्यांची बोलीची नोंद घेतली जाईल. ८) लिलाव तारखेपूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरलेस लिलाव रद्द होईल.

कोरोची ;
दिनांक – ०५/१२/२०२५

शिक्का

सही/–
**श्री.बी.एस. पोवार**
विशेष वसुली व विक्री अधिकारी

# ग्रामीण डाक पुरस्कारार्थी हे देशाचे नवरत्न

### केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)–

**विश्वासार्हतेच्या जोरावर देशात आपली एक वेगळी ओळख निर्माण करणारे ग्रामीण डाक पुरस्कारार्थी हे खऱ्या अर्थाने देशाचे नवरत्न आहेत, असे गौरवोद्गार केंद्रीय दूरसंवाद तसेच ईशान्य क्षेत्र विकास मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी काढले.**



ग्रामीण डाक सेवक संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया ,खास.शाहू महाराज,खास.धनंजय महाडिक व इतर.

पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या ग्रामीण डाक सेवक संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते .यावेळी व्यासपीठावर खासदार श्रीमंत शाहू महाराज छत्रपती,खासदार धनंजय महाडिक,डाकसेवा (महासंचालक) जितेंद्र गुप्ता, महाराष्ट्र सर्कल मुख्य पोस्टमास्टर (जनरल)अमिताभ सिंग, पोस्टल सर्विसेस बोर्डचे कार्मिक सदस्य सुवेंदुकुमार स्वैन,पोस्टल सर्विसेस पुणे रिजनचे संचालक अभिजीत बनसोडे व गोवा रिजनचे संचालक रमेश पाटील उपस्थित होते.

सार्वजनिक क्षेत्रात आजही देशात सर्वाधिक विश्वासार्हता पोस्ट विभागाने मिळवली आहे. आधार कार्ड , बचत, पासपोर्ट, गुंतवणूक आदी सेवांबाबत पोस्ट विभागाने उल्लेखनीय कार्य केले आहे. देशात सध्या पोस्टात सामान्य नागरिकांची सुमारे ३७ कोटी खाती उघडण्यात आली असून त्यामध्ये तब्बल २१ कोटींची बचत करण्यात आलेली आहे. देशात १ लाख ६५ हजार इतकी ग्रामीण डाक वितरण केंद्रे कार्यरत असून विकसित भारत – २०४७ ची स्वप्न पूर्तता करण्यासाठी पोस्ट विभागाने कार्यरत राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी खास.छ.शाहू महाराज, खासदार धनंजय महाडिक यांनी मनोगत व्यक्त केले. मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या हस्ते सन २०२४–२५ या वर्षामध्ये नवीन खाते उघडणे,टपाल जीवन विमा (पीएलआय) ग्रामीण टपाल जीवन विमा(आरपीएलआय) या योजनेचा अधिकाधिक लोकांना लाभ देणे, इन्श्युरन्स संकलन,थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) व्यवहार तसेच नोंदणी करून टपालाचे जलद वितरण (स्पीड पोस्ट) अशा विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सुहास पाटील,सुरेश नरके, शशिकांत महाजन,रोहिणी कंधारे, अमृता शेरेकर, अजीज मुजावर,महेंद्र पाटील,राजेंद्र शिंदे,जगन्नाथ राऊत आणि नागनाथ गायकवाड अशा दहा डाक सेवकांचा मंत्री महोदयांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन संजय सालेलकर यांनी तर आभार अमिताभ सिंग यांनी मानले.या कार्यक्रमासाठी राज्यातील सहा हजाराहून अधिक डाक कर्मचारी उपस्थित होते.

# महामार्गाचे काम पूर्ण होईपर्यंत टोल वसुली नको

### खास.महाडिक यांची मागणी

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)–

**सातारा ते कागल या महामार्गाचे काम रखडले आहे. शिवाय महामार्गावरील खड्डे, ठिकठिकाणी निर्माण झालेली बाह्य वळणे, यामुळे पुणे ते कोल्हापूर महामार्गावरून प्रवास करणे म्हणजे दिव्य बनले आहे.**

अशा परिस्थितीत नवी दिल्लीत केंद्रीय सडक आणि परिवहन मंत्री नामदार नितीन गडकरी यांनी आढावा बैठक घेतली. सातारा ते कागल महामार्गाचे रखडलेले काम आणि दुरावस्था लक्षात घेता, संबंधीत कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे आणि महामार्ग सुस्थितीत येईपर्यंत वाहन धारकांकडून टोल वसुली करू नये, अशी मागणी खासदार धनंजय महाडिक यांनी केली. सातारा ते कागल महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम गेले दोन वर्षे सुरू आहे. पण अत्यंत संथ गतीने सुरू असलेल्या कामामुळे वाहनधारक हैराण झाले आहेत. सातारा ते कागल महामार्गावर अनेक ठिकाणी खड्डे आहेत. वारंवार येणाऱ्या बाह्य वळणांमुळे प्रवासाला प्रचंड वेळ लागत आहे. पावसाळ्यात तर सातारा ते कागल महामार्गाची भीषण अवस्था झाली होती. या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत केंद्रीय मंत्री नामदार नितीन गडकरी यांनी बैठक घेतली. त्याला राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे वरिष्ठ अधिकारी आणि खासदार धनंजय महाडिक उपस्थित होते.

सातारा ते कागल महामार्गाचे काम प्रचंड रखडले असून, संबंधीत ठेकेदाराला ताबडतोब निलंबित करावे आणि नव्या सक्षम कंपनीकडे हे काम सोपवावे, अशी मागणी खासदार महाडिक यांनी केली. तसेच जोपर्यंत महामार्गाचे काम दर्जेदार रित्या पूर्ण होत नाही, तोपर्यंत वाहनधारकांकडून टोल घेवू नये, अशी मागणीही खासदार महाडिक यांनी केंद्रीय मंत्र्यांकडे केली आहे. दरम्यान गेल्या सहा महिन्यात केवळ दोन टक्के काम केलेल्या संबंधीत ठेकेदारावर कारवाई सुरू केल्याचे नामदार गडकरी यांनी स्पष्ट केले. तसेच खासदार महाडिक यांनी केलेल्या मागणीबाबतही योग्य कार्यवाही करू, असे सांगितले.



रोटरी क्लबमध्ये आयोजित आरोग्य शिबीराप्रसंगी बोलताना संजय घायतिडक सोबत इतर प्रमुख मान्यवर.

# रोटरी क्लबमध्ये आरोग्य शिबीर संपन्न

इचलकरंजी,ता.१४–

**येथील रोटरी क्लब ,ज्ञानेश्वर मुळे फाऊंडेशन ,हुंडिया इन्फोटेक, ज्येष्ठ नागरिक सेवा संघ ,प्रोबस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने व प्रोजेक्ट पार्टनर आदित्य बिर्ला हेल्थ इन्श्युरन्स कं.लि.यांच्या सहकार्याने मोफत बॉडी कंपोझिशन एनालिसिस व बोन मिनरल डेन्सिटी चाचणी या आरोग्य शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.**

सुरूवातीला रोटरी क्लबचे विद्यमान अध्यक्ष रोटेरियन संजय घायतिडक यांनी या शिबीर आयोजनाचा उद्देश सांगितला.रविंद्र सौंदत्तीकर यांनी डॉक्टरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.या शिबीरामध्ये दीडशेहून अधिक ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली.कार्यक्रमास रोटरीचे सेक्रेटरी श्री.पाटील,मुकेश जैन,धोंडीराम कस्तुरे,रामभाऊ कुडचे,जगन्नाथ बजाज,विठ्ठलराव डाके,मोहन सातपुते,पुष्पा मोरे,इंदुमती कुडचे,वैशाली नायकवडे,शशिकला गायकवाड,उज्वला गोंधळी,प्रोबस क्लबचे सभासद व रोटरीचे सदस्य उपस्थित होते.या शिबीरासाठी वसंतराव मोरे,संजय काशीद यांनी परिश्रम घेतले.



तारदाळ येथे मराठा भवनचा पायाभरणी शुभारंभ करताना आम.राहूल आवाडे,सोबत इतर मान्यवर.

# तारदाळमध्ये मराठा भवनचा पायाभरणी शुभारंभ संपन्न

तारदाळ,ता.१४(वार्ताहर)–

**माजी आम. प्रकाश आवाडे व विद्यमान आमदार राहुल आवाडे यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झालेल्या तारदाळ येथील मराठा समाजाच्या भवनसाठी ५० लाख रुपयांच्या निधी मंजूर झालेला आहे. .या भव्य मराठा भवनच्या पायाभरणी शुभारंभ आमदार राहुल आवाडे, सुरेश हाळवणकर, बाळासाहेब माने यांच्या हस्ते संपन्न झाला.**

कार्यक्रमाची सुरुवात ग्रामदैवत शिरकाई देवीच्या दर्शनाने करण्यात आली.यावेळी आमदार आवाडे यांचे ढोल ताशांच्या गजरात ग्रामस्थांनी स्वागत केले . मराठा भवन स्थळी विधीवत पुजा होऊन पायाभरणीचा शुभारंभ सर्व लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ व मराठा समाज बांधव यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी सरपंच सौ .पल्लवी पोवार ,प्रसाद खोबरे,अंजना शिंदे,सुरज कोळी,यशवंत वाणी, प्रकाश खोबरे, भिमराव बन्ने,गुरुकुमार पाटील,डी.पी.भगत,गोगा बाणदार,चंद्रकात तांबवे, जयप्रकाश भगत, नितीन खोचरे, सुरेश पोवार, विजय चौगुले, सचिन पोवार,रणजीत पोवार, सुरेश भगत, राजू मेंगणे, दिपक पोवार, सचिन चौगुले,गजानन नलगे, विनोद कोराणे, विकास खोत,प्रविण पाटील, नयन कांबळे ,लक्ष्मी चौगुले,विमल पोवार, अस्मिता तांबवे, मालुबाई चौगुले,पवन शिंदे, गणपती खोत यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सातापा कांबळे यांची निवड

कागल,ता.१४(प्रतिनिधी)–

**कोल्हापूर जिल्हा ग्रामसेवक पतसंस्थेच्या चेअरमन पदी सातापा कांबळे (आनूरकर) यांची एकमतांनी निवड करण्यात आती. निवड सभेच्या अध्यक्षस्थानी डी.डी.आर ऑफिसचे निलेश पाटील हे होते.**



सर्वांना विश्वासात घेऊन संस्थेचा पारदर्शक कारभार करत, संस्था प्रगतीपथावर नेणार असल्याचे नूतन चेअरमन सातापा कांबळे यांनी सांगितले.कोल्हापूर जिल्हा ग्रामसेवक संघटनेचे राज्य अध्यक्ष तात्यासाहेब पाटील, राज्य सरचिटणीस के.आर. किरुळकर,राज्य उपाध्यक्ष सागर सरवणे,जिल्हाध्यक्ष एल. एस. इंगले, दयानंद मटूरे, विजय रजपूत, विश्वास पाटील, जे. के. कांबळे, संदीप चौगुले, दीपक पाटील,दीपक कांबळे ,रावसाहेब कोळी, संजय सावेकर, विनोद पाटील,संदीप धनवडे, अशोक माने, माधुरी साळुंखे,दीपक परीट, बी.के.कांबळे, सुभाष पाटील ,सचिन तारदाळे ,अण्णाप्पा कुंभार ,गणेश मिस्त्री, सुनील हासुरे,रमेश पाटील, चंद्रकांत पाटील,राजू पाटील आदी उपस्थित होते. निवडीनंतर नुतन चेअरमन यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जैन विकास आर्थिक महामंडळासाठी १५ कोटींचा निधी मंजूर

### ललित गांधी यांची माहिती

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)–

**जैन समाजाच्या धार्मिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी गेल्यावर्षी स्थापन केलेल्या 'जैन अल्पसंख्यांक विकास आर्थिक महामंडळ'साठी पहिल्या टप्प्यात १५ कोटी ४० लाखांचा निधी विधानसभेत पुरवणी मागण्यांच्या माध्यमातुन मंजूर झाला असल्याची माहिती जैन महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.**

धर्मक्षेत्रांचा विकास, सामाजिक उपक्रम, साक्षरता, उद्योग–व्यापार या विविध क्षेत्रात अग्रणी असलेल्या जैन समाजातील अल्प उत्पन्न गटातील लोकांच्या आर्थिक व सामाजिक विकासाबरोबर विद्यार्थ्यांच्या उच्चशिक्षणासाठी, तसेच युवक व महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी व्यापार, उद्योग सुरू करता यावेत यासाठी भांडवलाचा पुरवठा करता यावा यासाठीच्या विविध योजनांबरोबरच जैन समाजाच्या धर्मक्षेत्रांची सुरक्षा, साधु–संतांच्या पायी विहारासाठी व्यवस्था, प्राचीन ग्रंथांचे संरक्षण व संवर्धन या उद्देशांसाठी जैन समाजाचे स्वतंत्र महामंडळ स्थापन करावे, अशी मागणी 'अखिल भारतीय जैन अल्पसंख्यांक महासंघ'चे राष्ट्रीय अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र सरकारकडे केली होती.



सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांद्वारे भाग भांडवलाचा पहिला हप्ता ५ कोटी व विविध योजनांच्या सानुग्रह अनुदानासाठी १० कोटी, आरंभिक खर्चाच्या योजनांसाठी ४० लाख असे एकुण १५ कोटी ४० लाखाचा निधी विधिमंडळाने मंजूर केला असल्याची माहिती ललित गांधी यांनी दिली. महामंडळाच्या योजनांच्या क्रियान्वयनासाठी ललित गांधी यांनी अल्पसंख्याक कार्यमंत्री माणिकराव कोकाटे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ व विविध अधिकाऱ्यांची नागपूर येथे भेट घेऊन पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला यश येऊन निधीचा पहिला टप्पा मंजूर केल्याबद्दल ललित गांधी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

# माणगावात चळवळीच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त झालेल्यांचा सत्कार

साजणी,ता.१४(वार्ताहर)–

**शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी आंदोलन करताना येरवड्यातील कारागृहात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना ठेवलेल्या कोठडी शेजारी मला कोठडी मिळाली याचा सार्थ अभिमान आहे, असे प्रतिपादन माजी खा. राजू शेट्टी यांनी केले. ते माणगाव येथे आयोजित कृतज्ञता सोहळा कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत वसंत भोसले हे होते.**




माणगाव येथे शेतकरी आंदोलनात निर्दोष मुक्तता झालेल्या कार्यकर्त्यांचा सत्कार करताना राजू शेट्टी व उपस्थित मान्यवर.

शेट्टी म्हणाले, २०१२ साली झालेले आंदोलन हे न भुतो न भविष्यती होते. चळवळीत काम करताना कार्यकर्त्यांच्या कुटुंबियांना कोण्या येड्यागबाळ्यांच्या नादाला पोरगं लागलंय हे वाटू नये, याची काळजी घेतली. माजी आ. उल्हास पाटील म्हणाले,चळवळीसाठी जीवाचं रान करणाऱ्या हजारो आंदोलकांमुळे शेतकऱ्यांना चांगले दिवस आले आहेत. आज आमचे पक्ष वेगळे असले तरी विचार शेतकऱ्यांचेच आहेत. कार्यक्रमाला भगवान काटे, पुरंदर पाटील, महादेव धनवडे, ॲड.श्रेणिक पाटील, ॲड. वृषाली देसाई, ॲड. ब्रिजेश शास्त्री, शिवगोंडा पाटील, अभय व्हनवाडे, अरुण मगदूम, अंकुश चव्हाण, गोमटेश पाटील, शामराव कांबळे, सौरभ मगदूम, अभिषेक मगदूम, नितीन कांबळे, लक्ष्मण कोळी यांच्यासह चळवळीसाठी लढाई लढणारे वकीलही उपस्थित होते. यावेळी चळवळीच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त झालेल्या ८० कार्यकर्त्यांचा व त्यांच्यासाठी जामीन देणाऱ्या जामीनदारांचा व वकिलांचा सत्कार करण्यात आला.ज्येष्ठ विचारवंत वसंत भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत व प्रास्ताविक शिवानंद कार्वेकर यांनी तर आभार ऋषभ पाटील यांनी मानले.


Rotary RID 3170 | रोटरी व्याख्यानमाला | 1975-2025 50 Enlightening Lives Every Day

रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी
श्री गुरुदेव आध्यात्मिक केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने
कणेरी मठाचे अधिपती
परमपूज्य
श्री अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजी
यांचे
आध्यात्मिक प्रवचन



दि. 15 ते 18 डिसेंबर 2025, दररोज सायं. 6.00 ते 7.30
चार दिवसीय प्रवचनामध्ये स्वामीजी 'पंच परिवर्तनातून राष्ट्र निर्माणाकडे' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तरी सर्व भाविकांनी याचा लाभ घ्यावा.
स्थळ : रोटरी श्रीमती सोनीदेवी रा. बाहेती सेवा केंद्र, महेश सेवा समिती जवळ, इचलकरंजी



श्रीहरी | शुक्रवार, ता.१२/१२/२०२५ पासून दुपारी १ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
ओ मनचिली
सायं. ४ व ७ वा.
प्रौढांसाठी
सपनो में आजा
A A



श्रीदत्त | शुक्रवार, ता. १२ पासून रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
सुबरान सिक्रेट
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A



पंचवटी | DOLBY DIGITAL PLUS 7.1 | गर्दीचा २ रा आठवडा
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरु राहील
ऑनलाईन बुकींग book my show
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज 3 खेळ 12 ● 3.30 व रात्री 9.






५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत | भाग्यरेखा | DOLBY DIGITAL
वाढत्या गर्दीचा २ रा आठवडा
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
रोज ३ खेळ *११.४५ *३.१५ *६-३० वा.






कल्पना | लेजर प्रोजेक्टरसहीत | शुक्रवार ता.५ पा
दु. १२, दु. ३.३०, रात्री ९ वा
सुपरहिट फुल्ल ॲक्शन चित्रपट






गुरु | शुक्रवार ता.१२ पासून
ऑनलाईन बुकींग book my show
रोज ३ खेळ १२ * ३.४५ * ९ वा.
संपूर्ण भारतातच नव्हे तर जगभरात चर्चेचा विषय बनलेला जबरदस्त चित्रपट



धुरंधर (हिंदी चित्रपट)
अक्षय खन्नाची बेहतरीन ॲक्टींग पहाच



RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
☎ 7447440070 book my show




" धुरंधर " ( हिंदी )
10:15 AM, 01:15 PM
02:00 PM, 03:00 PM
05:00 PM, 05:45 PM
06:45 PM, 09:00 PM
09:45 PM, 10:30 PM
" शोले " ( हिंदी )
11:00 AM
" किस किस को प्यार करू 2" ( हिंदी )
09:00 AM
"अखंडा 2 -3D " ( हिंदी )
10:00 AM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच



फोर्च्युन सिनेप्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on book my show OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11




धुरंधर (HIN) (A)
11.00am, 12.15, 01.30, 02.45, 05.15, 06.45, 09.15, 10.30pm
तेरे इश्क में (HIN) (U/A)
10.30am, 10.00pm
किस किस को प्यार करूं २ (HIN) (U/A)
07.15pm
उत्तर (MAR) (U/A)
04.45pm,
आता पहा मॉर्निंग शो फक्त 100 पासून पुढे

# सातारा पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

## एमडी ड्रग्स प्रकरणी मुंबई पोलिसांच्या कारवाईचे कौतुक; जिल्ह्यात विविध चर्चांना उधाण

सातारा,ता.१४(गुरुनाथ जाधव)-

**मुंबई पोलिसांनी सावरी(ता.जावली) गावात येत ११५ कोटींचा मुद्देमाल छाप्याची कारवाई करून हस्तगत केला. एमडी ड्रग्सच्या आजवरच्या मोठ्या करवाईने सातारा पोलिसांच्या कर्तव्यदक्षतेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे. राजकीय वरदहस्त की दबावापुढे सातारा पोलीस दलाचे गोपनीय नेटवर्क सुद्धा अनभिज्ञ कसे राहिले यावर आता चर्चांना उधाण आले आहे. अधिवेशन काळात चर्चेला मुद्दा मिळणार होता? म्हणून उशिराने कारवाई केली का अशा देखील चर्चा आता जिल्ह्यात रंगल्या आहेत.**

> ५० कोटींचे ७ किलो एमडी ड्रग्स, ३८ किलो लिक्विड, अंमली पदार्थ निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल व इतर साहित्याचा कारवाईत समावेश आहे. याची निर्मिती झाल्यानंतर वाहतूक व दळणवळण रॅकेटद्वारे कसे सुरू होते हा संशोधनाचा मुख्य मुद्दा ऐरणीवर आला आहे.

> मुंबई पोलिसांची कारवाई पण समाजाची जबाबदारीच काय? मुंबई पोलिसांनी केलेली ठोस व धाडसी कारवाई निश्चितच कौतुकास्पद आहे. मात्र केवळ पोलिसांच्या कारवाईवरच अवलंबून राहून चालणार नाही. समाज म्हणून आपली जबाबदारी अधिक मोठी आहे. पालक,सामाजिक संस्था,शाळा,महाविद्यालये सर्व एकत्र आले तरच या संकटावर मात करता येईल. नशामुक्त समाजासाठी प्रशासन नशामुक्त अभियान, जनजागृती सप्ताह राबवते मात्र जिल्ह्यातील विविध भागामध्ये नेमकं चाललंय काय याबद्दल तेरी चुप मेरी चूप असल्याचे धक्कादायक वास्तव एमडी ड्रग्स कारवाईने स्पष्ट झाले.

शेड स्वरूपात असलेल्या फॅक्टरीत गोपनिय स्वरूपात सुरू असलेल्या कारभारामध्ये स्थानिक किती सहभागी होते? याची वाहतूक होत असताना पोलीस दल, आरटीओसह अन्न व औषध प्रशासन नेमकं करत काय होते? असा प्रश्न उपस्थित झाला.पोलीस प्रशासनाच्या दिव्याखाली अंधार! उशिराने प्रकाश पडल्याचे चित्र असताना कोणाच्या कारभाराचा बेरंग करत आहे हे पुढील अधिक तपासानंतर स्पष्ट होईल अशी आशा वाटत आहे.

नगरपालिका- नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक नेत्यांवरील कारवाईचे सत्र विविध ठिकाणी दिसून आले. नोटांचे बंडल,एकमेकांवर जहरी टीका, इथपासून ते स्वबळाच्या नाऱ्यावर ठाम राहत झालेल्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत महायुतीतून न लढता काही ठिकाणी स्वतंत्र लढल्याचे सातारा जिल्ह्यातील चित्र दिसले. सातारा जिल्ह्यात सत्ताधारी असलेल्या महायुतीमध्ये खडा टाकण्याचे काम सुरू झाले की काय? या कारवाईतून एकमेकांवर शरसंधान साधण्याचे काम सुरू आहे का? अशा देखील जिल्ह्यात तसेच राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्या आहेत.

मेफेड्रॉनसारखे अंमली पदार्थ क्षणिक सुख देतात, पण आयुष्यभराची वेदना देऊन जातात. आज या नशेचा विळखा शहरांपुरताच मर्यादित न राहता ग्रामीण भागातही पोहोचत आहे, ही बाब अधिक चिंताजनक आहे. पैशाच्या लालसेपोटी काही लोक संपूर्ण पिढीचे भवितव्य अंधारात ढकलत आहेत.या नशेचे सर्वात मोठे बळी म्हणजे आपली तरुण पिढी शिक्षण,करिअर, कुटुंब, आरोग्य सर्वकाही पणाला लावून नशेच्या आहारी जात आहेत. एकदा का हे व्यसन लागले की त्यातून बाहेर पडणे अत्यंत कठीण होते. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत, गुन्हेगारी वाढत आहे आणि सामाजिक सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे.

# कोरेगावातील मोजणीचे प्रश्न लागणार मार्गी

कोरेगाव,ता.१४(वार्ताहर)-

**कोरेगाव तालुक्यातील भूमी अभिलेख तथा मोजणी विभागातील प्रलंबित प्रकरणाचा निपटारा महिनाभरात करण्याचे निर्देश कोरेगावचे प्रांताधिकारी प्रमोद कुदळे यांनी दिले.**

कोरेगाव भूमि अभिलेख तथा मोजणी कार्यालया द्वारे मोजणी करून देणे, हद्द दाखविणे आदी दैनंदिन कामांची दिरंगाई व शेतकऱ्यांच्या अडीअडचणींच्या बाबतीत तातडीने सुधारणा करावी अन्यथा मोजणी कार्यालयाला टाळे ठोको आंदोलन करण्याचा इशारा मागील आठवड्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला होता.

या पार्श्वभूमीवर मोजणी कार्यालयातील अधिकारी, शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची संयुक्त बैठक प्रातांधिकारी प्रमोद कुदळे यांनी आपल्या कक्षात बोलवली होती.त्यात त्यांनी वरील ग्वाही

> **कोरेगाव भूमि अभिलेख विभागाने शेतकऱ्यांचे प्रश्न तातडीने सोडवावे अन्यथा माजी खासदार राजू शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वाभिमानी शेतकरी संघटना तीव्र आंदोलन छेडेल.**
> **- जीवन शिर्के तालुकाध्यक्ष**

### प्रांताधिकाऱ्यांचे निर्देश स्वाभिमानीच्या इशाऱ्यामुळे बैठक

दिली.सुमारे दोन तास चाललेल्या या बैठकीस उपअधीक्षक धनंजय कदम, तहसीलदार डॉ.संगमेश कोडे, भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी आणि शेतकरी, महिला खातेदार व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. स्वाभिमानीचे तालुकाध्यक्ष जीवन शिर्के व माहिती अधिकार कार्यकर्ते दत्तात्रय सुतार यांनी कोरेगाव कार्यालयातील मोजणी संबंधित प्रलंबित असलेल्या प्रकरणांची ठोस उदाहरणासह सविस्तर मांडणी केली. यावेळी श्री.कदम म्हणाले, कोरेगावमध्ये मला अतिरिक्त पदभार मिळाला असून माण तालुक्याचा मूळ पदभारही माझ्याकडे आहे, तरीदेखील कोणतेही प्रलंबित प्रश्न राहू नयेत यासाठी मी स्वतः पुढाकार घेणार आहे.

श्री. कुदळे यांनी महिनाभरात प्रलंबित सर्व त्या प्रकरणांचा निपटारा करण्याचे आश्वासन देत संबंधित विभागाला स्पष्ट निर्देश दिले. ही बैठक झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये काही प्रमाणात सकारात्मकता निर्माण झाली असली, तरी प्रत्यक्षात प्रलंबित प्रकरणाचा निपटारा कितपत जलद होईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## करण सरवदे याचा सत्कार

कवठेमहांकाळ,ता.१४(प्रतिनिधी)-

**स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने हरियाणा राज्यातील भिवाणी येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय मैदानी क्रीडा स्पर्धेत पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ येथील गुणवंत धावपटू करण रमेश सरवदे याने तीन हजार मीटर धावणे स्पर्धेत सुवर्णपदक, तर सहा किलोमीटर क्रॉसकंट्री धावणे स्पर्धेत रौप्यपदक पटकावत दुहेरी यशाची नोंद केली.**

करण सरवदे हा नागज येथील रहिवासी आहे.या यशाबद्दल महाविद्यालयात करण सरवदे याचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, प्राचार्य डॉ.जी. डी. कोरे, उपप्राचार्य धनपाल यादव, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. मयूर शिंदे, प्राध्यापक, क्रीडा प्रशिक्षक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऊस बिलातून कर्जवसुली थांबवा-पंजाबराव पाटील

कराड,ता.१४(प्रतिनिधी)-

**राज्य सरकारने ३० जून २०२६ पर्यंत राज्यातील शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्याची घोषणा केलेली आहे. असे असताना जिल्हा बँक व सरकारी बँकांकडून राज्यात शेतकऱ्यांच्या पीक कर्जाची वसूली केली जात आहे. ती कर्जवसुली तत्काळ थांबवावी. काही ठिकाणी बँका थेट ऊस बिलातून कर्जाचे पैसे भरून घेत आहेत. सरकारने असे प्रकार तत्काळ थांबवावे,अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा बळीराजा शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पंजाबराव पाटील यांनी दिला आहे.**

कर्जमाफीसाठी जे शेतकरी ३० मार्च २०२६ रोजी थकीत असतील, अशा शेतकऱ्यांना लाभ मिळणार असल्याचे राज्य सरकारने जाहीर केलेले आहे. परंतु ३० जून २०२६ अगोदर कर्जाची वसुली झाल्यास तो शेतकरी थकबाकीदार राहणार नाही. त्यामुळे तो कर्जमाफीला पात्र होणार नाही.

सध्या राज्यामध्ये साखर कारखाने सुरू झालेले आहेत. कारखान्याला आलेल्या शेतकऱ्यांच्या उसाच्या बिलातून थेट कर्जाची वसुली करत आहेत. याच्यावर सरकारचे नियंत्रण नाही. सरकारने जाणीवपूर्वक कर्जमाफीला मुदत वाढवलेली आहे. यामुळे ऊस बिलातून कर्ज वसूल झालेले शेतकरी अपात्र होणार आहेत. त्यांच्यावर झालेल्या अन्यायाला राज्य सरकार जबाबदार आहे. अशा प्रकारच्या ऊस बिलातून कर्जवसुली तात्काळ सरकारने थांबवावी व शेतकऱ्यांना कर्जमाफी पासून वंचित न ठेवता लाभ मिळवून देण्यात यावा, अशी मागणी पंजाबराव पाटील यांनी केली आहे.



सहाय्यता कक्षाच्या शुभारंभप्रसंगी उपस्थित मान्यवर.

## मिरजेत धर्मवीर दिघे सहाय्यता कक्षाचा शुभारंभ

मिरज,ता.१४(प्रतिनिधी)-

**येथील मोहन वनखंडे शिवसेना महानगरप्रमुख यांच्या जनसंपर्क कार्यालयात धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्ष या उपक्रमाचे उद्घाटन शिवसेना मुंबईचे निवडणूक समन्वयक वैभव वाघ यांच्या हस्ते उत्साहात झाले.**

कार्यक्रमास सांगली जिल्हा अध्यक्ष बजरंग पाटील यांच्यासह सागर वनखंडे, रामचंद्र साळुंखे, अमोल वळसंग, युवक नेता युवराज यमगर, विनायक हजारे तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.नागरिकांच्या दैनंदिन नागरी समस्या, रस्ता,पाणी, वीज, स्वच्छता, आरोग्य, समाजकल्याण तसेच महापालिकेच्या विविध शासकीय योजनांसंदर्भातील मार्गदर्शन-यासाठी हा सहाय्यता कक्ष सुरू करण्यात आला आहे. नागरिकांच्या अडचणींचे तात्काळ निराकरण हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

# काटामारी रोखण्यासाठी लोकवर्गणीतून वजनकाटा

## नागाचे कुमठे ग्रामस्थांचा निर्णय;स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांचा सत्कार

वडूज,ता.१४(वार्ताहर)-

**खटाव तालुक्यातील नागाचे कुमठे येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या संघर्षवीरांचा ग्रामस्थांच्यावतीने उत्साहात सत्कार करण्यात आला. ऊसदर वाढीसाठी झालेल्या मोठ्या लढ्यात स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी दाखवलेल्या धैर्य, चिकाटी आणि संघटनशक्तीमुळे सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ₹ ३५०० पर्यंतचा दर मिळवून देण्यात संघटना यशस्वी ठरली.**

या संघर्षाचा परिणाम म्हणून प्रत्येक गावात जवळपास अतिरिक्त २ ते २.२५ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात ज्यादा आले आहेत. हा खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा विजय असून स्वाभिमानी शेतकरी संघटनेची चळवळ एका विशिष्ट उंचीवर पोहोचल्याचे प्रतीक असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले.याच कार्यक्रमात शेतकऱ्यांच्या खरी अडचण बनलेल्या उसाच्या काटामारीचा



नागाचे कुमठे येथे ऊस दरासाठी लढलेल्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या योध्यांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी उपस्थित.

मुद्दाही ठळकपणे मांडण्यात आला. गाव तिथे वजन काटा या स्वाभिमानीच्या अभियानाला पाठबळ देत शेतकऱ्यांचे वजन योग्य नोंदले जावे, अन्याय होऊ नये यासाठी नागाचे कुमठे ग्रामस्थांनी लोकवर्गणीच्या माध्यमातून स्वतःचा वजनकाटा उभारण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

'गाव तेथे काटा' या अभियानाची प्रत्यक्ष सुरुवात करण्याचा मान कुमठेकरांनी घेतला असून ऊस काटामारीला रोखण्यासाठी हे मोठं पाऊल मानले जात आहे.

कार्यक्रमात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राज्य प्रवक्ते अनिल पवार, स्वाभिमानीचे युवा जिल्हाध्यक्ष तानाजी देशमुख, तालुकाध्यक्ष दत्तू काका घार्गे, खटाव माणचे संपर्कप्रमुख शरद खाडे यांनी आपल्या विचारांतून संघटनेचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच ग्रामस्थांच्या वतीने स्वाभिमानी पदाधिकाऱ्यांचा सत्कार सभापती संदीप मांडवे, महाराष्ट्र केसरी धनाजी फडतरे, दिलीप मांडवे, संतोष मांडवे यांच्या हस्ते करण्यात आला.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेला मिळालेले यश टिकवण्यासाठी चळवळ आणखी बळकट करण्याचे आवाहन विविध पदाधिकाऱ्यांनी केले. यावेळी तालुका संघटक संतोष तुपे, युवा संघटक सुभाष जाधव, वडूज शहर उपाध्यक्ष संतोष पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती.

## शेत पाणंद रस्ते योजना क्रांतिकारक ठरेल-आ.भोसले

कराड,ता.१४(प्रतिनिधी)-



**कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघात मातोश्री पाणंद रस्ते योजनेतून २०० कामांना मंजुरी मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना क्रांतिकारक ठरेल असा विश्वास भाजपचे सातारा जिल्हाध्यक्ष आ.डॉ. अतुलबाबा भोसले यांनी व्यक्त केला आहे.**

राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी क्रांतिकारक निर्णय घेत, राज्यात मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना आणली आहे. या योजनेमुळे जमिनीचे वाद मार्गी लागून, सर्व पाणंद रस्त्याची कामे पूर्ण होतील, असा विश्वास आ.डॉ.अतुलबाबा भोसले यांनी विधानसभेत बोलताना व्यक्त केला.

# पाटबंधारेतील भ्रष्टाचार प्रकरणी जनहित याचिका

## महेश शिंदे यांची उच्च न्यायालयात पुराव्यासह याचिका दाखल

भिलवडी,ता.१४(वार्ताहर)-

**पाटबंधारे मंडळ सांगली येथे सुरू असलेल्या अनागोंदी, अनियमितता आणि भ्रष्टाचाराच्या गंभीर प्रकरणांविरोधात सामाजिक कार्यकर्ते महेश शिंदे यांनी थेट उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत. मंडळातील नियतकालिक बदल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याची तक्रार शिंदे यांनी पुराव्यासह वारंवार केली होती.अनेक अधिकारी बदली आदेश निघूनही वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी रूजू राहिल्याचे धक्कादायक प्रकार त्यांच्या तक्रारीत उघड झाले आहेत.**

शिंदे यांनी माहिती अधिकार कायद्यानुसार कागदपत्रे, अहवाल आणि संबंधित पुरावे गोळा करून सांगली येथील पाटबंधारे संबंधित बऱ्याचशा कार्यालयांना पत्र व्यवहार देखील केला. मात्र संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही.

कार्यकारी अभियंता यांनी शासकीय नियमांचे उल्लंघन केलेच आहे शिवाय त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाचे देखील कोणतेही प्रकारच्या आदेशाचे पालन केलेले नाही. बरेचसे कर्मचारी हे बरीच वर्षे एकाच कार्यालयामध्ये कार्यरत असल्यामुळे अधिकाराचा आणि पदाचा चुकीच्या पद्धतीने वापर करून कायद्याची पायमल्ली केलेली दिसून येते.

पाटबंधारे विभाग, मंडळ यांच्या यांचे वरिष्ठ कार्यालय ही संगनमताने एकमेकांना पाठीशी घालत आहेत त्यामुळे बऱ्याचशा गैरप्रकारावर तपशीलवार आढावा घेत, मंडळातील कायदेशीर व प्रशासकीय अनियमितता थांबवण्यासाठी आणि जबाबदार कनिष्ठ व वरिष्ठ आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी यासाठी शिंदे यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. याचिकेतील सर्व कायदेशीर बाबी ॲड. सिद्धेश्वर भिमदे व ॲड.गणेश पुरीबुवा पाहत आहेत.

या प्रकरणामुळे पाटबंधारे मंडळातील कार्यपद्धती व पारदर्शकतेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आगामी दिवसांत न्यायालयीन कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गुणवत्ता वाढविल्यास जागतिक स्तरावर संधी

## - डॉ.शीतल शेंडगे

क.महांकाळ,ता.१४(प्रतिनिधी)-

**येथील शिक्षण प्रसारक संस्था संचलित पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ येथे रसायनशास्त्र विभाग (पदव्युत्तर व पदवी विभाग) आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमान 'बीयॉण्ड द मास्टर्स इन केमिस्ट्री' या विषयावर ऑनलाइन अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.**

या व्याख्यानात तैवान येथील चँग गुंग विद्यापीठात कार्यरत पोस्ट-डॉक्टोरल संशोधक डॉ.शीतल शेंडगे यांनी या माध्यमातून बी.एस्सी. व एम.एस्सी. रसायनशास्त्राच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.डॉ. शेंडगे यांनी आपल्या व्याख्यानात पदव्युत्तर



रसायनशास्त्रात पदव्युत्तर शिक्षणानंतरच्या आंतराष्ट्रीय संधीवर तैवानहून मार्गदर्शन करताना डॉ.शीतल शेंडगे.

शिक्षणानंतर संशोधन,पोस्ट-डॉक्टोरल संधी, आंतरराष्ट्रीय फेलोशिप्स,तसेच उद्योग, बायोमेडिकल व आंतरशाखीय क्षेत्रातील करिअर संधी यांचा सविस्तर आढावा घेतला.या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे, सचिव सुदर्शन शिंदे, तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.जी.डी. कोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाचे संयोजन प्रा. अविनाश कांबळे यांनी केले, तर आभार प्रा.अमर पवार यांनी मानले. कार्यक्रमासाठी डॉ. राधाकृष्ण सुतार, प्रा. तुषार शिंदे तसेच रसायनशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# पृथ्वीराज पाटील ठरला जनसुराज्यश्रीचा मानकरी

## वारणेत रंगला कुस्तींचा थरार;हजारो शौकिनांची उपस्थिती

वारणानगर,ता.१४(प्रतिनिधी)-

**वारणानगर येथे झालेल्या कुस्ती मैदानात महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील व हरियाणा हिंदकेसरी रविंद्र कुमार यांच्यात अटीतटीची लढत झाली. पृथ्वीराजने विसाव्या मिनिटांत रवींद्र कुमारला पोकळ घिस्सा डावावर अस्मान दाखवुन जनसुराज्य शक्ती श्री चा पहिल्या क्रमांकाचा किताब पटकावला.**

सहकारमहर्षि स्व. तात्यासाहेब कोरे यांच्या ३१ व्या पुण्यस्मरणार्थ शनिवारी दुपारी विश्वनाथ वारणा शक्ती श्री कुस्तीचा महासंग्राम थरार पार पडला. वारणा विद्यालयाच्या भव्य पटांगणावर दुपारी दोन वाजता सुरू झालेले कुस्त्यांचे मैदान रात्री दहा वाजता संपले.

आमदार डॉ.विनय कोरे,वारणा कारखान्याचे उपाध्यक्ष प्रतापराव पाटील,वारणा दूध संघाचे उपाध्यक्ष एच.आर.जाधव, नेते विश्वेश कोरे, जोतिरादित्य कोरे, वारणा कुस्ती केंद्राचे वस्ताद संदीप पाटील यांच्या हस्ते मैदानाचे पूजन व श्रीफळ वाढवून कुस्त्यांना प्रारंभ झाला. कुस्त्या पाहण्यासाठी महाराष्ट्र,कर्नाटक, आंध्रप्रदेश आदी राज्यांतून लाखोंच्या संख्येने कुस्ती शौकीनांनी हजेरी लावली होती.

दुसऱ्या क्रमांकासाठी पुणे येथील हनुमान आखाड्याचा उपमहाराष्ट्र केसरी माऊली कोकाटे विरुद्ध हरियाणाचा कुमार भारत केसरी निशांत जाट यांच्यात झालेल्या अटीतटीच्या लढतीत माऊली कोकाटे याने गुणांवर विजय मिळवून वारणा साखर शक्ती श्री



पै.पृथ्वीराज पाटील याला जनसुराज्यशक्ती श्री किताब आम. डॉ.विनय कोरे यांच्या हस्ते देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित विश्वेश कोरे,समित कदम,आ.अशोक माने व इतर .

किताब मिळवला.

वारणा दूध संघ शक्ती श्री किताबासाठी गंगावेश कोल्हापूरच्या उपमहाराष्ट्र केसरी प्रकाश बनकरने हरियानाच्या जब्बर आखाड्याचा चिराग याच्यावर मात केली. वारणा बँक शक्ती श्री किताबासाठी झालेल्या लढतीत हर्षद सादगीर व पंजाबच्या बाबा फ्लाय आखाड्याचा इशाक चौधरी यांच्यात मोठी चुरस झाली बराच वेळच्या झटापटीनंतर पैलवानांना दोन मिनिटं वेळ देण्यात आला. या लढतीत महाराष्ट्र केसरी नाशिकचा हर्षद सादगीर विजेता ठरला.

वारणा दूध साखर वहातूक शक्ती किताबासाठी झालेल्या लढतीत पंजाबचा लुधीयाना जसप्रीत जखमी झाल्याने सांगलीच्या राष्ट्रीय विजेता सुबोध पाटील याला विजयी घोषित करण्यात आले.

वारणा ऊस वाहतूक शक्ती श्री झालेल्या किताबासाठी हरियाणा पळवल आखाड्याच्या मलंग ठाकुर याने उलटीपट्टी डावावर राष्ट्रीय विजेत्या सांगलीच्या संदीप मोटेला अस्मान दाखविले.

वारणा बिलटच्यूब शक्ती किताबासाठी गंगावेशच्या महाराष्ट्र चॅम्पीयन कालीचरण सोलणकर याने झोळी डावावर पंजाबच्या राष्ट्रीय विजेत्या रफी होशीयारपूरला अस्मान दाखवून किताब पटकावला.वारणा शिक्षण शक्ती किताबासाठी पुणेचा महाराष्ट्र चॅम्पीयन समीर शेख याने पाचव्या मिनिटाला घिस्सा डावावर नाशिकच्या राष्ट्रीय विजेत्या बाळू बोडकेला चितपट केले.

वारणा बझार व वारणा महिला शक्ती किताबाच्या लढतीत मिणचे चा महाराष्ट्र चॅम्पियन श्रीमंत भोसले याने राष्ट्रीय विजेता हरियानाच्या मोनुकुमारवर मात केली.ई डी एफ मान शक्ती किताबासाठी झालेल्या लढतीत महाराष्ट्र चॅम्पियन वारणेच्या नामदेव केसरे याने हरियानाच्या राष्ट्रीय विजेत्या नवीन कुमारला अस्मान दाखविले.

# आयपीओंची बरसात

**भारतीय शेअर २०२६ हे वर्ष पुन्हा एकदा आयपीओंच्या उसळत्या लाटेचे वर्ष ठरणार आहे. गेल्या काही वर्षांत कंपन्यांचा भांडवली बाजारात दाखल होण्याचा वेग वाढत चालला आहे आणि त्याचा परिपाक म्हणजे आज आयपीओ बाजारात दिसणारी अभूतपूर्व गर्दी. गुंतवणूकदारांची वाढती संख्या आणि त्यामुळे आयपीओंना मिळणारे मागणीचे पाठबळ, पुरेशी लिक्विडिटी, आणि अनुकूल आर्थिक वातावरण या सर्व घटकांमुळे कंपन्या नव्या भांडवलासाठी शेअर बाजाराकडे मोठ्या प्रमाणावर वळत आहेत.**

### २.५५ लाख कोटी रुपयांची बरसात

२०२६ साठी आतापर्यंत ८८ कंपन्यांना भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाने आयपीओची मान्यता दिली आहे. या कंपन्यांचे एकत्रित लक्ष्य तब्बल १.१६ लाख कोटी रुपये उभे करण्याचे आहे. त्याशिवाय १०४ हून अधिक कंपन्या अद्याप मंजुरीची प्रतीक्षा करत आहेत आणि त्यांचा मिळून अंदाजे १.४ लाख कोटी रुपयांचा आयपीओ आकार राहणार असल्याने येत्या वर्षी भांडवली बाजारात साधारण २.५५ लाख कोटी रुपयांची बरसात या आयपीओंच्या माध्यमातून होणार हे स्पष्ट आहे.

### २०२५ मध्ये १८ वर्षांनंतरचा उच्चांक

गेल्या वर्षी, म्हणजे २०२५ मध्ये, जवळजवळ १०० भारतीय कंपन्यांनी १.७७ लाख कोटी रुपयांचे भांडवल उभे केले. हा आकडा २००७ नंतरचा सर्वाधिक मानला जातो. २०२४ मध्ये ९१ आयपीओंद्वारे १.६ लाख कोटी रुपये आणि २०२३ मध्ये ५७ आयपीओंद्वारे ४९,५०० कोटी रुपये उभारले गेले. या तीन वर्षांतील चढत्या क्रमाने भांडवल उभारणी वाढत गेल्याचे चित्र स्पष्टपणे दिसते.

### कारण काय?

या वाढत्या उत्साहामागे देशी आणि विदेशी गुंतवणूकदारांचा मजबूत सहभाग प्रमुख आहे. एफपीआय, किरकोळ गुंतवणूकदार, एचएनआय वर्ग आणि म्युच्युअल फंडांनी नव्या इश्यूंमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. सेकंडरी मार्केटमधील काहीशी कमकुवत कामगिरी असूनही गुंतवणूकदारांनी आयपीओंकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले. त्यामुळे कंपन्यांना सहजपणे मोठे इश्यू आकार ठरवता आले आणि ते यशस्वीही ठरले.

### २४४ कंपन्यांकडून डीआरएचपी

ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस अर्थात डीआरएचपीच्या संख्येत झालेली वाढदेखील आयपीओ बाजारातील तापमान किती वाढले आहे हे दाखवते. २०२५ मध्ये २४४ कंपन्यांनी डीआरएचपी दाखल केले. हा आकडा २०२४ मधील केवळ १५७ फाइलिंग्जच्या तुलनेत लक्षणीयरित्या जास्त आहे. यावरून कंपन्या शेअर बाजारात प्रवेश करण्यास किती उत्सुक आहेत, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.




### गुंतवणूकदारांना काय मिळाले?

एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, या वर्षी सूचिबद्ध झालेल्या ३०० हून अधिक कंपन्यांपैकी जवळजवळ निम्म्या कंपन्यांचे शेअर्स त्यांच्या इश्यू प्राइसच्या खालीच व्यापार करत आहेत. लिस्टिंग गेन कमी असूनही कंपन्यांनी विक्रमी प्रमाणात भांडवल उभे करण्यात यश मिळवले. प्रमोटर्स, प्रायव्हेट इक्विटी आणि व्हेंचर कॅपिटल फंडांनी ऑफर फॉर सेल अर्थात ओएफएसमधून तब्बल १.१ लाख कोटी रुपयांची हिस्सेदारी बाजारात विकली. गुंतवणूकदारांचा प्रतिसाद अनुकूल असल्याने अशा मोठ्या विक्रीला देखील चांगली मागणी मिळाली.

### सेबीच्या सुधारणा

याच काळात सेबीनेही आयपीओ प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुलभ करण्याची पावले उचलली आहेत. नोव्हेंबरमध्ये जाहीर करण्यात आलेल्या सुधारणा विशेषतः प्री–आयपीओ काळात गहाण ठेवलेल्या शेअर्सच्या लॉक–इन कालावधीशी संबंधित समस्या दूर करण्यावर लक्ष केंद्रित करतात. डिपॉजिटरीजना लॉक–इन काळात असलेल्या गहाण शेअर्सना नॉन–ट्रान्सफरेबल म्हणून चिन्हित करण्याचा अधिकार देण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. आयपीओंना आवश्यक असलेल्या खुलास्यांची प्रक्रिया सोपी करणे आणि गुंतवणूकदारांना अचूक माहिती उपलब्ध करून देणे, हे या सुधारणांचे मूळ उद्दिष्ट आहे. एकूण चित्र पाहता, २०२६ हे आयपीओंच्या दृष्टीने निर्णायक, उत्साही आणि विक्रमी वर्ष ठरण्याची पूर्ण चिन्हे दिसत आहेत. कंपन्यांची मोठी रांग, गुंतवणूकदारांचा ओढा, बाजारातील भरपूर लिक्विडिटी आणि सेबीचे सुधारित नियम यामुळे पुढचा वर्षभारतीय भांडवली बाजारासाठी अत्यंत महत्वपूर्ण ठरेल. गुंतवणूकदारांसाठीही नव्या संधींचे दरवाजे खुले होणार असून, येणारी आयपीओची बरसात हे त्याचे ठळक रूप ठरणार आहे. ◆◆◆

# क्रेडिट कार्डची मर्यादा वाढवून घेताय?

डिजिटल व्यवहाराच्या झपाट्याने वाढलेल्या काळात क्रेडिट कार्ड हा शहरी जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. ऑनलाईन खरेदी, बिलांचे पेमेंट, तातडीच्या प्रसंगी निधी उपलब्धताह्या सर्व कारणांनी क्रेडिट कार्डचा वापर सहज झाला असला तरी त्याच सुविधेचा गैरफायदा घेण्यासाठी सायबर फसवेगिरीचे प्रकारही चिंताजनकरित्या वाढले आहेत. विशेषतः क्रेडिट कार्डची लिमिट वाढवून देऊ असे सांगत करण्यात येणाऱ्या फसवणुकांनी अनेक ग्राहक आर्थिक अडचणीत सापडत आहेत.

अलीकडील अनेक प्रकरणांत फसवे लोक फोन कॉल, एसएमएस किंवा ईमेलच्या माध्यमातून संपर्क साधत ग्राहकांना सांगतात की त्यांच्या कार्डची लिमिट वाढवली जात आहे. ते एक लिंक पाठवतात किंवा कार्डधारकाकडून वैयक्तिक माहिती मागतात. अनेक वेळा ही लिंक पाहता बँकेसारखीच भासते, पण त्यामागे डेटा चोरी करण्याचा हेतू असतो. लिंक उघडताच किंवा माहिती दिल्यानंतर ग्राहकाचे तपशील गैरकायद्याने ह्या फसवणूक करणाऱ्यांच्या हातात जातात आणि नंतर कार्डवर अनधिकृत व्यवहार सुरू होतात. ओटीपी मागणे, केवायसी अपडेटच्या नावाखाली तपशील मागणे, कार्ड ब्लॉक होण्याचा धाक दाखवणेह्या सर्व पद्धतींचा वापर करून फसवेगिरी केली जाते.

**दक्षता काय घ्यावी?**

सर्वप्रथम, कोणताही कॉल, ईमेल किंवा मेसेज मिळाला तर त्यावर त्वरित विश्वास न ठेवता थेट आपल्या बँकेच्या अधिकृत ग्राहकसेवा क्रमांकावर संपर्क साधणे हे सर्वांत सुरक्षित पाऊल ठरते. बँका स्वतःहून कधीही अनौपचारिक क्रमांकावरून

लिमिट




वाढवण्याची माहिती देत नाहीत. त्यामुळे अशा संपर्कांचे सत्यापन नेहमी बँकेकडूनच करणे आवश्यक असते.

दुसरे म्हणजे, ईमेल किंवा मेसेजमधील अनोळखी लिंकवर क्लिक न करणे हा महत्त्वाचा नियम. अनेक वेळा लिंकवर क्लिक केल्यावर मोबाईलमध्ये मालवेयर इन्स्टॉल होत असून त्याद्वारे वैयक्तिक माहिती चोरी होण्याचा धोका वाढतो.

ओटीपी, कार्ड नंबर, सीव्हीव्ही, पिन किंवा नेटबँकिंगची माहिती कोणालाही सांगू नये. ही माहिती शेअर केल्यास आर्थिक नुकसानाची पूर्ण जबाबदारी ग्राहकावरच येते.

तिसरी सावधगिरी म्हणजे, प्रत्येक महिन्यातील स्टेटमेंट तपासणे. अगदी छोटा संशयास्पद व्यवहार दिसताच तात्काळ बँकेला कळवणे हे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक असते. आज अनेक बँकांच्या मोबाईल ॲपमध्ये मिनिटामिनिटाला व्यवहाराची सूचना येते. त्या सुविधा सक्रिय ठेवणेही सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

क्रेडिट कार्डची लिमिट वाढवायची असल्यास किंवा कार्डमध्ये इतर बदल करायचे असल्यास फक्त बँकेच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा मोबाईल ॲपवरूनच प्रक्रिया करावी. तृतीय पक्ष किंवा अनधिकृत एजंटकडून मिळणाऱ्या ऑफर विश्वसनीय नसतात. ◆◆◆

**क्रेडिट कार्ड लिमिट वाढवणे ही बँकेची अधिकृत आणि शिस्तबद्ध प्रक्रिया आहे. ती केवळ ग्राहकाच्या विनंतीवर किंवा बँकेने अधिकृतरित्या पाठविलेल्या सूचना मिळाल्यावरच केली जाते. अनेक वेळा फसवे लोक ग्राहकांच्या लालसा आणि घाईचा फायदा घेतात. लिमिट वाढत आहे हे ऐकताच ग्राहक तत्काळ माहिती देतात आणि याच घाईत फसवणूक होते. म्हणूनच डिजिटल युगात आर्थिक व्यवहार सुरक्षित ठेवण्यासाठी संयम, सजगता आणि शाश्वत पडताळणी या तीन गोष्टींचे महत्त्व अधिक वाढले आहे.**

# कॅपिटल गेन बॉण्डमध्ये दोनदा गुंतवणूक करता येते का?

जमीन किंवा इमारत विकल्यावर होणाऱ्या लॉंग टर्म कॅपिटल गेनवर सूट मिळवण्यासाठी आयकर कायद्यातील सेक्शन ५४ ईसी हा एक महत्त्वाचा पर्याय मानला जातो. या तरतुदीनुसार कॅपिटल गेनची रक्कम आरईसी, एनएचएआय, पीएफसी, आरएफसी, हुडको किंवा इर्डा या वित्तीय संस्थांनी जारी केलेल्या कॅपिटल गेन बॉण्डस्‌मध्ये सहा महिन्यांच्या आत गुंतवली, तर तेवढ्या रकमेवर करसूट मिळू शकते.




अनेक करदात्यांना असा प्रश्न पडतो की एकदा ५० लाखांची गुंतवणूक केल्यानंतर, त्याच सेक्शनखाली त्याच सहा महिन्यांच्या कालावधीत पुन्हा ५० लाख गुंतवून सूट घेता येते का? या प्रश्नाचे उत्तर समजून घेण्यासाठी ५४ ईसीमधील दोन महत्त्वाच्या अटी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

या तरतुदीनुसार एक वित्त वर्षात कॅपिटल गेन बॉण्डमध्ये जास्तीत जास्त ५० लाख रुपये इतकीच गुंतवणूक करता येते. ही मर्यादा स्पष्ट असून त्यात कोणतीही सवलत दिलेली नाही. त्यामुळे ज्या करदात्याने एका आर्थिक वर्षात आधीच ५० लाख रुपये बॉण्डमध्ये गुंतवले असतील, त्याच वर्षात आणखी ५० लाख गुंतवून सूट मिळवणे शक्य होत नाही. ही मर्यादा केवळ सूटसाठीच नाही, तर गुंतवणुकीच्या प्रत्यक्ष रकमेसाठीही लागू होते. मात्र इथे आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो. कॅपिटल गेन बॉण्डमध्ये गुंतवणूक करण्याची सहा महिन्यांची मुदत पुढील आर्थिक वर्षातही चालू राहू शकते. म्हणजेच, जर एखाद्याने मालमत्ता विकली आणि त्या तारखेपासून सहा महिन्यांपैकी काही कालावधी पुढील वित्त वर्षात जात असेल, तर करदात्यास पुढील वर्षातील ५० लाखांच्या मर्यादेत नव्या वर्षात गुंतवणूक करण्याची संधी उपलब्ध होते.उदाहरणार्थ, करदात्याने चालू आर्थिक वर्षात ५० लाखांची गुंतवणूक आधीच केलेली असेल, परंतु मालमत्ता विक्रीपासून सहा महिने पूर्ण होण्यासाठी काही दिवस पुढील वित्त वर्षातही शिल्लक असतील, तर तो पुढील वर्षात नव्याने ५० लाखांची गुंतवणूक करून सूट घेऊ शकतो. म्हणजेच, दोन्ही अटीह्एक वर्षाची ५० लाखांची मर्यादा आणि विक्रीपासून सहा महिन्यांत गुंतवणूकह्या दोन्हींचे पालन झाले पाहिजे.यावरून स्पष्ट होते की सेक्शन ५४ ईसी अंतर्गत दोनदा सूट मिळणे शक्य असले, तरी ते दोन वेगवेगळ्या वित्त वर्षांत आणि सहा महिन्यांच्या मूळ विंडोमध्ये केलेल्या गुंतवणुकीवरच अवलंबून असते. त्यामुळे एकाच आर्थिक वर्षात ५० लाखांपेक्षा जास्त गुंतवणूक करण्याचा मार्ग कायद्यात उपलब्ध नाही. या संपूर्ण प्रक्रियेवरून करदात्याने लक्षात ठेवण्यासारखे एवढेच की सूट मिळवताना वेळेची मर्यादा आणि वित्त वर्षाची मर्यादा या दोनही गोष्टी काटेकोरपणे पाळल्या, तर ५४ ईसी अंतर्गत मिळणारा लाभ सर्वस्वी वैध ठरतो. ◆◆◆

# युलिप्स प्लॅन्स खरंच १४ टक्के परतावा देतात?




युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्लॅन्स म्हणजेच युलिप्स १४ टक्के परतावा देतात, अशी आकर्षक मांडणी सध्या मोठ्या प्रमाणावर गुंतवणूकदारांना दाखवली जात आहे. चमकदार प्रेझेंटेशन आणि वाढत्या आकड्यांची तक्ती दिसताच अनेकांना हा प्लॅन सरळ–सरळ उच्च परताव्याचा मार्ग आहे असे वाटते. पण तज्ज्ञांचे निरीक्षण याच्या उलट वास्तव स्पष्ट करते. त्यांच्या मते हे सर्व 'स्प्रेडशीटमध्ये बसवलेले पाठ्यपुस्तकी मिस–सेलिंग' असून या प्रक्षेपणात सर्वात महत्त्वाचे घटक मुद्दाम लपवलेले असतात.

कुमार यांनी सर्वप्रथम अधोरेखित केलेला मुद्दा म्हणजे 'हिडन चार्जेस'. युलिप विक्रेते जो चार्ट दाखवतात, त्यात संपूर्ण प्रीमियम गुंतवणुकीत जाऊन १४ टक्क्यांनी वाढत असल्याचे भासवले जाते. प्रत्यक्षात मात्र प्रीमियम अलोकेशन कॉस्ट, लाईफ कव्हरसाठी होणारे मॉटलिटी चार्जेस, फंड मॅनेजमेंट फी आणि प्रशासकीय खर्चह्हे सर्व वजा झाल्यावर गुंतवणुकीसाठी उरणारी रक्कम लक्षणीयरीत्या कमी होते. परिणामी १४ टक्के म्हणून दाखवला जाणारा परतावा प्रत्यक्षात सुमारे ११ टक्क्यांवर येऊन ठेपतो. दरवर्षीचा हा तीन टक्क्यांचा फरक १५ वर्षांच्या कालावधीत प्रचंड परिणाम घडवतो आणि तो केवळ 'राउंडिंग एरर' नसून खरा–खुरा नुकसान असतो, असे कुमार स्पष्ट करतात.

या प्रक्षेपणातील दुसरी दिशाभूल करणारी बाब म्हणजे करसवलतीचा दावा. अनेक युलिप योजना 'मॅच्युरिटी टॅक्स–फ्री' अशी जाहिरात करतात; परंतु वार्षिक प्रीमियम २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त असलेल्या पॉलिसींना सध्याच्या नियमांनुसार कलम १०(१०डी) अंतर्गत करमुक्त लाभ मिळत नाही. अशा पॉलिसीमध्ये होणारा नफा हा पूर्णपणे कॅपिटल गेन म्हणून करपात्र ठरतो. कुमार यांच्या उदाहरणातील प्रीमियम दहा लाख रुपये असल्याने 'टॅक्स–फ्री रिटर्न' हा दावा अक्षरशः चुकीचा ठरतो; मात्र ही बाब प्रेझेंटेशनमध्ये कधीही दिसत नाही.

तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नियमांचे सरळ उल्लंघन. आयआयआरडीएआयच्या मार्गदर्शक तत्वांनुसार विमा कंपन्यांना केवळ ४ टक्के आणि ८ टक्के परताव्याचे दोनच परिदृश्य दाखवण्याची परवानगी आहे. १४ टक्के प्रोजेक्शन दाखवणे हे नियम मोडणारे आणि थेट सावधानतेचा इशारा देणारे काम असल्याचे कुमार म्हणतात. परंतु 'अधिकृत' भासणारा आकडा गुंतवणूकदारांना आकर्षित करतो आणि कोणीही त्यावर प्रश्न विचारण्याचा प्रयत्न करत नाही. ◆◆◆

**● युलिप्सचे वाढते मार्केटिंग पाहता गुंतवणूकदारांनी विक्री प्रस्तुतीपलीकडे पाहणे अत्यावश्यक आहे. खर्च कोणते, कर परिणाम कसे आणि प्रत्यक्षात मिळू शकणारा परतावा कितीह्या सर्व प्रश्नांची स्पष्ट उत्तरे मिळाल्याशिवाय दीर्घकालीन आर्थिक उत्पादनात गुंतवणूक करणे धोकादायक ठरू शकते. अभिषेक कुमार यांनी दिलेला इशारा फक्त एका उदाहरणापुरता मर्यादित नसून, आर्थिक निर्णय घेताना पारदर्शकता आणि सुजाण विचारांची गरज किती महत्त्वाची आहे हे पुन्हा एकदा अधोरेखित करणारा आहे.**



# मुलांच्या भविष्यासाठी मनीबॅक पॉलिसी घ्यावी का?

गेल्या काही वर्षांत मुलांच्या शिक्षणखर्चात प्रचंड वाढ होताना दिसत आहे. शाळेतील फीपासून उच्च शिक्षणापर्यंत प्रत्येक टप्प्यावर खर्चाचा आलेख सातत्याने वर जात आहे. अशा परिस्थितीत पालकांनी मुलांच्या भविष्यासाठी योग्य आर्थिक नियोजन करणे अत्यावश्यक ठरते. या नियोजनात मनीबॅक पॉलिसी आणि म्युच्युअल फंड एसआयपी हे दोन पर्याय बहुतेक पालकांच्या चर्चेत नेहमी दिसून येतात. या दोन्ही पर्यायांचा हेतू सुरक्षितता आणि बचत हा असला तरी त्यांचे स्वरूप, परतावे आणि दीर्घकालीन परिणाम मात्र पूर्णपणे वेगळे आहेत.

मनी –बॅक पॉलिसी ही पारंपारिक विमा उत्पादन म्हणून ओळखली जाते. या पॉलिसींमध्ये ठराविक कालावधीनंतर काही रक्कम 'मनी–बॅक' म्हणून परत मिळते आणि मुदतपूर्तीनंतर आणखी एक रक्कम हातात येते. या योजनांमध्ये जीवनविमा कवचही मिळते, परंतु परतावा मात्र तुलनेने कमी असतो. या योजनांचा सरासरी वार्षिक परतावा साधारण ५ ते ६ टक्क्यांदरम्यान फिरत असल्याचे अनेक वर्षांचे अनुभव सांगतात. पण दुसरीकडे एसआयपी ही संकल्पना पूर्णपणे बाजाराशी जोडलेली आहे. इक्विटी म्युच्युअल फंडांच्या एसआयपींमधून दीर्घकालीन काळात साधारण १० ते १२ टक्क्यांच्या आसपास परतावा मिळण्याची शक्यता अनेक ऐतिहासिक आकडेवारींवरून दिसते. चक्रवाढ व्याजामुळे एसआयपींमधील रक्कम वेगाने वाढते आणि मुलांच्या उच्च शिक्षणाचा वाढता खर्च सांभाळण्यासाठी आवश्यक एवढी मजबूत संपत्ती १०–१५ वर्षांत जमा होऊ शकते.

## जोखीम असली तरी

*● एसआयपीमध्ये बाजारातील चढउतारांचा धोका असतो, परंतु दीर्घकालीन वेळेत हा धोका लक्षणीय प्रमाणात कमी होतो. मुलांच्या भविष्याच्या नियोजनात सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे महागाई. शिक्षण क्षेत्रातील महागाई ही सामान्य महागाईपेक्षा जास्त असते. आज १०–१२ लाखांत होणारे इंजिनियरिंग किंवा मेडिकल शिक्षण पुढील १५ वर्षांत २५ह्३० लाखांच्या वर जाताना दिसू शकते. मनी–बॅक पॉलिसीचा कमी परतावा या वाढत्या खर्चाशी तुलनेने कमी गतीने धावतो; तर एसआयपीमधील उच्च परतावा महागाईवर मात करून निव्वळ संपत्ती वेगाने वाढवतो. म्हणूनच अनेक तज्ञ पालकांना किमान दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी एसआयपीचा विचार करण्याचा सल्ला देताना दिसतात.*

*● मनी–बॅक पॉलिसी आणि एसआयपी हे दोन्ही पर्याय उद्देशानुसार वेगवेगळे आहेत. मनीबॅक पॉलिसी सुरक्षितता, हमी, विमा कवच आणि निश्चित रकमेची परतफेड देते. पण त्यात संपत्ती निर्माण होण्याचा वेग कमी असतो. तर एसआयपी हा जोखीम स्वीकारण्याची तयारी असलेल्या पालकांसाठी दीर्घकालीन संपत्ती तयार करण्याचा अधिक प्रभावी मार्ग ठरतो. मुलांच्या उच्च शिक्षण, परदेशातील शिक्षण किंवा व्यावसायिक प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेली मोठी रक्कम या माध्यमातूनच अधिक वास्तववादी पद्धतीने जमवली जाऊ शकते.*

*● अनेक पालक आज दोन्हीचा संतुलित वापर करतातह्जीवनविमा म्हणून एलआयसीची पॉलिसी घ्यायची आणि गुंतवणूक व संपत्ती निर्मितीसाठी एसआयपीचा पर्याय निवडायचा. हा संमिश्र मार्ग दीर्घकालीनदृष्ट्या सुरक्षित आणि व्यवहार्य ठरतो.* ◆◆◆

# आता फंड युनिटस् द्या गिफ्ट!

सेबीने नुकताच एक महत्त्वपूर्ण बदल जाहीर करत आता म्युच्युअल फंड युनिट्स 'गिफ्ट' स्वरूपात देणे आणि घेणे अधिकृतपणे मान्य केले आहे. त्यामुळे आता एखाद्या जवळच्या व्यक्तीला सोन्या–चांदीऐवजी किंवा नेहमीच्या भेटवस्तूऐवजी अशी भेट देता येणार आहे ज्याची किंमत काळानुसार वाढत जाईल आणि दीर्घकालीन आर्थिक सुरक्षिततेचे कवच तयार करेल. ट्रस्टेडआर्म्स फायनसर्वच्या मते, हा निर्णय कुटुंबीय, मुले, मित्रपरिवार यांच्या भविष्यासाठी मजबूत पाया घालण्याची संधी देणारा आहे. म्युच्युअल फंड गिफ्ट कसा देता येतो, कोण देऊ शकतो, कोण घेऊ शकतो आणि करनियम काय सांगतात, हे तपशीलवार पाहणे आवश्यक आहे.

**म्युच्युअल फंड गिफ्ट कोण देऊ शकतो?**

ज्याच्या नावावर केवायसीसह वैध म्युच्युअल फंड फोलिओ आहे, असा कोणताही गुंतवणूकदार आपल्या कुटुंबियांना, मित्रांना, निकटवर्तीयांना किंवा पालकांच्या देखरेखीखालील मुलांना म्युच्युअल फंड युनिट्स गिफ्ट करू शकतो. त्याचप्रमाणे एखादा गुंतवणूकदार इतरांकडूनही म्युच्युअल फंड गिफ्ट म्हणून स्वीकारू शकतो. म्हणजेच गुंतवणूकदार ते गुंतवणूकदार अशी ही भेट थेट हस्तांतरित करता येते.




**हा गिफ्ट एका फोलियोमधून दुसऱ्यात कसा पोहोचतो?**

युनिट्स देणाऱ्याच्या फोलियोतून थेट स्वीकारणाऱ्याच्या फोलियोमध्ये हस्तांतरित होतात. हा ट्रान्सफर 'कॅम्स' किंवा 'केफिनटेक' पोर्टलवरून पूर्ण केला जातो. युनिट स्वीकारणाऱ्या व्यक्तीने या हस्तांतरणाला संमती देणे आवश्यक असते. एवढेच नाही तर मूळ गुंतवणुकीची प्रारंभीची किंमत (कॉस्ट ऑफ ॲक्विझिशन) आणि गुंतवणुकीची कालावधीही तशीच पुढे ट्रान्सफर होते. त्यामुळे नंतर रिडेम्पशनच्या वेळी लागणारे करनियम नेमके कसे लागू होतील, याचा आधार भक्कम तयार राहतो.

**करनियम काय सांगतात?**

गिफ्ट देणाऱ्यावर कोणताही कर लागू होत नाही. गिफ्ट स्वीकारणाऱ्यासाठी नियम थोडे बदलतात. जर गिफ्ट कुटुंबीयांकडून मिळाला असेल तर कोणताही कर लागत नाही. मात्र कुटुंबाबाहेरील व्यक्तीकडून मिळालेल्या गिफ्टची वर्षभरातील एकूण किंमत पन्नास हजार रुपयांहून जास्त असेल, तर करनियमांनुसार त्यावर कर आकारला जातो. पुढे गिफ्ट मिळालेल्या युनिट्स रिडीम करताना दीर्घकालीन किंवा अल्पकालीन भांडवली नफ्यावर लागू होणारा 'कॅपिटल गेन टॅक्स' म्युच्युअल फंडांच्या विद्यमान नियमांनुसारच भरावा लागतो. एसईबीआयच्या या बदलामुळे 'गिफ्ट' या संकल्पनेला आता एक नवा आर्थिक आणि गुंतवणूकप्रधान अर्थ प्राप्त झाला आहे. ◆◆◆

# एकाच समभागात मोठी गुंतवणूक करताय?

शेअर बाजारात एखादा गुणवान समजला जाणारा स्टॉक मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्याचा मोह अनेक किरकोळ गुंतवणूकदारांना होतो. 'आपण हा व्यवसाय समजतो' किंवा 'पडलेल्या भावात घेतलेला माल पुढे हमखास वाढतो' या आत्मविश्वासाच्या आधारावर घेतलेला मोठा निर्णय मात्र अनेक वेळा आयुष्यभर साठवलेल्या गुंतवणुकीवर घाला घालू शकतो, असे सेबी–पंजीकृत गुंतवणूक सल्लागार अभिषेक कुमार यांनी अलीकडे स्पष्ट केले.


काही काळ मोठी घसरण झालेला एखादा उच्च–गुणवत्तेचा समजला जाणारा स्टॉक स्वस्तात मिळत असल्याचा भास होतो; 'बाय ऑन डिप्स' असल्याची मानसिकता गुंतवणूकदाराला खात्री देते. परंतु प्रत्यक्षात जोखीम जास्त असते. एका स्टॉकमध्ये मोठी गुंतवणूक म्हणजे विविधता नसलेल्या पोर्टफोलिओची तयारी. किंमत ३० टक्के घसरली तरी मानसिक दडपण प्रचंड वाढते. किंमत पन्नास टक्क्यांनी खाली गेली तर तोट्यातून बाहेर पडायला शंभर टक्के वाढ लागतेह्म्हणजे अनेक वर्षांची मेहनत मागे सरकू शकते.




अनेकांना 'गुणवत्ता' हीच अखेरची ढाल वाटते. परंतु बाजार दरवेळी दर्जा, किंमत आणि अपेक्षा या तिन्ही गोष्टींचा संगम पाहतो. गुणवत्तापूर्ण कंपनीचा स्टॉकही चुकीच्या भावात विकत घेतला तर वर्षानुवर्षे अडकवून ठेवणारा 'व्हॅल्यु ट्रॅप' बनू शकतो. अपेक्षा घसरल्या की गुंतवणूकदार प्रश्न विचारत राहतातह्'अशी कंपनी कशी अडकली?' यात आणखी एक त्रुटी म्हणजे गुंतवणुकीत ट्रेडिंगची मानसिकता मिसळणे. दररोज किंमत बघण्याची सवय, वाढ झाली की नफा बुक करण्याचे नियोजन, आणि घसरण झाली की भावनिक अस्वस्थताह्या सर्वांचा परिणाम दीर्घकालीन संपत्ती निर्मितीवर घातक ठरतो. दीर्घकालीन गुंतवणूक म्हणजे शांतपणे, कालांतराने वाढ पाहणे; दररोजच्या चढउतारांनी बाधित होणे नव्हे.

सोशल मीडियाने या वर्तनाला अधिक तीव्र केले आहे. एखाद्या लोकप्रिय प्रभावकाने मोठा स्टेक घेतल्याची घोषणा केली की हजारो गुंतवणूकदार त्याच्या मागे धावत जातात. कारण कळत नाही, जोखीम कळत नाही, परंतु गर्दीच्या मागे जाण्याची प्रवृत्ती अनाहूतपणे तयार होते. अभिषेक कुमार स्पष्ट करतातह 'गर्दीमागे धावणे करिअर संपवणारे ठरते.' विचार स्वतःचा असावाच.

या सर्वांवर उपाय साधा आहेह्परंतु तो 'बोरिंग' वाटल्यामुळे अनेक जण टाळतात. स्थैर्य, संयम आणि विविधता या तीन गोष्टी शांतपणे आणि सातत्याने राबवल्या कीच संपत्ती निर्माण होते. अनेक कंपन्यांमध्ये नीट पसरवलेली गुंतवणूक आकर्षक वाटत नाही, कारण त्यात 'रोमांचक' काही दिसत नाही. पण दीर्घकाळात तीच संपत्ती पिढ्यान्‌पिढ्या वाढवते. स्थिर गुंतवणूक, संयम आणि भावनांवर नियंत्रणह्या तीन गोष्टींचा साधा धडा आजही तितकाच अचल आहे. ◆◆◆


मा. श्री. मुख्यमंत्री
देवेंद्रजी फडणवीस
सहर्ष स्वागत..!
श्री शंभूतीर्थ
इचलकरंजी
लोकार्पण सोहळयास
हार्दिक
शुभेच्छा..!
आपला
विठ्ठल चौगुले
मा. पाणीपुरवठा सभापती


धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज
पूर्णाकृती पुतळा
'श्री शंभूतीर्थ'
लोकार्पण सोहळ्यास
हार्दिक शुभेच्छा!
येणाऱ्या सर्व
श्री शिवशंभू
भक्तांचे
सहर्ष
स्वागत!
सागर चाळके
राजवर्धन नाईक
सुनिल तेलनाडे
प्रकाश मोरबाळे
राजू आलासे
भाऊसो साखरे
सुशांत कोटगी
संभाजीराव नाईक (सरकार)
संजय तेलनाडे
मदन जाधव
मँचेस्टर आघाडी इचलकरंजी शहर


धर्मवीर
छत्रपती संभाजी
महाराज
पूर्णाकृती पुतळा
श्री शंभू तीर्थ
लोकार्पण सोहळ्यास
हार्दिक शुभेच्छा...
येणाऱ्या सर्व
शिवशंभू भक्तांचे
सहर्ष स्वागत...
• आठवण •
श्री. शिवाजी शिंदे
सौ. प्रियदर्शनी बेडगे
सौ. मनाली नंदुरकर
श्रीमती सुनीता नेमिष्टे
श्री. निहाल कलावंत
सौ. दीपाली कांबळे
सौ. सबिया जमखंडी
श्री. दशरथ माने
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, इचलकरंजी शहर (जिल्हा)


मुख्यमंत्री नामदार देवेंद्रजी फडणवीस
उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे
उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार
आयसोलेशन हॉस्पिटल समोरुन राजर्षी छत्रपती शाहू महाराज वैद्यकीय नगरी व पुढे शेंडा पार्क, आर. के. नगरला जोडणा-या परंतू;
वैद्यकीय शिक्षण विभागाने रु. 25 कोटी स्वनिधीतून केलेल्या....
सस्नेह निमंत्रण
1100 बेड्स हॉस्पिटलपर्यंतच्या 100 फुटी काँक्रीट रस्त्याचा...
लोकार्पण समारंभ
• शुभहस्ते •
नामदार हसनसाहेब मुश्रीफ
मंत्री-वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य
• कार्यक्रमाचे अध्यक्ष •
आमदार अमल महाडिकसो
कोल्हापूर दक्षिण मतदारसंघ
• प्रमुख उपस्थिती •
मा. अमोल येडगे
जिल्हाधिकारी-कोल्हापूर
मा. श्रीमती के. मंजुलक्ष्मी
आयुक्त-कोल्हापूर म.न.पा.
•• काँक्रिट रस्ता ••
■ लांबी :१ किलोमीटर ■ रुंदी : १०० फुटी ■ ओढ्यावरील दोन पुलांच्या बांधकामासह ७०० मीटर लांबीची रिटेनिंग वॉल
■ विद्युतीकरण व वृक्षारोपण ■ रस्त्याच्या मध्यभागी डिवाइडरसह दुतर्फा एक मीटर रुंदीने पेविंग ब्लॉक, बाजू पट्ट्या व गटारी
•• अत्याधुनिक ऑडिटोरियम ••
■ कोल्हापुरात पहिल्यांदाच शेंडा पार्कमध्ये साकारले सर्वात अत्याधुनिक ऑडिटोरियम
■ आसनक्षमता ५०० ■ अत्याधुनिक साऊंड सिस्टिम ■ यातून चालणार डॉक्टरांच्या कॉन्फरन्स आणि वर्कशॉप
कार्यक्रम स्थळ
नवीन ऑडिटोरियम, राजर्षी छत्रपती शाहू महाराज वैद्यकीय नगरी-शेंडा पार्क, कोल्हापूर
दिनांक व वेळ
आज सोमवार
दि.१५-१२-२०२५ रोजी
दुपारी ०३.०० वाजता
आपले विनीत : डॉ. सदानंद भिसे
अधिष्ठाता - राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर


॥ जय शिवाजी ॥
॥ जय भवानी ॥
धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज
स्मारक लोकार्पण समारंभास
हार्दिक शुभेच्छा...
मार्गदर्शक
मा श्री अशोकराव जाभळे
(माजी आमदार)
शुभेच्छुक
अध्यक्ष - श्री. आनंदराव बजरंग उदाळे,
उपाध्यक्ष -श्री. सचिन नामदेव हळदकर
सेक्रेटरी - श्री. आनंदा दत्तात्रय वाझे
खजिनदार -श्री. विजय एकनाथ सावंत
संचालक - श्री. सुनिल गजानन शेलार
संचालक - श्री. राजाराम गणपती लोकरे
संचालक - श्री. वसंतराव भाऊ मुळीक
संचालक - श्री. राजेंद्र दत्तात्रय बचाटे
संचालक - श्री. उल्हास दत्तात्रय सुर्यवंशी
संचालक - श्री. सुहास अशोकराव जांभळे
संचालक - श्री. संभाजी शिवाजी खवरे
संचालक -श्री. प्रकाश बापूसो नेमिष्टे
संचालक -श्री. दादासाहेब शंकर पाटील
संचालक - श्री. गणेश बापूसो घाटगे
ऑफिस स्टाफ - श्री. सचिन रणदिवे, श्री. बाळासो सावंत, श्री. संतोष कदम
मराठा मंडळ, इचलकरंजी
शिवम प्रिंटर्स इचलकरंजी 9225909233


जाज्वल्य धर्मभक्तीचा
हा 'धागा' आहे..
जनभावनांची कदर करणारा
लोकप्रतिनिधी 'जागा' आहे!
वस्त्रनगरीत...
शिव-शंभु हेच अस्त्र आहे...
इतिहासातून प्रेरणा
हेच शस्त्र आहे!
• शुभहस्ते •
मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
धर्मवीर
छत्रपती संभाजी महाराज
पूर्णाकृती पुतळा
श्री शंभुतीर्थ
राष्ट्रार्पण सोहळा आणि
५११.१५ कोटींच्या
विविध विकास कामांचा
शुभारंभ व लोकार्पण
सोमवार, दि. १५ डिसेंबर २०२५ | सकाळी ९:३० वा. | शंभुतीर्थ, इचलकरंजी
शंभुतीर्थ
पूर्णत्वास
आले
विकासकार्य
दृष्टीक्षेपात
आले
गुरुवर्य
संभाजी भिडे
गुरुजी
आमदार
श्री. राहुल प्रकाश आवाडे